# दिल्लीत कॉकरोच जनता पार्टीचे 5 तास आंदोलन







# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ अमरावती, रविवार ७ जून २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०+४











## शिक्षणमंत्र्यांनी 5 दिवसांत राजीनामा द्यावा, अन्यथा 13 ला पुन्हा आंदोलन

### अभिजित दिपकेंचा इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** विविध शैक्षणिक आणि भरती परीक्षांमधील गैरव्यवहार, पेपरफुटी आदी मुद्यांवरू न कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी आज, शनिवारी दिल्लीतील जंतर-मंतर येथे देशभरातील तरु णांच्या आंदोलनाचे नेतृत्व केले. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत हजारो विद्यार्थी आणि तरू णांनी या आंदोलनात सहभाग घेतला. अनेक आंदोलकांनी चेह-यावर कॉक्रोचचे मास्क लावले होते आणि हातात फुले घेतली होती. तरु णांनी धर्मेंद्र प्रधान, राजीनामा द्या! अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. तसेच आंदोलनात जय भीमच्या घोषणाही देण्यात आल्या. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जंतर-मंतर परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती.यावेळी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक काक्रोच जनता पक्षाच्या आंदोलनात सामील झाले. सीजेपीचे प्रवक्ते आशुतोष रांका हेही त्यांच्यासोबत उपस्थित होते. आशुतोष हे आयआयटी कानपूरचे पदवीधर आहेत. (पान २ वर)

### तरूणांना झुरळे म्हणून त्यांचा अपमान करणे चुकीचे-उध्दव ठाकरे

दिल्लीतील जंतर मंतर येथे सुरू असलेल्या युवा आंदोलनासंदर्भात शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले की, नीट पेपरफुटीमुळे लाखो तरु णांच्या भविष्यावर परिणाम झाला आहे. तरु णांना झुरळे म्हणून त्यांचा अपमान करणे चुकीचे आहे. आता हे तरु ण आपल्या मागण्यांसाठी आवाज उठवत आहेत आणि सरकारने त्यांचे ऐकलेच पाहिजे. त्यांनी या आंदोलनाला सरकारला दिलेला इशारा म्हटले.

### रोहित पवारांचा सीजेपीला पाठिंबा

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शप) चे आमदार रोहित पवार यांनी सीजेपीला पाठिंबा दिला. नीट आणि सीबीएसई परीक्षांमधील कथित अनियमिततेविरोधात हे आंदोलन केले जात आहे. पवार म्हणाले की, या आंदोलनाला मिळणारा प्रचंड पाठिंबा हे दर्शवतो की, केंद्र सरकारच्या धोरणांबाबत आणि मुख्य परीक्षांमधील कथित निष्काळजीपणाबद्दल देशातील तरु णांमध्ये संताप वाढत आहे.












## पंजाबमध्ये रस्ते अपघातात 8 जणांचा मृत्यू; 12 जखमी

**चंडीगड/वृत्तसंस्था-** पंजाबमधील फिरोजपूर-फाजिल्का मार्गावर शनिवारी सकाळी झालेल्या भीषण रस्ते अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला, तर १२ जण जखमी झाले. जखमींना आसपासच्या रु ग्णालयांत दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त सर्वजण आपल्या कुटुंबातील सदस्याच्या अस्थींचे विसर्जन करण्यासाठी जलालाबादहून ब्यासकडे जात होते. वाटेत फिरोजपूर-फाजिल्का मार्गावरील जंगा वाला मोडजवळ हा अपघात झाला.मिळालेल्या माहितीनुसार, जलालाबादमधील मल्कज़ादे गावातील एक कुटुंब आपल्या मृत नातेवाईकाच्या अस्थी विसर्जित करण्यासाठी डेरा ब्यासला जात होते. कुटुंबीय आणि नातेवाईकांसह सुमारे २५ ते ३० जण पिकअपमध्ये बसले होते. वाहन हुसैनशाह गावाजवळ पोहोचताच समोरू न येणा-या ट्रालीशी त्याची जोरदार धडक झाली. अपघात इतका भीषण होता की पिकअपच्या वरच्या टूल बाक्समध्ये बसलेले पाच जण उडून ट्रालीची काच फोडत तिच्या (पान २ वर)



## गुजरात : जखमीला रूग्णालयात नेणा-या 5 जणांचा अपघाती मृत्यू

**मोरबी/वृत्तसंस्था-** गुजरातमध्ये मोरबी-हलवद महामार्गावरील चरडवा गावाच्या हद्दीत शुक्रवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात ५ तरु णांचा मृत्यू झाला, तर २ जण गंभीर जखमी झाले आहेत. भरधाव वेगाने धावणारी कार एका कारखान्यातून बाहेर पडणा-या डंपरला धडकली. या धडकेत कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. मिळालेल्या माहितीनुसार, रणछोडगड गावातील दिलीप दहैया यांचा २४ वर्षीय मुलगा परेश दहैया हा मानसर गावाजवळ झालेल्या दुचाकी अपघातात गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने उपचार मिळावेत म्हणून गावातील काही युवक त्याला कारमधून रु ग्णालयात घेउन जात होते.रात्री सुमारे ९.३० वाजण्याच्या सुमारास चरडवा गावाजवळील एका पेट्रोल पंपासमोर (पान २ वर)



## यादव परिवारांची सुरक्षा कमी केल्याने नाराजी

**पाटणा/वृत्तसंस्था-** बिहारच्या माजी मुख्यमंत्री राबडी देवी आणि लालू यादव यांच्या सुरक्षेतील कपातीचा मुद्दा जोर धरत आहे. बिहार सरकारने सुरु वातीला राबडी देवी यांना १० सर्क्युलर रोड येथील घर खाली करण्याची नोटीस बजावली होती आणि आता त्यांची सुरक्षा कमी केली आहे. यापूर्वी लालू आणि राबडी या दोघांनाही 'झेडअ' सुरक्षा मिळत होती, पण आता त्यात बदल करण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे माजी मुख्यमंत्री राबडी देवी अत्यंत नाराज झाल्या असून, निषेध म्हणून त्यांनी आपल्या निवासस्थानी तैनात असलेले उर्वरित सुरक्षा कर्मचारी (पान २ वर)



## लंडनमध्ये सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या कार्यक्रमात गोंधळ

### भारतीय उच्चायुक्तालयाकडून तीव्र आक्षेप व्यक्त

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** लंडनमध्ये सरन्यायाधीश सूर्यकांत मिश्रा यांच्या कार्यक्रमादरम्यान गोंधळ घालण्याचा आणि घोषणाबाजी करण्याचा प्रयत्न झाला. भारतीय उच्चायुक्तालयाने यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. एका निवेदनात, उच्चायुक्तालयाने म्हटले आहे की, 'सरन्यायाधीश सूर्यकांत मिश्रा यांच्या दौ-यादरम्यान त्यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात व्यत्यय आणल्याचा आम्ही निषेध करतो.' सरन्यायाधीश लंडन विद्यापीठाच्या बर्कबेक येथे 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय कायदा' या विषयावर व्याख्यान देत होते. त्यानंतर त्यांनी लोकांशी संवाद साधला, ज्या दरम्यान काही लोकांनी त्यात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. या व्यत्ययाबाबत भारतीय उच्चायुक्तालयाने सोशल मीडियावर एक निवेदन जारी केले. उच्चायुक्तालयाने म्हटले आहे की,



'सरन्यायाधीशांच्या भाषणानंतर एक चांगली चर्चा झाली. त्यानंतर, एका व्यक्तीने कार्यक्रमात व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला. असे अनुचित वर्तन अस्वीकार्य आहे आणि सार्वजनिक चर्चेसाठी निर्धारित केलेल्या आदरपूर्ण वर्तनाच्या विरु द्ध आहे. मतभेद हा लोकशाही समाजाचा एक नैसर्गिक भाग आहे. पण, ते सभ्य आणि आदरपूर्ण पद्धतीने व्यक्त केले पाहिजे.'भारतातील असंतोषाप्रती वाढत्या शत्रुत्वाच्या प्रश्नावरू न प्रेक्षकांमध्ये झालेल्या जोरदार चर्चेचा एक व्हिडिओ ऑनलाइन प्रसारित होत असताना, कार्यक्रमाच्या सूत्रसंचालकाने ही (पान २ वर)

## 2 कोटींचा वैद्यकीय साठा जप्त

**मुंबई/प्रतिनिधी-**: भिवंडी, पालघर आणि मुंबई येथील तीन आस्थापनांमधून एकूण ८१ लक्ष किमतीचा औषध साठा जप्त करण्यात आला असून १ कोटी ३५ लाख रु पये किमतीचा सर्जिकल ग्लोव्हज साठा गुणवत्ता चाचणीसाठी प्रतिबंधित करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार या तपासणी मोहीम कारवाईत औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० आणि नियमांचा भंग करणा-या कंपन्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे.अन्न व औषध प्रशासनाच्या तपास पथकाने मे.साची मेडिक, साकीनाका या आस्थापनावर टाकलेल्या छाप्यात



परवाने व नोंदणी नसलेल्या व्यावसायिकाने मलेशिया येथून विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हजची आयात करू न कोणत्याही परवान्याशिवाय साठवणूक व विक्री केल्याचे उघड झाले. आयात केलेले ग्लोव्हजची वाडा व भिवंडी येथील वैद्यकीय उपकरणे उत्पादन परवाने असलेल्या व्यावसायास पँकिग व लेबलीग करू न पुढे त्याची विक्री करण्यास पुरवठा केला असल्याचे आढळून आले. या कारवाईत ७४.८५ रु पये किमतीचे विना निर्जंतुकीकरण (पान २ वर)

## पश्चिम बंगालमध्ये मोफत रेशन बंद होणार

**कोलकाता/वृत्तसंस्था**: पश्चिम बंगालमधील सुवेंदू अधिकारी सरकारने राज्यातील कल्याणकारी योजनांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि सरकारच्या तिजोरीवरील भार कमी करण्यासाठी मोठे पाउल उचलले आहे. खाद्य आणि नागरी पुरवठा विभागाच्या खाद्य साथी योजनेंतर्गत निकष पूर्ण न करणा-या अथवा बनावट पद्धतीने मोफत व सवलतीच्या दरात धान्य मिळवणा-या अपात्र लोकांची आता ओळख पटवली जाणार आहे.विभागाने गुरु वारी जारी केलेल्या आदेशानुसार, विशेष गहन समीक्षा-२०२६ प्रक्रियेनंतर नियमांनुसार अपात्र ठरणा-या रेशन कार्डांवर कडक कारवाई केली जाईल. या पडताळणीत संशयास्पद आढळलेली रेशन कार्ड रेकार्डमधून हटवली जातील. ताज्या निर्देशानुसार, मतदार यादीतून नाव वगळण्यात आलेल्या सुमारे ६३ लाख लोकांची ओळख पटवून त्यांचे रेशन कार्ड रद्द केले जाणार आहे. मात्र, संवेदनशील आणि कायदेशीर बाबी लक्षात घेउन काही जणांना दिलासा देण्यात आला आहे. ज्यांची नावे मतदार यादीतून हटवली गेली आहेत, मात्र त्यांनी नागरिकत्व दुरु स्ती कायद्यांतर्गत नागरिकत्वासाठी अर्ज केला आहे.अथवा संबंधित न्यायाधिकरणात अपील केले आहे त्यांचे रेशन कार्ड तूर्तास बंद केले जाणार नाही. अधिका-यांच्या मते, दरवर्षी अंदाजे १५ हजार कोटी रु पये खर्च होणा-या या खाद्य साथी योजनेद्वारे



सुमारे दोन कोटी लोकांना मोफत रेशन दिले जाते आणि शेतक-यांकडून थेट भात खरेदी केला जातो. या योजनेत गेल्या काही वर्षांत आर्थिक अनियमितता झाल्याची शंका असल्याने आता सर्व रेशन कार्डधारकांची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे.

## मान्सूनचा 4 राज्यांमध्ये प्रवेश

**नवी दिल्ली/भोपाळ/जयपूर/लखनौ** : केरळमध्ये ३ दिवसांच्या विलंबाने दाखल झाल्यानंतर मान्सूनने वेग पकडला आहे. केरळ, कर्नाटक, तामिळनाडूच्या संपूर्ण किनारपट्टी भागातून पुढे सरकत मान्सून योग्य वेळी गोव्यात पोहोचला. येथे मान्सून दाखल होण्याची सामान्य तारीख ५ जून होती. मान्सून मुंबईत वेळेवर किंवा त्यापूर्वी दाखल होउ शकतो अशी अपेक्षा आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून ईशान्येकडील राज्यांसह पश्चिम बंगालच्या काही भागांपर्यंत पोहोचू शकतो. १० दिवसांच्या आत बिहार, झारखंड आणि ओडिशाच्या काही भागांमध्ये मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. तथापि, नंतर मान्सून अडकू शकतो. स्कायमेट वेदरचे हवामान तज्ज्ञ जीपी शर्मा यांनी सांगितले की पूर्व आणि मध्य भारतात मान्सून पुढे नेण्यासाठी बंगालच्या उपसागरात एका मजबूत हवामान प्रणालीची आवश्यकता असते ज्याचे संकेत सध्या नाहीत. अशा परिस्थितीत मध्य प्रदेश, छत्तीसगड व्यतिरिक्त बिहार, झारखंड, ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या उर्वरित भागांमध्ये मान्सूनचा वेग मंदावू शकतो. सध्या, गुजरात वगळता इतर सर्व राज्यांमध्ये मान्सूनपूर्व पाउस पडत आहे. राजस्थानमध्ये शुक्रवारी धूळ आणि वादळी वा-यासह झालेल्या जोरदार पावसामुळे चार लोकांचा मृत्यू झाला. मान्सून केरळच्या किना-यापासून सुमारे ३५ किमी दूर समुद्रात १२ दिवस अडकून राहिला होता. तरीही, हवामान विभागाच्या मते, ४ जून रोजी केरळमध्ये पोहोचणे सामान्य मानले जाईल, जरी ते सरासरी तारखेपेक्षा ३ दिवस उशिरा आले असले तरी.

## टिसीएस-निदाचे पाक कनेक्शन समोर

### 9 जूनपासून पहिल्या खटल्याला सुरूवात

**नाशिक/प्रतिनिधी--** टीसीएस प्रकरणांमध्ये निदा खान विरोधात न्यायालयात पहिला खटला ९ जून पासून सुरू होणार आहे. दरम्यान जहाल इस्लाम धर्मप्रचारकांच्या ध्वनिफितीच्या मदतीने धर्मांतर करण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले असून पाकिस्तान कनेक्शन देखील या माध्यमातून स्पष्ट होत आहे. नाशिक मधील TCS प्रकरणाने संपूर्ण देशभरात खळबळ निर्माण केली असून आता या प्रकरणात दरदिवशी नवनवीन खुलासे होत आहेत. दरम्यान आता एक मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी निदा खान हिने मोठी कबुली दिली आहे. तिने धर्मांतर करण्यासाठी प्रयत्न केल्याची कबुली दिली आहे. या बाबतचा जबाब दोषारोपपत्रात नमूद करण्यात आला आहे. शिवाय निदा खानचं पाकिस्तान कनेक्शनही समोर आलं आहे. एसआयटी दाखल केलेल्या दोषारोपपत्रानुसार, निदा खानने पीडित तरु णीचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी त्यांना वादग्रस्त पाकिस्तानी प्रचारक तारिक जमील आणि भारताचा फरार प्रचारक झाकीर नाईक यांचे प्रक्षोभक व्हिडिओ पाहण्यास भाग पाडलं, याबाबतची धक्कादायक कबुली निदा खानने दिली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एसआयटीने दाखल केलेल्या दोषारोपपत्रात या जबाबाचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. दरम्यान, (पान २ वर)






# खोलापूर-पांढरी येथे अनेक युवकांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



भातकुली- तालुक्यातील खोलापूर-पांढरी परिसरातील अनेक युवक व नागरिकांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमात प्रफुल्ल लवणकर, जयप्रकाश घुरडे, योगेश फुटाणे, सोहम घुरडे, अक्षय इसळ, सुरेश आवारे, सुरेश ढोके, मुरलीधर भाउ, राजेश घुरडे, निखिल पाठक, नरेश सरोदे, तन्मय आवारे, सोहम भोयर, जयेश घुरडे, रुद्रा लवणकर, यश इसळ, आदित्य कुसटकर, लोकेश घुरडे, समर्थ घुरडे आणि सचिन घुरडे यांनी शिवसेना पक्षात प्रवेश केला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख आशिष धर्माळे, सहसंपर्क प्रमुख श्याम देशमुख, उपजिल्हाप्रमुख उमेश घुरडे, शिवसेना तालुकाप्रमुख अमोल वारघडे तसेच विविध गावांतील शाखाप्रमुख, पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी शिवसेना पक्षाची विकासाभिमुख भूमिका, राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना तसेच संघटन बळकटीकरणाबाबत मार्गदर्शन केले. पक्षप्रवेश करणा-या युवकांचे स्वागत करून आगामी काळात जनतेच्या प्रश्नांसाठी व विकासकामांसाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले. या पक्षप्रवेशामुळे भातकुली तालुक्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत झाली असून परिसरात पक्षाला वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

# वाहतूक नियमभंग करणा-यांविरूध्द मोहिम

## १३,४५२ वाहनचालकांवर कारवाई; २० लाखांचा दंड वसूल




**अमरावती/प्रतिनिधी-**वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिसांनी मे महिन्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-या वाहनचालकांविरुद्ध व्यापक मोहीम राबविली. या विशेष कारवाईत १३ हजार ४५२ वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून १९ लाख ८४ हजार ८०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच विविध प्रकरणांमध्ये ३३ लाख ८६ हजार ८०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील वाढते अपघात रोखण्यासाठी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणारे तसेच अवैध प्रवासी वाहतूक करणा-या वाहनचालकांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार १ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत जिल्हा वाहतूक शाखा, अचलपूर वाहतूक शाखा आणि सर्व पोलीस ठाण्यांच्या पथकांनी संयुक्तमोहीम राबविली. या मोहिमेदरम्यान अवैध प्रवासी वाहतूक करणारी वाहने, हेल्मेटशिवाय दुचाकी चालविणारे चालक, ट्रिपल सीट वाहनचालक, सीट बेल्ट न लावता वाहन चालविणारे, नो-पार्किंग क्षेत्रात वाहने उभी करणारे तसेच मालवाहू वाहनांत धोकादायक पद्धतीने मजुरांची वाहतूक करणा?या चालकांवर कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या या कारवाईमुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून रस्ते सुरक्षेबाबत जनजागृती होण्यास मदत झाली आहे. ही मोहीम दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली. जिल्हा वाहतूक शाखेने नागरिकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

दुचाकी चालविताना हेल्मेटचा वापर करावा. वाहन चालविताना सीट बेल्ट लावावा. भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवू नये. नो-पार्किंग क्षेत्रात वाहने उभी करू नयेत. मालवाहू वाहनांमधून प्रवासी वाहतूक करू नये. सर्व वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणा-यांविरुद्ध यापुढेही कठोर दंडात्मक आणि न्यायालयीन कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# अवैध विदेशी दारू विक्री करणारा आरोपी जेरबंद

**मोर्शी/प्रतिनिधी-**अवैध्य विदेशी दारू विक्रीकरिता घेउन जाणा-या आरोपीला मोर्शी पोलिसांनी रंगेहात पकडून त्याचेकडून जवळपास १० हजार ४०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात यश प्राप्त केले.

अवैध विदेशी दारू विक्रीसाठी बाळगणा?या इसमावर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधिक्षक निकेतन कदम यांनी निर्गमित केले होते. पोलीस निरिक्षक राहुल आठवले ठाणेदार पोलीस स्टेशन मोर्शी यांचे निर्देशावरून त्यांचे अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी, अंमलदार यांना दि.६ जून रोजी मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून जयस्तंभ चौक मोर्शी येथे नाकाबंदी करून अवैध विदेशी दारू विक्रीकरीता बाळगणा-या ईसमाचे ताब्यातुन विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आरोपी अजेंद्र नंदकिशोर वर्मा (वय ४५) रा.मालवीय गार्डन मोर्शी याचेकडे १८० मिली क्षमतेच्या १५ नग विदेशी दारू ब?टल्स प्रत्येकी किंमत २५० रू प्रमाणे ३७५० रू.९० मिली क्षमतेच्या १० नग प्रत्येकी किंमत १४० रू प्रमाणे १४०० रू. १८० मिली क्षमतेच्या १० नग प्रत्येकी किंमत २२०रू प्रमाणे २२००,९० मिली क्षमतेच्या १० नग प्रत्येकी किंमत १२० रू प्रमाणे १२०० रू,१८० मिली क्षमतेच्या ५ नग प्रत्येकी किंमत २२० रू प्रमाणे ११००/- रू.९० मिली क्षमतेच्या १० नग प्रत्येकी किंमत ७५ रू प्रमाणे ७५० रू. असा विविध कंपनीचा एकुण १०,४०० रूपयांचा विदेशी दारूचा मुद्देमाल जप्त करून दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करून पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे. मोर्शी शहरात राज्य उत्पादन शुल्क खात्याचे कार्यालय असतांना सुद्धा येथील वरिष्ठ अधिकारी अवैध दारू विक्रीकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

पान 1 व 10 वरून

## शिक्षणमंत्र्यांनी 5 दिवसांत राजीनामा

ते गेल्या वर्षी लंडनहून भारतात परतले. आंदोलनाला संबोधित करताना अभिजित दिपके म्हणाले, आपला हा लढा मोठा आहे. आम्ही गेल्या एका महिन्यापासून सोशल मीडियावर शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहोत. मात्र, कारवाई करण्याऐवजी आमचे सोशल मीडिया अकाउंट्स हॅक करणे आणि पोस्ट डिलीट करण्याचे काम केले जात आहे. तुम्ही आमच्या पोस्ट डिलीट करू शकता, पण आम्हाला इथून हटवू शकत नाही. या आंदोलनादरम्यान दिपके यांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मचरित्र पाहायला मिळाले.

अभिजीत दीपके यांनी सांगितले की, मंत्र्यांनी आज सायंकाळी ५ वाजेपर्यंत राजीनामा दिलाच पाहिजे, अन्यथा देशभरात आंदोलने केली जातील. पुढील शनिवारी, १३ जून रोजी जंतर मंतर येथे आणखी एक आंदोलन होणार आहे. सायंकाळी ५ वाजेपर्यंत जंतर मंतर येथे आंदोलन करण्याची परवानगी मिळाली होती, परंतु अभिजीत आणि सोनम वांगचुक यांनी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास आंदोलनस्थळ सोडले आणि आंदोलन संपवले.सामंजस्याची भूमिका घेत, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी काक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) नेतृत्वाखालील आंदोलनाला एक विनंती किंवा आवाहन म्हटले आहे. राजीनाम्यापेक्षा, सरकारने जबाबदारी घ्यावी अशी माझी इच्छा आहे, असे वांगचुक म्हणाले. सरकारने हे आंदोलन थांबवलेले नाही. आम्हाला आशा आहे की, हे सरकार भविष्यातही अशा सर्जनशील आणि विधायक अभिव्यक्तींना वाव देईल.

**आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या-**आंदोलनकर्त्यांच्या ५ प्रमुख मागण्यांमध्ये नीट पेपर लीक प्रकरण आणि सीबीएसईच्या ऑन-स्क्रीन मार्किंग सिस्टममधील कथित अनियमिततेची जबाबदारी स्वीकारून शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तातडीने राजीनामा द्यावा. शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करण्यापूर्वी शिक्षकांना त्याचे योग्य प्रशिक्षण आणि मूल्यमापन दिले जावे. डिजिटल प्रणालीमुळे होणारे गैरप्रकार आधी रोखले जावेत. गेल्या तीन वर्षांपासून मणिपूरमध्ये सुरू असलेल्या अनास्थेमुळे तेथील शाळा आणि महाविद्यालये योग्य प्रकारे सुरू नाहीत. तेथील विद्यार्थ्यांचा मानसिक ताण कमी करून शिक्षण व्यवस्था तातडीने सुरळीत करावी. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे एका छोट्या खोलीत राहून परीक्षांची तयारी करतात. मात्र, पेपर फुटीमुळे त्यांच्या कष्टावर पाणी फेरले जाते. त्यामुळे परीक्षांमध्ये पारदर्शकता आणून त्यांची विश्वासार्हता टिकवून ठेवावी. परीक्षांमधील गोंधळामुळे लाखो विद्यार्थी प्रचंड मानसिक दबावाखाली आहेत, तर काहींनी टोकाचे पाउल उचलले आहे. या सर्व परिस्थितीला प्रशासनाने जबाबदार धरून विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे.सीजेपीच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर इंदिरा गांधी विमानतळ, मुख्य रेल्वे स्थानक, बस स्थानक आणि दिल्लीच्या सीमावर्ती भागांवर सुरक्षा वाढवण्यात आली. पूर्वनिश्चित ठिकाणी १ हजारहून अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते. बाजारपेठा आणि संवेदनशील भागांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखण्याचे निर्देश देण्यात आले होते. कॉकरोच जनता पार्टीची सुरुवात मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी एका सुनावणीदरम्यान केलेल्या टिप्पणीतून झाली. सूर्य कांत यांनी बनावट कायद्याची पदवी असलेल्या तरुण बेरोजगार तरुणांची तुलना झुरळांशी केली होती. या टिप्पणीमुळे इंटरनेटवर मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू झाली आणि शेवटी यातूनच एका व्यंगात्मक राजकीय चळवळीचाजन्म झाला. इंटरनेटवर सुरू झालेली ही मोहीम आता एका मोठ्या ऑनलाइन समुदायात बदलली आहे. पक्षाचा दावा आहे की त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लाखो समर्थकांना आकर्षित केले आहे, एकट्या त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवर ८० लाखांहून (८ मिलियन) अधिक फ?लोअर्स आहेत. या चळवळीला सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि अभिनेते प्रकाश राज यांच्यासह अनेकांनी पाठिंबा दिला आहे.

## पंजाबमध्ये रस्ते अपघातात

आत जाउन पडले. धडक एवढी जबरदस्त होती की वाहनातील अनेक जण आत अडकून पडले. असे सांगितले जात आहे की अनेकांचा मृत्यू घटनास्थळीच झाला, तर जखमींना उपचारासाठी फिरोजपूरच्या सिव्हिल रुग्णालयात नेण्यात आले.घटनेची माहिती मिळताच फिरोजपूरचे (एसएसपी) वरिष्ठ पोलीस अधीक्षक भूपिंदर सिंह घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी जखमींना रुग्णालयात हलवले. एसएसपींनी सांगितले की अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.पोलिसांनुसार, पिकअपमध्ये असलेल्या अंशप्रीतने सांगितले की सकाळी ३.३० वाजता ते घरातून अस्थी घेउन सुमारे ३० जण निघाले होते. वाटेत वाहनात पेट्रोल भरल्यानंतर ते जसे जनगांव वाला मोडजवळ पोहोचले, तसे रस्त्याच्या मधोमध उभ्या असलेल्या ट्रालीशी त्यांच्या पिकअपची अचानक धडक झाली. सिव्हिल रुग्णालयाचे वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल गुप्ता यांनी सांगितले की गंभीर जखमी झालेल्या अनेकांना अधिक चांगल्या उपचारांसाठी फरीदकोट येथील गुरु गोबिंद सिंह वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात रेफर करण्यात आले आहे.

## गुजरात : जखमीला रूग्णालयात

असलेल्या कारखान्यातून एक डंपर अचानक रस्त्यावर वळला. जखमीला लवकरात लवकर रुग्णालयात पोहोचवण्याच्या घाईत असलेली कार डंपरवर जाउन आदळली. धडक इतकी भीषण होती की कार डंपरखाली अडकली आणि कारमधील प्रवासी लोखंडी भागांमध्ये चिरडले गेले.

अपघातानंतर परिसरातील नागरिक तत्काळ घटनास्थळी पोहोचले. जेसीबीच्या मदतीने कारचे अवशेष कापून अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्यात आले. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर आणखी दोघांनी रुग्णालयात उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. या भीषण अपघातात मृत्यूमुखी पडलेले सर्व पाचही जण रणछोडगड गावातील रहिवासी होते. मृतांमध्ये सुरेश सिहोरा, वीरम दहैया, परेश दहैया, प्रेमजी दहैया, भरत दहैया यांचा समावेश आहे. तर प्रकाश दहैया आणि दिलीप दहैया हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर मोरबी आणि राजकोट येथील रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले जात आहे.

घटनेची माहिती मिळताच हलवद पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले असून अपघाताचा गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. एका जखमी तरुणाचा जीव वाचवण्यासाठी रुग्णालयाकडे धाव घेतलेल्या पाच युवकांचा या दुर्दैवी अपघातात मृत्यू झाल्याने रणछोडगड गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

## यादव परिवारांची सुरक्षा

परत पाठवले आहेत. आरजेडीचे प्रवक्ते शक्ती सिंह यादव यांनी सांगितले की, पक्षाध्यक्ष लालू प्रसाद यादव आणि माजी मुख्यमंत्री राबडी देवी यांनी सरकारने दिलेली सुरक्षा परत केली आहे. त्यांनी आरोप केला की, राज्य सरकारने आपल्या प्रमुखांच्या सूचनेनुसार लालू-राबडी कुटुंबाची सुरक्षा मोठ्या प्रमाणात कमी केली आहे आणि हे पाउल त्यांना अपमानित करण्याच्या हेतूने उचलले गेले आहे. त्यांनी सांगितले की, कधी घर खाली करण्यासाठी दबाव आणला जात आहे, तर कधी सुरक्षा कमी करून त्यांना अपमानित करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे राजकारण नाही, तर विरोधी पक्षाला कमकुवत आणि अपमानित करण्याचा कट आहे. लोकशाहीत जनताच मालक असते आणि विरोधी पक्ष जनतेच्या वि□ासावरच पुढे जाईल. शक्ती सिंह यादव यांनी असेही संकेत दिले आहेत की, येत्या काही दिवसांत आरजेडीचे इतर नेतेही आपली सरकारी सुरक्षा परत घेउ शकतात.बिहार सरकारने राज्य सुरक्षा समितीच्या शिफारशींच्या आधारे लालू प्रसाद यादव आणि राबडी देवी यांना देण्यात येणारी 'झेड-प्लस' श्रेणीची सुरक्षा रद्द केली होती. त्याऐवजी, त्यांना विशेष सुरक्षा गट (एसएसजी) सुरक्षा देण्याचा निर्णय घेण्यात आला. या नवीन व्यवस्थेअंतर्गत, राबडी देवी यांना बिहार विशेष सशस्त्र पोलिसांचे (बीएसएपी) दोन ते आठ घरगुती रक्षक, साध्या वेशातील तीन महिला अंगरक्षक, तीन गणवेशधारी अंगरक्षक, एक बुलेटप्रूफ वाहन, एक पायलट आणि एक एस्क?र्ट वाहन पुरवले जाणार आहे.

## लंडनमध्ये सरन्यायाधीश सूर्यकांत

चर्चा एआय आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या विषयापासून भरकटत असल्याचे सांगून थांबवली होती. या घटनेनंतर हे विधान आले आहे. आपल्या भाषणात न्यायमूर्ती सूर्यकांत म्हणाले, 'तंत्रज्ञान स्वतःहून मूळतः फायदेशीर किंवा मूळतः हानिकारक नसते. त्याचा परिणाम हा समाज कोणत्या कायदेशीर, राजकीय आणि नैतिक चौकटीत राहून त्याचा वापर करण्याचा निर्णय घेतो यावर अवलंबून असतो.' सरन्यायाधीशांनी न्याय आणि एआयमुळे निर्माण होणा-या संधी आणि आव्हानांचे विश्लेषण केले.

## 2 कोटींचा वैद्यकीय साठा

सर्जिकल ग्लोव्हज जप्त करण्यात आले. कागदपत्रांनुसार या पेढीने मुंबई महानगरपालिका रुग्णालयांना पुरवठा/ विक्री केल्याचे आढळून आले आहे.

**कारणे दाखवा नोटिस बजावली-**मे.साची मेडिक या संस्थेच्या भिवंडीतील वैद्यकीय उपकरण उत्पादक आस्थापनावर कारवाई करण्यात आली. तथापि तपासणीदरम्यान तेथे वैद्यकीय उपकरणे नियम २०१७ च्या तरतुदींचा गंभीर भंग झाल्याचे आढळून आले. जनस्वास्थ्याच्या दृष्टीकोनातून प्रशासनाने ९.८८ लक्ष रुपयांचा ग्लोव्हजचा साठा प्रतिबंधित केला असून कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

**शासकीय रूग्णालयांना केला पुरवठा-**पालघर जिल्ह्यातील वाडा येथील मेडिअर्थ लाईफकेअर आस्थापनावर टाकलेल्या छाप्यात उघडकीस आला, तिथे निर्जंतुकीकरण व इतर उपकरणे नादुरुस्त आहेत, अशा स्थितीत विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हज खरेदी करून त्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते निर्जंतुक असल्याचे भासवून शासकिय रुग्णालयांना वैद्यकीय महाविद्यालयांना पुरवठा करण्यात आल्याची माहिती आस्थापना मालकाने दिली आहे.

**बेकायदेशीर साठवणुक-**या मोहिमेत कोटयावधीचे विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हज वर निर्जंतुक लेबल करून शासकीय वैद्यकीय रुग्णालयांना महाविद्यालयांना देखील पुरवठा करण्यात आल्याचा गैरप्रकार गंभीर आहे. प्रशासनाने १.२६ कोटी किमतीचा विना निर्जंतुकीकरण बँडेज, रोल बँडेज व काटन गौज साठा विक्री व वितरणासाठी प्रतिबंधित केला आहे. तसेच वैध परवाना नसताना बेकायदेशीरपणे साठवून ठेवलेला ॲलोपॅथिक औषधांचा ६.१७ लक्ष किमतीचा साठा जप्त करण्यात आला असून, हस्तगत केलेल्या अभिलेख्याची पडताळणी सुरु आहे.

## *टिसीएस-निदाचे पाक*

नाशिक येथील मुंबई नाका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या ८ गुन्ह्यांच्या खटल्याची पहिली सुनावणी आगामी ९ जून रोजी सुरू होणार आहे.

देवळाली कॅम्प पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्याच्या तपासातून अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. पीडित हिंदू तरुणीच्या मनात स्वत?च्या धर्माबद्दल शंका आणि संशय निर्माण व्हावा, याकरिता एका विशिष्ट नियोजनानुसार तिचे 'ब्रेनव?श' करण्यात आले. झाकीर नाईकच्या जिहादी आणि प्रक्षोभक व्हिडिओच्या लिंक पीडितेला पाठवून, ते व्हिडिओ पाहण्यासाठी तिच्यावर सातत्याने दबाव टाकण्यात आला. निदा खानने स्वत? या जिहादी लिंक पीडितेला पाठवल्याचे कबूल केलं आहे.'जर तू इस्लाम धर्म कबूल केलास, तर तुझा सर्व मानसिक ताण आणि समस्या दूर होतील,' असं भासवून तिचे मन वळवण्याचा प्रयत्न झाला. संशयित आरोपी दानिश शेख याने पीडितेला लग्नाचं आमिष दाखवून तिचे शारीरिक व लैंगिक शोषण केलं. तसेच पीडितेला जीन्स आणि ट?प घालण्यास सक्त मनाई करण्यात आली होती. त्याऐवजी तिला सलवार-कुर्ता घालण्याची सक्ती करण्यात आली आणि बुरखा कसा घालावा, याचं विशेष प्रशिक्षणही देण्यात आलं, असं दोषारोपपत्रात नमूद करण्यात आलं आहे.

## डीएनए अहवालानुसार तो मृतदेह

डीएनए चाचणीचा आधार घेतला. शनिवारी प्राप्त झालेल्या डीएनए अहवालात मृतदेह काजल इंगलेचाच असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर तपास यंत्रणांनी हालचाली वाढवल्या. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्यासह गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी पुन्हा घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाची नव्याने पाहणी करून तपासातील विविध शक्यतांची पडताळणी करण्यात आली.

## स्थानिक प्राधिकारी निवडणूक

यांचे पडसाद आगामी काळात उमटण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्ह्याच्या राजकारणात ही निवडणूक एक वेगळा अध्याय ठरली असून तिचे परिणाम पुढील राजकीय घडामोडींमध्ये निश्चितपणे दिसून येतील.

## एटीएम फोडून लाखोंच्या चोरीचा

HDFC बँकेच्या ATM जवळील गल्लीत ट्रॅक्टरच्या मागे अंधारात एक संशयित व्यक्ती लपून बसलेली आढळली.

पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तो विजय तानबाजी मडावी (वय ३०), रा. राजुरवाडी, ता. घाटंजी असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या अंगावर शर्ट नव्हता. झडतीदरम्यान त्याच्याकडून दोन लोखंडी पाने तसेच स्क्रू-ड्रायव्हरप्रमाणे वापरता येईल असा वाहनाचा लहान वायपर जप्त करण्यात आला.

यानंतर ATM मधील CCTV फुटेज तपासण्यात आले असता संबंधित आरोपी ATM फोडताना स्पष्टपणे दिसून आला. त्यामुळे त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. घाटंजी पोलीस आणि CRO यवतमाळ यांच्या समन्वय व तत्परतेमुळे मोठ्या चोरीचा प्रयत्न हाणून पाडण्यात यश आले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोलिसांचे अभिनंदन केले. तसेच जिल्हा पोलीस अधीक्षकांनी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस निरीक्षक व कर्मचाऱ्यांचा गौरव करून सहाय्यक फौजदार राहुल खंडागळे, पोलीस कर्मचारी दत्ता कुसराम आणि सचिन नैताम यांना प्रत्येकी ५ हजार रुपये, असे एकूण १५ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर रोख बक्षीस प्रदान केले.

घाटंजी पोलिसांच्या सतर्कतेमुळे ATM फोडीचा डाव फसला आणि आरोपी थेट पोलिसांच्या जाळ्यात अडकला, ही बाब जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

## शंभर रुपयांच्या वादातून मामेभावाने

औरंगपुरा) हा तेथे उभा होता. शंकर याने यापूर्वी सोनू यांच्याकडून १०० रुपये उधार घेतले होते. सोनू यांनी उधारीचे पैसे परत मागितल्याने दोघांमध्ये वाद झाला. त्यावेळी मद्यधुंद अवस्थेत असलेल्या शंकरने शिवीगाळ करत सोनू यांची कॉलर पकडली आणि मारहाण करण्यास सुरुवात केली. वाद विकोपाला गेल्यानंतर आरोपीने खिशातून चाकू काढून सोनू यांच्या उजव्या कमरेवर वार केला. तसेच खांदा आणि पाठीवरही चाकूचे घाव घातले. हल्ल्यात सोनू यांच्या कमरेला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. आरडाओरडा ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले आणि त्यांनी दोघांमधील भांडण सोडविले. जखमी अवस्थेतील सोनू यांना पोलिसांच्या मदतीने तातडीने इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या त्यांच्यावर वॉर्ड क्रमांक ३० मध्ये उपचार सुरू आहेत. या घटनेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपी शंकर शरद चांदणे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## तीन कोटींच्या प्लॉटवर डल्ला

नागपूर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून तिलकराज इंद्रजित चड्ढा (रा. भंडारा रोड, नागपूर) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. कोट्यवधींच्या मालमत्तेशी संबंधित या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून व्यवहारातील दस्तऐवज, स्वाक्षऱ्या आणि मालकी हक्काची कागदपत्रे तपासण्यासाठी पोलीस अधिक चौकशी करीत आहेत.

## गुटका विक्रेत्यांवर पोलिसांची

मोबाईल फोनही जप्त केला. या कारवाईत एकूण ३३ हजार २५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी शिरजगाव कसबा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) व अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यातील विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेला गुटखा नेमका कुठून आणला जात होता, त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का आणि परिसरात त्याचे वितरण कुठे केले जात होते, याचा तपास पोलीस करीत आहेत. ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अमन शिरसाट यांच्या नेतृत्वात पार पडली. पोलीस उपनिरीक्षक प्रशांत जाधव व त्यांच्या पथकाने कारवाई यशस्वी केली.

## वाढदिवसाच्या नावाखाली शस्त्रांचे

पोलिसांनी मोहीम राबविली. संबंधितांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली.

तसेच शहरात मोठ्या आवाजाचे सायलेन्सर बसवून ध्वनीप्रदूषण करणारे तसेच विनानंबर वाहनांद्वारे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधातही पोलिसांनी विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. अशा वाहनचालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

वाढदिवस, मिरवणूक किंवा अन्य कोणत्याही कारणाने सार्वजनिक ठिकाणी शस्त्रांचे प्रदर्शन, दहशत निर्माण करणे, नारेबाजी करणे किंवा कायदा हातात घेणे सहन केले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा दर्यापूर पोलिसांनी दिला आहे.

## गांजासह दोघे ताब्यात, १ लाखांचा

(वय २८), दोघेही बुंदेलपुरा, अचलपूर येथील रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले. तपासणीदरम्यान त्यांच्या ताब्यातील पिशवीतून १ किलो ३२५ ग्रॅम गांजा आढळून आला. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या कारवाईत गांजासह होंडा शाईन १०० दुचाकी आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे एक लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार (एनडीपीएस) गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेला गांजा नेमका कुठून आणण्यात आला होता, त्यामागे आणखी कोणते जाळे कार्यरत आहे आणि हा माल कोणाकडे पोहोचविण्यात येणार होता, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक सुरेश म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद राऊत, सलीम शेख आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## जनगणणेच्या कार्यासाठी निघालेल्या

दिवशी प्रगणक म्हणून कर्तव्य बजावले. सकाळी सात वाजता ते कर्तव्यावर निघाले असता त्यांना अस्वस्थ वाटत असल्याने ते परतीला गावाकडे निघाले. वाटेत खासगी रुग्णालयात दाखल झाले. मात्र तेथेच त्यांना हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला. त्यात त्यांचे निधन झाले. ते कुटुंबियांचा एकमेव आधार होते.या पार्श्वभूमीवर सर्व शिक्षक संघटनांच्या वतीने आज तहसिलदारांना निवेदन सादर करण्यात आले. प्रदीप गणोरकर यांच्या कुटुंबाला शासनाकडून योग्य आर्थिक मदत मिळावी, तसेच आवश्यक ती मदत व सवलती देण्यात याव्यात, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार पंकज चव्हाण यांनी शिक्षक संघटनांच्या शिष्टमंडळाशी चर्चा करत हे निवेदन तातडीने जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्याचे आश्वासन दिले.

प्रदीप गणोरकर यांच्या आकस्मिक निधनाबद्दल शिक्षक संघटनांनी तीव्र दुःख व्यक्त केले असून त्यांच्या कुटुंबाला न्याय व आर्थिक आधार मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी प्रकाश विंचूरकर, महेश्वर पवार, संजय बेले, विजय खोडस्कर, संजय कुंभारे, नंदकिशोर पाटील, रंजन कुमार राठोड, विलास टाकरखेडे, राजेंद्र बांबल, चंद्रकांत धार्मिक, जगदिश वानखडे, नरेश देउळकर, प्रभाकर टाकरखेडे, दीपेश वानखडे, किशोर भडांगे, संजय घोरपडे, रमेश सहारे, अमोल खासबागे, श्रीकांत खटाळे, शैलेश श्रीराव, गजानन चेपटे, राजेंद्र लांडे, संजय दळवी, रमेश पुंड, कल्पना घाटोळे, विजय भोंडे, सविता खोडस्कर, योगिता चांभारे, जया टाकरखेडे, आशीष गेडाम, अक्षय साबळे, वैशाली कुंभारे, शैला निवल, मनोज खुटाटे, गजानन हुड, उमेश पाटणकर, सोमेश्वर हरले, प्रकाश अलोणे, प्रमोद गेडाम, सुनील जाणे, आदी उपस्थित होते.

## विवाहितेचा पाठलाग,

त्रास देण्यास सुरुवात केल्याचा आरोप आहे. विविध माध्यमांतून संपर्क साधण्याचे प्रयत्न करत 'मला अनब्लॉक कर, नाहीतर परिणाम वाईट होतील' अशा स्वरूपाच्या धमक्या देऊन तो महिलेवर दबाव टाकत होता. तसेच तिच्या कुटुंबाला अडचणीत आणण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. ५ जून रोजी महिला आणि तिचे पती बाहेरगावाहून परतत असताना आरोपीने त्यांचा पाठलाग केला. घराजवळील चौकात त्याने त्यांची गाडी अडवून महिलेशी हुज्जत घातली, शिवीगाळ केली आणि पुन्हा धमकावण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे घाबरलेल्या महिलेने थेट राजापेठ पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदविली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी शुभमविरुद्ध विनयभंग, पाठलाग, धमकी व इतर संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

## शिवटेकडीवरील म्युरल्सची तोडफोड

पोलिसांना याची माहिती दिली. माहिती मिळताच पोलीस अधिकारी घटनास्थळावर दाखल झाले. त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. यामध्ये एक संशयित तोडफोड करताना दिसत आहे. या संपूर्ण प्रकारामुळे परिसरात तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. माहितीनुसार खासदार अनिल बोंडे नेहमीप्रमाणे शनिवारी सकाळी जॉगिंगसाठी शिव टेकडीवर गेले होते. जॉगिंग करता करता ते शिवसृष्टी जवळ पोहोचले. त्यांनी तेथील आढावा घेतला. यावेळी त्यांच्या लक्षात आले की,शिवटेकडीवर बनविण्यात आलेले शिवसृष्टी मधील काही म्युरल्समध्ये तोडफोड करण्यात आली आहे. तोडफोड केल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. पोलीस अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तुटलेल्या म्यूरल्सचे निरीक्षण केले आणि परिसरात लागलेले सीसीटीव्ही फुटेज तपासले. या मध्ये एक संशयित तरुण तोडफोड करताना दिसत आहे. पोलीस त्याचा युद्ध स्तरावर शोध घेत आहे. या संपूर्ण प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली होती.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, ७ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# नकली नोटांचा मोठा पर्दाफाश

## २१.५० लाखांचा मुद्देमाल जप्त

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

*वाशिम ग्रामीण पोलीस ठाणे, स्थानिक गुन्हे शाखा आणि टोल कर्मचाऱ्यांच्या संयुक्त कारवाईत तब्बल ६ लाख ५० हजार ५०० रुपयांच्या नकली नोटांसह १५ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ जप्त करण्यात आली. या कारवाईत एकूण २१ लाख ५० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून राजस्थानातील एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.*



**वाशिम ग्रामीण पोलिसांची संयुक्त कारवाई; राजस्थानातील एक आरोपी अटकेत, साथीदार फरार**

पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील व अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम सुरू आहे. त्याच अनुषंगाने ५ जून रोजी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास लाखाळा येथील दुकानदार विष्णु प्रकाश ढवळे यांना नकली नोटा देऊन फसवणूक केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. फसवणूक करून आरोपी राजस्थान क्रमांकाच्या काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ वाहनातून हिंगोलीच्या दिशेने निघाल्याची गोपनीय माहिती प्राप्त होताच सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, वाशिम ग्रामीणच्या ठाणेदार श्रीदेवी पाटील व स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि शेखर मास्कर यांच्या नेतृत्वाखाली तीन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली.

पोलिसांनी तातडीने वाहनाचा पाठलाग सुरू करत विविध टोलनाक्यांना सतर्क केले. तोंडगाव फाटा येथील टोल प्लाझावर रात्री नऊ वाजताच्या सुमारास संशयित स्कॉर्पिओ अडविण्यात आली. यावेळी वाहनातील आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना एका आरोपीस ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले. मात्र त्याचे इतर साथीदार अंधाराचा फायदा घेत शेत व जंगल परिसरातून फरार झाले. अटक करण्यात आलेल्या आरोपीने आपले नाव आशिक अली मोहम्मद मुजाहिद (वय २१, रा. गड के पास होर, राजस्थान) असे सांगितले. त्याच्या ताब्यातील स्कॉर्पिओ (आरजे ०१ यूबी ७४१६) वाहनाची पंचांसमक्ष झडती घेतली असता एका पांढऱ्या रुमालामध्ये 'ण्ष्ध्र्ध्र्ज्ए ँन्ध ध्इ घ्र्ध्र्ॅ' असे छाप असलेल्या १,३०० नकली नोटा आढळून आल्या. याशिवाय दोन खऱ्या चलनी नोटा व फिर्यादीकडील एक नकली नोट मिळून एकूण १,३०१ नोटा जप्त करण्यात आल्या. या नोटांची किंमत ६ लाख ५० हजार ५०० रुपये असून वाहनासह एकूण २१ लाख ५० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी विष्णु प्रकाश ढवळे (रा. लाखाळा, ता. जि. वाशिम) यांच्या फिर्यादीवरून वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३०७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम १७९, ३१८(४) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनि राहुल गंधे करीत आहेत.

दरम्यान, अशा प्रकारच्या घटनांबाबत कोणालाही माहिती असल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन वाशिम पोलीस दलाने केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल, ठाणेदार श्रीदेवी पाटील, पोउपनि शेखर मास्कर व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# आज ओबीसी जनगणना परिषदेला ओबीसी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे

## सावता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांचे आवाहन



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

जनगणना २०२७ सुरू असून या जनगणनेमध्ये ओबीसी ची जनगणना करण्यासाठी स्वतंत्र कॉलम नसल्याने सामाजिक कामात अग्रेसर असणाऱ्या सावता परिषदेच्या वतीने वाशिम येथील हॉटेल दानिश येथे ओबीसी जनगणना परिषदेचे आयोजन आज दि. ७ जुनं रोजी केले असून या परिषदेला ओबीसी समाजातील विविध संघटनांच्या पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन सावता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी दि. ३ मे रोजी दुपारी दोन वाजता शासकीय विश्रामगृह वाशीम येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केले.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, केंद्र सरकारने जनगणना २०२७ मध्ये ओबीसीचा वेगळा कॉलम समाविष्ट करावा, राज्य सरकारने केंद्राकडे ठराव पाठवून ओबीसी जनगणनेचे सरकारने दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठी चर्चा करून उपाययोजना करावे. ओबीसीच्या हक्कासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र यावे, अस ही आवाहन सावता परिषदेच्या वतीने करण्यात आली याबरोबरच ओबीसी समाजातील सर्व संघटना युवक महिला शेतकरी कर्मचारी विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने या परिषदेला उपस्थित राहून आपल्या हक्काचा आवाज बुलंद करावा ही लढाई आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी आहे संविधानात हक्कासाठी सामाजिक न्यायासाठी ओबीसीजनिकांनी साठी सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन सावता परिषदेचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेश कार्याध्यक्ष पांडुरंग कोठाळे यांनी या पत्रकार परिषदेत केले. या वेळी त्यांच्या समवेत प्रदेश उपाध्यक्ष रवि भांदुर्गे, जिल्हाध्यक्ष विलास ढगे, जिल्हा उपाध्यक्ष रवी वानखेडे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रंजना परिस्कार, शहराध्यक्ष चेतन संतोषराव इंगोले, शहर उपाध्यक्ष सुनील वानखेडे, गजानन ठेंगडे आदींची उपस्थिती होती.

# वीजेची उधळपट्टी दिवसा, रात्री मात्र अंधाराचा कहर

## नगरपंचायतीच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह



**■ प्रतिनिधी | मालेगाव ■**

शहरात नगरपंचायतीच्या भोंगळ व निष्क्रिय कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे गेल्या जवळपास पंधरा दिवसांपासून शहरातील विविध प्रभागांमध्ये दिवसा विद्युत खांब्यांवरील लाईट सुरू राहत असून रात्री अनेक ठिकाणी लाईट बंद राहत असल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे विशेष म्हणजे या प्रकाराची चर्चा नगरपंचायत अपडेट या सामाजिक व्हॉट्सअप ग्रुपमध्ये रोज सुरू असून या ग्रुपमध्ये नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष , नगरसेवक नगरसेविका तसेच नगर सेवीका पती नगरपंचायतीचे अधिकारी व कर्मचारी सहभागी आहेत तरीही प्रशासन मात्र गाढ झोपेत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे

दिवसा सूर्य तळपत असतानाही पोलवरील लाईट सुरू ठेवून वीजेची उघड उधळपट्टी केली जात आहे तर दुसरीकडे रात्री नागरिकांच्या सुरक्षेशी खेळ केला जात असल्याची भावना शहरात निर्माण झाली आहे जनतेच्या कराच्या पैशातून भरले जाणारे वीज बिल नगरपंचायतीकडूनच भरले जाते मग ही उधळपट्टी नेमकी कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत

त्यातच नगरपंचायतीमध्ये तब्बल चार महिने उलटूनही नियोजन नसल्याची जोरदार चर्चा शहरात रंगू लागली असून त्यामुळेच शहरातील वीज व्यवस्थेचा पूर्ण बोजवारा उडाल्याचे बोलले जात आहे लाईट कधी बंद करायचे कधी सुरू करायचे याचे कोणतेही नियोजन नसल्यामुळे संपूर्ण शहरात प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड झाल्याची प्रतिक्रिया उमटत आहे

सोशल मीडियावर रोज तक्रारी होत असताना नगराध्यक्षांसह संबंधित विभाग फक्त बघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे नगरपंचायत प्रशासन काम करते की फक्त खुर्च्या गरम करते ? असा संतप्त सवाल आता उघडपणे विचारला जात आहे

मालेगाव शहरातील नागरिकांनी तात्काळ योग्य नियोजन करून दिवसा सुरू राहणारे लाईट बंद करावेत तसेच रात्री नियमित प्रकाश व्यवस्था सुरू ठेवावी अन्यथा जनआक्रोश रस्त्यावर उतरेल असा इशारा दिला जात आहे

# जेसीआय अकोलाने वितरित केले ताक

**अकोला :** मानवीय, सामाजिक आणि सांस्कृतिक सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या महिलाच्या जेसीआय अकोला युनिक प्रियदर्शिनीच्या वतीने भक्तांना ताक वितरित करण्यात आले. पुरुषोत्तम मासाचे औचित्य साधून क्लबच्या अध्यक्ष आरती लड्ढा यांच्या पुढाकारात महिला पदाधिकाऱ्यांनी राजेश्वर मंदिरात उपस्थित होऊन राजेश्वराचे दर्शन घेतले. या नंतर मंदिरात दर्शनार्थ आलेल्या भक्तांना ताक अर्थात मठ्ठा वितरित करण्यात आला.पदाधिकारी वर्गाने शंभर भक्तांना ताकाचे पाउच यावेळी प्रदान करण्यात आले.

# शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, धर्मरक्षक आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, वाशिम शहरच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अभिवादन व मानवंदना कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमापूर्वी वाशिमच्या अग्निशामन दलाच्या सहकार्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा परिसराची विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. अग्निशामन दलाच्या वाहनाद्वारे संपूर्ण परिसर पाण्याने धुऊन स्वच्छ करण्यात आला. स्वच्छता आणि सार्वजनिक जबाबदारीचा संदेश देत शिवरायांना अभिवादन करण्यात आले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक व जलाभिषेक करण्यात आला. त्यानंतर पुष्पहार अर्पण करून उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शिवरायांना मानवंदना अर्पण केली. जय शिवराय, जय भवानीच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ऐतिहासिक महत्त्व विषद केले. ६ जून १६७४ रोजी रायगडावर झालेला राज्याभिषेक हा केवळ एका राजाचा राज्यारोहण सोहळा नसून हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचा, स्वाभिमानाच्या जागृतीचा आणि भारतीय अस्मितेच्या पुनर्स्थापनेचा ऐतिहासिक क्षण होता. शिवरायांनी न्याय, सुशासन, स्त्री सन्मान, सर्वधर्मसमभाव आणि जनकल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श निर्माण केला. भारतीय जनता पार्टी ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या राष्ट्रनिष्ठ, लोककल्याणकारी आणि विकासाभिमुख विचारांना आदर्श मानून कार्य करणारी पक्षसंस्था आहे. पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते हे स्वतःला शिवरायांचे मावळे समजून समाजहित, राष्ट्रहित आणि जनसेवेच्या कार्यात सातत्याने योगदान देत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमास भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री, जिल्हा महामंत्री गणेश खंडाळकर, जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष रामेश्वर ठेंगडे, जिल्हा कामगार आघाडी अध्यक्ष रामा इंगळे, युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्निल देशमुख, सरचिटणीस सुनील तापडिया, संदीप बैस, योगेश राजगुरू, नवीन शर्मा, सतीश खंडारे, बंटी सेठी, राजू वर्मा, शंकर देशमुख, आशिष शिवालकर आदी उपस्थित होते.

# आईचा खून करून परराज्यात पसार होण्याचा मुलाचा डाव उधळला

## रेल्वे स्थानक गाठण्यापूर्वीच आवळल्या मुसक्या ; स्थानिक गुन्हे शाखेची अतिजलद कारवाई

**■ प्रतिनिधी | अकोला ■**

बार्शिटाकळी तालुक्यातील विझोरा येथे घडलेल्या एका हृदयद्रावक आणि संतापजनक घटनेत आईचा खून करून परराज्यात पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या मुलाला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या तीन तासांत अटक करून पोलिसांच्या कार्यक्षमतेची प्रचिती दिली. कौटुंबिक वादातून जन्मदात्या आईचाच जीव घेणाऱ्या आरोपीचा पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून त्याचा पलायनाचा डाव उधळून लावला.

मिळालेल्या माहितीनुसार, ६ जून रोजी बार्शिटाकळी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विझोरा गावात एका तरुणाने आपल्या आईची निर्घृण हत्या केल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. घटनेनंतर आरोपी जंगलाच्या दिशेने पसार झाल्याने परिसरात खळबळ उडाली होती. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार विशेष शोधपथक आरोपीच्या मागावर रवाना करण्यात आले.



तपासादरम्यान आरोपीचे नाव सागर शांताराम पांडे असल्याचे निष्पन्न झाले. कौटुंबिक वादाच्या रागातून त्याने आपल्या आईचा खून केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणी बार्शिटाकळी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४४१/२०२६ दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३ (१) अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान, आरोपी राज्याबाहेर पळून जाण्याच्या तयारीत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने रेल्वे स्थानक परिसरासह शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी शोधमोहीम सुरू केली. तपासादरम्यान आरोपी एका ऑटोमधून टॉवर चौक परिसरात उतरल्याची माहिती मिळाली. त्यावरून पथकाने परिसरात सापळा रचला. जनता बाजारातून रेल्वे स्थानकाच्या दिशेने जात असताना आरोपी पोलिसांच्या नजरेस पडताच त्याला वेढा घालून ताब्यात घेण्यात आले.

गंभीर स्वरूपाचा गुन्हा करून पोलिसांना गुंगारा देण्याचा आरोपीचा प्रयत्न स्थानिक गुन्हे शाखेच्या सतर्कतेमुळे फसला. घटनेनंतर अवघ्या तीन तासांत आरोपीला अटक करण्यात आल्याने पोलिसांच्या तातडीच्या आणि प्रभावी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय जाधव, पोलीस उपनिरीक्षक दशरथ बोरकर तसेच गोकुळ चव्हाण, स्वप्निल खेडकर, राज चंदेल, धीरज वानखडे आणि मनीष ठाकरे यांनी पार पाडली.

# वाशिमच्या नाट्यगृहाला 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' नाव



- सामाजिक संघटनांच्या मागणीची दखल
- न. प. पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत एकमताने ठराव पारित
- नगरपालिकेचे सर्व स्तरातून कौतुक

**■ प्रतिनिधी | वाशिम ■**

स्थानिक अकोला नाका येथील टेम्पल गार्डन परिसरात नगर पालिकेच्या वतीने उभारण्यात आलेल्या नाट्यगृहास 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले नाट्यगृह' हे नाव देण्याचा ठराव दि. ५ जून रोजी पार पडलेल्या न. प. पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत एकमताने पारित करण्यात आला.

स्थानिक न. प. कार्यालयाच्या सभागृहात पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अनिल केंदळे हे होते. यावेळी मंचावर उपाध्यक्ष राजू भांदुर्गे, मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांची उपस्थिती होती. या बैठकीत, नुकत्याच पूर्णत्वास आलेल्या नाट्यगृहास नाव देण्याबाबतचा विषय बैठकीचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी सभेत घेतला आणि या विषयावर चर्चा करण्याचे सांगितले. यावेळी नगरसेविका श्रद्धा अमोल इंगोले यांनी सदर नाट्यगृहास स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या थोर समाज सुधारक 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले' यांचे नाव देण्याचे सुचविले. तसेच याबाबतची पार्श्वभूमी सांगताना त्यांनी नाट्यगृह बांधकामाच्या सुरुवातीपासून नाट्यगृहास क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची मागणी सामाजिक, राजकीय, कला, साहित्यिक तसेच विविध क्षेत्रातून दहा वर्षांपासून करण्यात येत असल्याचे प्रकर्षाने नमूद केले. त्यामुळे जनभावनांचा आदर ठेवत नाट्यगृहास क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याचा ठराव पारित करण्याचे सुचविले. याप्रसंगी श्रद्धा इंगोले यांच्या सूचनेला नगरसेवक राजूभाऊ वानखेडे यांनी अनुमोदन देऊन दुजोरा दिला. यानंतर उपस्थित अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्यांनी एकमताने नाट्यगृहाचे 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले नाट्यगृह' असे नामकरण करण्याचा ठराव एकमताने पारित केला. यावेळी शिवसेना उबाठा गटनेते तथा नगर सेवक गजानन दहात्रे, भाजप गटनेते संतोष मुरकुटे, नगरसेवक अनिल ताजने, अरुणा वाटाणे, करुणाताई कल्ले, कासाबाई लोनसुने, कुणाल हेडा, पूजा भालेराव, अंजली ठाकूर, माया वाघमारे, नितेश राठी, जयश्री सारडा, गजू लांडगे, निलेश जीवनानी, गणेश खंडाळकर, रेखा मापारी, वर्षा हजारे, गोकुळाबाई इंगोले, नितीन मडके, पुरण बदलानी, पूजा काळे, कृष्णाली गोरे, साबीर मिर्झा, जयश्री वानखेडे, मंदाकिनी ढवळे, सतीश वानखेडे, शेख नूर शेख शहानुर, शेख खाजाबी शेख सुरू, अहमद शहनाज बी झूल्फकार आदी नगर सेवक उपस्थित होते. अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या नाट्यगृहाचे काम पूर्णत्वास गेल्यामुळे तसेच नामकरण पूर्ण झाल्यामुळे हे नाट्यगृह लवकरच सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आता अधिक वेळ न घेता लवकरच नाट्यगृहाचे लोकार्पण करावे अशी मागणी कलाप्रेमींकडून होत आहे.

### सावित्रीच्या लेकीची दमदार भूमिका



नाट्यगृहाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव दिले जावे, यासाठी नगरसेविका श्रद्धाताई अमोल इंगोले यांनी आग्रही भूमिका घेतल्याचे दिसून आले. नाट्यगृह नामकरणाचा विषय, सभेच्या पटलावर येताच ठामपणे नामकरणाच्या मागणीची पार्श्वभूमी मांडली आणि समस्त स्त्रियांना शिक्षणाची दारे खुल्या करणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्याची खरी गरज असल्याची ठामपणे भूमिका विशद केली. त्यांच्या अभ्यासपूर्ण भूमिकेला उपस्थित सदस्यांनी दुजोरा दिला आणि एकमताने नाट्यगृह नामकरणाचा ऐतिहासिक ठराव पास झाला. यावेळी, उपस्थितांनी, तू सावित्रीची खरी लेक शोभतेस, असे म्हणत त्यांचे तोंड भरून कौतुक केले.

**- श्रद्धा अमोल इंगोले**

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९० ■ रविवार ७ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु

# राजकारणापेक्षा अर्थकारण भारी; निवडणूक थांबताच गणित बिघडले

**मेजवान्या, ऑफर्स आणि व्यवहारांच्या चर्चांना अचानक ब्रेक**

## विधान परिषद निवडणूक थंडावल्याने नेते, नगरसेवक आणि मध्यस्थांचे आर्थिक गणित कोलमडले

वर्धा । रवींद्र लाखे

चंद्रपूर-गडचिरोली-वर्धा विधान परिषद निवडणुकीने यंदा राजकीय वर्तुळात चांगलाच रंग भरला होता. मात्र ऐन रंगात भंग पडल्याने अनेकांचे राजकीयच नव्हे तर आर्थिक गणितही कोलमडल्याची चर्चा आता उघडपणे रंगू लागली आहे. निवडणूक जाहीर होताच स्थानिक स्वराज्य संस्थांतील मतदार, नगरसेवक, पदाधिकारी आणि विविध पक्षांतील कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकू लागला होता. कारण या निवडणुकीत राजकारणापेक्षा अर्थकारणाचेच पारडे जड असल्याची कुजबुज सर्वत्र सुरू होती. राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या चर्चेनुसार, अनेक नगरसेवकांना मतदानाच्या बदल्यात लाखोंच्या ऑफर्स मिळण्याची अपेक्षा होती. काही जण तर पाच ते दहा लाख रुपयांपर्यंतच्या संभाव्य व्यवहारांची आकडेमोड करत होते. नगरपरिषद निवडणुकीत झालेला खर्च आता भरून निघणार, अशी स्वप्ने अनेकांनी रंगविली होती. त्यामुळे निवडणुकीची घोषणा होताच काहींच्या आशा उंचावल्या होत्या. याच काळात स्थानिक नेत्यांमार्फत होणाऱ्या कथित आर्थिक देवाणघेवाणीचे मार्गही खुले होणार असल्याचे बोलले जात होते. वरच्या पातळीवरून येणाऱ्या रकमेतून स्वतःचा हिस्सा काढण्याची संधी मिळेल, या अपेक्षेने अनेक राजकीय मध्यस्थही सक्रिय झाले होते. मात्र निवडणूक प्रक्रियेलाच ब्रेक लागल्याने हे संपूर्ण गणित एका झटक्यात कोलमडले. निवडणुकीच्या निमित्ताने दहा-बारा दिवस चालणाऱ्या राजकीय बैठका,



मेजवान्या, हॉटेलमधील भोजन, वाहनांची रेलचेल, कार्यकर्त्यांची बडदास्त आणि मनोरंजनाचे कार्यक्रम यांनाही अचानक विराम मिळाला. त्यामुळे अनेकांच्या चेहऱ्यावर नाराजी स्पष्ट दिसून येत असल्याचे राजकीय निरीक्षक सांगतात.

विशेष म्हणजे हा प्रकार केवळ एका पक्षापुरता मर्यादित नसून सत्ताधारी भाजपपासून विरोधी काँग्रेसपर्यंत सर्वच पक्षांच्या स्थानिक पातळीवरील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण असल्याची चर्चा आहे. निवडणुकीत विचारधारा, विकास आणि जनहित यापेक्षा अर्थकारणाचीच जास्त चर्चा होत असल्याचे वास्तव पुन्हा एकदा समोर आले आहे. विधान परिषद निवडणूक होणार की नाही, यापेक्षा अनेकांना त्यातून होणाऱ्या आर्थिक उलाढालींची अधिक उत्सुकता होती, अशी उपरोधिक टीका आता राजकीय वर्तुळात ऐकायला मिळत आहे. त्यामुळे यंदाची निवडणूक रद्द झाली नसती तर अनेकांचे 'राजकीय भविष्य' नव्हे, तर 'आर्थिक भविष्य' उजळले असते, अशी मिश्किल चर्चा सध्या जिल्हाभर रंगली आहे.

# बसस्थानकाला खाजगी ट्रॅव्हल्सचा अड्डा बनवणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांचा दणका

## २०० मीटर परिसरात ट्रॅव्हल्सना नो-एंट्री; ३८ वाहनांवर कारवाई, ४६ हजारांचा दंड

वर्धा । जनमाध्यम

वर्धा शहरातील बसस्थानक परिसराला खासगी ट्रॅव्हल्स आणि लक्झरी बसचा अड्डा बनविणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांनी अखेर दणका दिला आहे. बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या तसेच वाहने उभी करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबवून ३८ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून ४६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून शहरातील बसस्थानक परिसरात ट्रॅव्हल्स, लक्झरी बस आणि अन्य खाजगी वाहने मोठ्या प्रमाणावर उभी राहत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली होती. प्रवाशांची गैरसोय वाढत असताना राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवेलाही याचा फटका बसत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या.




बसस्थानक परिसरातील अतिक्रमणासदृश परिस्थितीमुळे वाहतुकीचा वेग मंदावला होता.

या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी वाहतूक शाखेला कठोर कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार बसस्थानकाच्या प्रवेशद्वार व निर्गमनद्वारावर दररोज दोन वाहतूक अंमलदार तैनात करण्यात आले असून २०० मीटरच्या आत खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवले जात आहे.

विशेष मोहिमेदरम्यान मोटार वाहन कायदा कलम १२२/१७७ अंतर्गत ३८ वाहनांवर कारवाई करण्यात आली. तसेच ट्रॅव्हल्स आणि लक्झरी बस चालकांची बैठक घेऊन बसस्थानक परिसरात वाहने उभी न करण्याच्या आणि अवैध प्रवासी वाहतूक टाळण्याच्या कडक सूचना देण्यात आल्या.

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी वाहनचालक व नागरिकांनी नियमांचे पालन करून पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी केले आहे. ही मोहीम पुढेही सातत्याने सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

# स्मशानभूमीचा रस्ताच बंद; मृतांच्या अंतिम प्रवासालाही अडथळा

**अंतोरा आरोग्य केंद्राच्या संरक्षण भिंतीमुळे ग्रामस्थ संतप्त; माजी सरपंच लक्ष्मण धुर्वे यांचा आमरण उपोषणाचा इशारा**

आष्टी शहीद । जनमाध्यम- अंतोरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या संरक्षण भिंतीमुळे माणिकनगर स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता पूर्णपणे बंद झाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अंत्यसंस्कारासाठी जाणाऱ्या नागरिकांसमोर मोठी अडचण उभी राहिली असून एखाद्या दुःखद प्रसंगी मृतदेह स्मशानभूमीपर्यंत कसा न्यायचा, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

अप्पर वर्धा धरण प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या माणिकनगर गावाचे पुनर्वसन अंतोरा परिसरात करण्यात आले. शासनाने स्मशानभूमीसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून दिली. मात्र, त्या ठिकाणी जाणाऱ्या रस्त्यावर प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत व संरक्षण भिंत उभारण्यात आल्याने स्मशानभूमीचा मार्ग बंद झाला आहे. या प्रश्नाबाबत ग्रामस्थांसह माजी सरपंच लक्ष्मण धुर्वे यांनी अनेकदा तहसील प्रशासनाकडे पाठपुरावा केला. रस्ता तातडीने खुला करून पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी वारंवार करण्यात आली. मात्र, प्रशासनाने कोणतीही ठोस कार्यवाही केली नसल्याचा आरोप



ग्रामस्थांनी केला आहे. संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करण्याची मागणीही करण्यात आली होती.

स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग बंद झाल्याने गावकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. जिवंत माणसांसोबतच मृतांच्याही अंतिम प्रवासात अडथळे येत असतील तर ती प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली. दरम्यान, रस्ता तात्काळ खुला न झाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा माजी सरपंच लक्ष्मण धुर्वे यांनी दिल्याने प्रशासनासमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.

# स्मृतींचा ओलावा आता भक्तांच्या सेवेत

## कै. निळकंठराव भारती यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संत भोजाजी महाराज देवस्थानाला आरओ वॉटर कुलर भेट

गाडेगाव (गोसावी) । जनमाध्यम- समाजसेवा आणि श्रद्धेचा सुंदर संगम घडवत गाडेगाव (गोसावी) येथील गिरी कुटुंबाने कै. निळकंठराव भारती यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ संत भोजाजी महाराज देवस्थान येथे सुमारे ६७ हजार रुपये किमतीचा ८० लिटर क्षमतेचा आरओ वॉटर कुलर भेट दिला. या उपक्रमामुळे देवस्थानात येणाऱ्या हजारो भाविकांना स्वच्छ, शुद्ध व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध होणार आहे.

कै. निळकंठराव भारती हे सेवाभावी, समाजाभिमुख आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना समाजोपयोगी कार्य व्हावे या उद्देशाने श्रीमती सुमनबाई मधुसुदनराव गिरी यांनी हा उपक्रम राबविला. देवस्थान परिसरात आयोजित कार्यक्रमात विधिवत



पूजन करून आरओ वॉटर कुलरचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी उपस्थित भाविक आणि ग्रामस्थांनी गिरी कुटुंबाच्या या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. श्रद्धांजली ही केवळ औपचारिक न राहता समाजाच्या हितासाठी उपयुक्त ठरावी, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमाला डॉ. संदीप लोंढे, माजी सरपंच मारोतराव राजूरकर, अविनाश गिरी, संजय गिरी, प्रशांत गिरी, त्र्यंबक तळवेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. हा आरओ वॉटर कुलर कै. निळकंठराव भारती यांच्या सेवाभावी विचारांचे जिवंत स्मारक ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# रेती माफियांना संरक्षणाचा आरोप; आत्मदहनाचा इशारा

## समाजसेवक वली पठाण यांची तहसील प्रशासनावर टीका; ८ ला आंदोलनाचा इशारा

आष्टी शहीद । जनमाध्यम

आष्टी तालुक्यातील अवैध रेती उत्खननाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून तळेगाव येथील समाजसेवक वली पठाण यांनी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेत उद्या ८ जून रोजी तहसील कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. रेती माफियांना प्रशासनाकडून संरक्षण दिले जात असून सर्वसामान्य नागरिक व घरकुल लाभार्थ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

वली पठाण यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, गेल्या चार महिन्यांपासून अवैध रेती उत्खनन आणि महसूल विभागाच्या कारभारासंदर्भातील अनेक तक्रारी व बातम्या समोर येत आहेत. शासनाच्या महसुलाचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी करूनही संबंधित रेती घाटधारकांवर प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

कारवाईच्या नावाखाली केवळ दिखाऊ उपाययोजना केल्या जात असून नदीपात्रातून सुरू असलेल्या रेती वाहतुकीकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. अनेकदा वाहने पकडली जात असतानाही कठोर कारवाई होत नसल्याने अवैध उत्खननाला खतपाणी मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांना निलंबित करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. आत्मदहनाच्या इशाऱ्यामुळे प्रशासनासमोर नवे आव्हान उभे ठाकले असून या घडामोडीकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# घरफोडी करून सोन्याचे दागिने लंपास; दोन तासांतच चोरटा गजाआड

## ८० हजारांचा मुद्देमाल हस्तगत; कारंजा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

कारंजा घाडगे । जनमाध्यम

घरफोडी करून सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या चोरट्याला कारंजा पोलिसांनी अवघ्या दोन तासांत जेरबंद करत चोरीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला. या धडाकेबाज कारवाईमुळे पोलिसांच्या तत्परतेचे पुन्हा एकदा दर्शन घडले आहे.

नागाझरी येथील रहिवासी सौ. मनिषा मनोहर चोपडे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्या कुटुंबासह घराच्या स्लॅबवर झोपल्या होत्या. मध्यरात्री पाणी पिण्यासाठी खाली आल्यावर त्यांना घराचा दरवाजा उघडा दिसला. घरात जाऊन पाहिले असता आलमारीचे दार उघडे असून त्यामधील सोन्याचे मंगळसूत्र व सोन्याचे डोरले असा सुमारे ८० हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याचे आढळून आले.

तक्रार मिळताच कारंजा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरविली. ठाणेदार प्रल्हाद मदन यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. तपासादरम्यान संशयित अतुल अर्जुन मेश्राम (रा. नागाझरी) याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने चोरीची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीला अटक करून त्याच्याकडून चोरीस गेलेले सोन्याचे मंगळसूत्र व सोन्याचे डोरले असा सुमारे ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. त्यामुळे गुन्ह्याचा छडा अवघ्या दोन तासांत लावण्यात पोलिसांना



यश आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशीव वाघमारे व उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार प्रल्हाद मदन, निलेश मंडारी, अमोल मानमोडे, दिनेश घसाड, आशिष कालोकार व समाधान पांडे यांच्या पथकाने केली. पुढील तपास सुरू आहे.

# पल्सर' चोराची पोलिसांनी काढली हवा

## अवघ्या २४ तासांत आरोपी गजाआड; ८० हजारांची दुचाकी जप्त

समुद्रपूर । जनमाध्यम

दिवसाढवळ्या चोरून नेलेली पल्सर दुचाकी अवघ्या २४ तासांत शोधून काढत समुद्रपूर पोलिसांनी वाहनचोराला अटक केली. धडक तपास आणि अचूक माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेची पुन्हा एकदा प्रचिती आली



आहे.आकाश हेमराज कारमोरे यांनी आपली पल्सर दुचाकी जाम-हिंगणघाट सर्व्हिस रोडवर उभी करून ते जवळील पानटपरीवर गेले होते. काही वेळाने परत आल्यानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोधाशोध करूनही वाहनाचा मागमूस न लागल्याने त्यांनी समुद्रपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीचे गांभीर्य ओळखून समुद्रपूर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी पाईकमारी गावाजवळ फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार सापळा रचून पोलिसांनी संशयित भूषण पंजाब उईके (रा. हिंगणा) याला चोरीच्या दुचाकीसह ताब्यात घेतले. चौकशीत त्याने वाहन चोरीची कबुली दिल्यानंतर त्याला अटक करण्यात आली.

आरोपीकडून सुमारे ८० हजार रुपये किमतीची पल्सर दुचाकी जप्त करण्यात आली असून पुढील तपास समुद्रपूर पोलीस करीत आहे.

# जिल्हाधिकारी वान्मथी सी यांचा सालई येथे थेट ग्रामसंवाद

## ग्रामस्थांच्या समस्या ऐकून तत्काळ उपाययोजनांचे निर्देश, गावातील शासकीय कार्यालये व विकासकामांची पाहणी

सेलू जनमाध्यम : प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत असलेल्या 'एक दिवस ग्रामस्थांसोबत' उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांनी सेलू तालुक्यातील सालई (पेवठ) गावाला भेट देत ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी गावातील विविध शासकीय कार्यालये व विकासकामांची पाहणी करून नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या.

या ग्रामसंवाद कार्यक्रमाला सालई पेवठच्या सरपंच वच्छलाबाई तळवेकर, प्रशिक्षणार्थी आयएएस शोभीका पाठक, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी वैशाली रसाळ, तहसीलदार डॉ.शकुंतला पाराजे, गटविकास अधिकारी देवानंद पानबुडे, तालुका कृषी अधिकारी श्री.माहूले, वनपरिक्षेत्र अधिकारी रूपेश खेडकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राम वरठी, नायब तहसीलदार के.डी.किरसान यांच्यासह विस्तार अधिकारी, ग्रामसचिव व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य वर्धिनी केंद्र आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला भेट देताना जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. आरोग्य केंद्रातील सेवा, औषधसाठा तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची माहिती त्यांनी घेतली.

संवादादरम्यान ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छता, वीजपुरवठा आणि इतर मूलभूत सुविधांबाबतच्या समस्या मांडल्या. या तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

गावातील युवकांशीही त्यांनी चर्चा केली. रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ युवकांपर्यंत पोहोचविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गावातील सुरू असलेल्या विकासकामांचा आढावा घेऊन कामे गुणवत्तापूर्ण व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले.

ग्रामस्थांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून त्यावर तत्काळ निर्णय घेण्याच्या प्रशासनाच्या भूमिकेमुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. 'एक दिवस ग्रामस्थांसोबत' हा उपक्रम प्रशासन आणि जनतेतील दरी कमी करण्यास तसेच स्थानिक प्रश्न सोडविण्यास प्रभावी ठरत आहे. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्या हस्ते ग्रामपंचायत परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी ग्राम महसुल अधिकारी कृषी अधिकारी विस्तार अधिकारी, व कर्मचारी उपस्थित होते.

# महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदानाचा सामाजिक संदेश

**वर्धा जनमाध्यम** महावितरणच्या २१ व्या वर्धापन दिनानिमित्त वर्धा मंडळ कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून देण्यात



आला. जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय, सावंगी (मेघे) येथील वैद्यकीय पथकाच्या सहकार्याने आयोजित शिबिरात महावितरणच्या २५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले.वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महावितरणची सुरक्षा प्रतिज्ञा व संकल्प यांचे सामूहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वर्धा मंडळाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी होत्या. यावेळी कार्यकारी अभियंता (प्रशासन) शर्मिला इंगोले, वर्धा विभागाचे कार्यकारी अभियंता नरेश पारधी तसेच मानव संसाधन विभागाचे व्यवस्थापक प्रफुल्ल गिरी प्रमुख उपस्थित होते.

# रायगडावर पुन्हा अनुभवला शिवकाल; ३५२ वा शिवराज्याभिषेक दिन थाटात


जनमाध्यम

paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ रविवार ७ जून २०२६






**रायगड/प्रतिनिधी-** छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर शनिवारी इतिहास, परंपरा आणि शिवभक्तीचा अद्वितीय संगम अनुभवायला मिळाला. संभाजीराजे छत्रपती, संयोगिताराजे भोसले तसेच जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. राज्याच्या कानाकोप-यातून तसेच देशभरातून आलेल्या हजारो शिवप्रेमींमुळे संपूर्ण रायगड परिसर शिवमय झाला होता.

सकाळी नगारखान्यात युवराज कुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते पारंपरिक वाद्यांच्या गजरात ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर राजसदरावर शाहिरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे राजसदरावर आगमन झाल्यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते उत्सवमूर्तीचा अभिषेक करण्यात आला. राजसदरेवरील सिंहासनारूढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला. यावेळी पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली. संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थित शिवभक्तांना मार्गदर्शन करताना शिवरायांच्या विचारांचे स्मरण करून दिले. त्यानंतर निघालेला शिवराज्याभिषेक पालखी सोहळा जगदीश्वर मंदिरात पोहोचला. येथे वारकरी संप्रदायाला पंढरपूर वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान करण्यात आला. दिवसभर पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, मर्दानी खेळ, पोवाडे, कीर्तन, शिवचरित्रावरील व्याख्याने आणि लोककलांचे सादरीकरण यामुळे वातावरण भारावून गेले होते. पारंपरिक वेशभूषेतील युवक-युवती, मावळे आणि विविध सामाजिक संस्थांच्या सहभागामुळे रायगडावर शिवकालीन वैभवाचा प्रत्यय आला.

सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने मोफत बससेवा, अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था आणि आपत्कालीन सेवा उपलब्ध करून दिल्या होत्या. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी विविध ठिकाणी भेट देउन व्यवस्थेची पाहणी केली. स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देणारा आणि शिवरायांच्या विचारांचा जागर घडवणारा हा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साह, श्रद्धा आणि अभिमानाच्या वातावरणात संपन्न झाला.

## नवी मुंबई विमानतळाला शिवस्पर्श; १२ फूट ऊंच कांस्य पुतळ्याचे अनावरण

**रायगड/प्रतिनिधी-**नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल-१ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या सोहळ्याला राज्याचे वनमंत्री गणेश नाईक , महिला व बालविकास मंत्री अदिती सुनील तटकरे , आमदार प्रशांत ठाकूर , महेश बालदी , माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेडतर्फे विकसित करण्यात आलेल्या या स्मारकात ८ फूट उंच चबुत-यावर १२ फूट उंचीचा कांस्य धातूतील अर्धपुतळा उभारण्यात आला आहे. नवी मुंबईतील शिल्पकार ःत्यत्द डदृण्त्डुठुद्म क्द्भ्द्धद्दड्ढ यांनी हा पुतळा साकारला असून, महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाने मंजूर केलेल्या प्रारूपानुसार कापर ॲलाय ब्राँझ धातूमध्ये त्याची निर्मिती करण्यात आली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, दूरदृष्टी आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्याला अभिवादन करणारे हे स्मारक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक ठरणार आहे. सुमारे आठ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण झालेली ही कलाकृती विमानतळावरील प्रमुख आकर्षणांपैकी एक ठरणार असून देश-विदेशातून येणा-या प्रवाशांना शिवरायांच्या प्रेरणादायी इतिहासाची ओळख करून देणार आहे.या प्रसंगी विभागीय आयुक्त रुबल अगरवाल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयेल , विमानतळ प्रशासनाचे अधिकारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा महाराष्ट्राच्या अस्मिता आणि गौरवशाली इतिहासाला उजाळा देणारा ठरला.



## जंतरमंतरवरील आंदोलनातून अराजकता पसरवण्याची मानसिकता उघड - मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी-**देशाची राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे क?करोच जनता पक्षाने आयोजित केलेल्या आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या आंदोलनातून देशातील युवकांच्या अभिव्यक्तीचे दर्शन घडले नसून अराजकता पसरवण्याची मानसिकता समोर आल्याचे त्यांनी म्हटले आहे. आंदोलनादरम्यान करण्यात आलेली भाषणे, घोषणाबाजी आणि विविध वक्तव्यांमधून संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांनाच नाकारण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, डा. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हातात घेउन संविधानानेच उभारलेल्या संस्था, व्यवस्था आणि लोकशाही प्रक्रियेला विरोध करणे हा मोठा विरोधाभास आहे. संविधान हे केवळ पुस्तक नसून त्यातील प्रत्येक अनुच्छेदामध्ये भारतीय लोकशाहीची मूलभूत तत्त्वे सामावलेली आहेत. ही तत्त्वे नाकारणारे लोक हातात संविधानाचे पुस्तक घेउन फिरत असले तरी ते प्रत्यक्षात डा. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे आणि संविधानाच्या मूल्यांचे विरोधक असल्याची टीका त्यांनी केली. या आंदोलनातून संबंधित संघटनेचा खरा चेहरा आणि अराजकतेचे मनसुबे उघड झाले असून त्यांना कोणतेही व्यापक जनसमर्थन मिळालेले नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, सोशल माध्यमांच्या बळावर कोट्यवधी अनुयायी निर्माण करणा-या कॉकरोच जनता पक्षाने आज प्रथमच मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरून आंदोलन केले. दिल्लीतील जंतरमंतर परिसरात मोठ्या संख्येने युवक-युवती एकत्र जमले होते. त्यांनी शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत विविध मागण्या मांडल्या. या आंदोलनाचे नेतृत्व पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी केले. अमेरिकेतून दिल्लीत दाखल होताच अभिजीत दीपके यांनी आंदोलनात सहभाग घेतला. त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलनाला संबोधित केले. विमानतळाबाहेर येताना त्यांच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आत्मचरित्राचे पुस्तक होते.



## चंद्रपूरातील कॅन्सर हॉस्पिटलवर सायबर हल्ला; डेटा लॉक करून 75 लाखांची मागणी

**चंद्रपूर,/प्रतिनिधी-** : चंद्रपूर शहरातील कॅन्सर केअर फाउंडेशनच्या कॅन्सर हास्पिटलवर सायबर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हॅकर्सनी रुग्णालयाच्या मुख्य सर्व्हरमध्ये घुसखोरी करून महत्त्वाचा डेटा लाक केला असून तो अनलाक करण्यासाठी सुमारे ७५ लाख रुपयांची खंडणी मागितल्याने खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रुग्णालयाच्या आयटी विभागाला १ जून रोजी सकाळी सर्व्हरमध्ये बिघाड असल्याचे आढळून आले. प्राथमिक तपासणीदरम्यान सर्व्हरवर रॅन्समवेअरचा धमकीचा संदेश दिसून आला. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासात अज्ञात हॅकर्सनी रुग्णालयाची संपूर्ण डिजिटल यंत्रणा ताब्यात घेतल्याचे स्पष्ट झाले.




हॅकर्सनी १.२३४५६ बिटकाइन, म्हणजेच सध्याच्या बाजारमूल्यानुसार सुमारे ७५ लाख रुपयांची खंडणी मागितली आहे. ही रक्कम भरल्यानंतरच डेटा अनलाक करण्यासाठी आवश्यक की उपलब्ध करून देण्यात येईल, अन्यथा सर्व डेटा कायमचा नष्ट केला जाईल, अशी धमकीही देण्यात आली आहे.या सायबर हल्ल्यामुळे हास्पिटल इन्फार्मेशन मॅनेजमेंट सिस्टीम पूर्णपणे ठप्प झाली असून रुग्णांचा वैद्यकीय इतिहास, उपचारांची नोंद तसेच प्रशासकीय कामकाजावर गंभीर परिणाम झाला आहे. त्यामुळे रुग्णालय प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. दरम्यान, या प्रकरणी स्थानिक रामनगर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर गुन्हेगारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चंद्रपूर पोलिसांच्या सायबर विभागाकडून घटनेचा सखोल तपास सुरू असून हल्ल्यामागील आरोपींचा शोध घेतला जात आहे. डिजिटल युगात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर ही घटना आरोग्य क्षेत्रातील संस्थांसाठी धोक्याची घंटा मानली जात आहे. महत्त्वाच्या संस्थांनी आपल्या सर्व्हर आणि डिजिटल डेटाच्या सुरक्षेसाठी अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज या घटनेमुळे पुन्हा अधोरेखित झाली आहे.

## महिला अंडर-१८ हॉकी आशिया कप २०२६ : भारतीय संघाला कांस्यपदक



**टोकियो/वृत्तसंस्था-**जपानच्या काकामिगाहारा येथे शनिवारी झालेल्या महिला अंडर-१८ आशिया कप २०२६ च्या कांस्यपदकाच्या सामन्यात भारतीय अंडर-१८ महिला हॉकी संघाने कोरियाला ३-० ने पराभूत करत कांस्यपदकाची कमाई केली. भारतासाठी संदीपा कुमारी (दुस-या मिनिटाला), कर्णधार स्वीटी कुजूर (१६व्या मिनिटाला) आणि नौशीन नाझ (३३व्या मिनिटाला) यांनी गोल केले. भारतीय संघाने संपूर्ण सामन्यात आक्रमक खेळ आणि मजबूत बचावाचे उत्तम प्रदर्शन केले. उपांत्य फेरीत चीनकडून शूटआउटमध्ये झालेल्या अटीतटीच्या पराभवानंतर, भारतीय संघाने कांस्यपदकाच्या सामन्यात जोरदार पुनरागमन केले. संदीपा कुमारीने सामन्याच्या अवघ्या दोन मिनिटांत एक शानदार गोल करून भारताला आघाडी मिळवून दिली. पहिल्या गोलनंतर, भारतीय संघाने आक्रमण सुरू ठेवले आणि चेंडूवर नियंत्रण कायम राखले. याचा फायदा १६ व्या मिनिटाला झाला, जेव्हा कर्णधार स्वीटी कुजूरने मैदानी गोल करून भारताची आघाडी २-० अशी वाढवली.भारताने दुस-या हाफमध्येही आपले वर्चस्व कायम ठेवले. ३३ व्या मिनिटाला, स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारी हाकीपटू नौशीन नाझने एका शानदार मैदानी गोलने आपली आघाडी ३-० अशी वाढवली. या गोलमुळे नौशीनने स्पर्धेतील आपल्या एकूण गोलांची संख्या १२ वर नेली आणि सर्वाधिक गोल करणारी हाकीपटू म्हणून आपले स्थान आणखी मजबूत केले. भारतीय संघाने शिस्तबद्ध बचावाचे प्रदर्शन करत कोरियाला कोणतीही स्पष्ट संधी निर्माण करू दिली नाही. भारतीय हाकीपटूंनी एकही गोल होउ दिला नाही आणि सामना सहज जिंकला. उत्कृष्ट कामगिरी करत सामन्यातील पहिला गोल करणा-या संदीपा कुमारीला सामनावीर म्हणून गौरविण्यात आले. भारतीय संघाने महिलांच्या अंडर-१८ आशिया कप २०२६ मध्ये एकूण ३६ गोल केले, ज्यामुळे त्यांची मजबूत आक्रमक क्षमता, भक्कम बचाव आणि उज्ज्वल भविष्य दिसून आले.

## स्कार्पिओच्या धडकेत एक वर्षाच्या चिमुरडीसह चौघांचा मृत्यू

**जळगाव/प्रतिनिधी-**बाहेर जाउ नका असा घरच्यांनी दिलेला सल्ला न ऐकता लस्सी पिण्यासाठी घराबाहेर पडलेल्या एकाच कुटुंबातील चौघांवर काळाने भीषण घाला घातला. भरधाव चारचाकी वाहनाच्या धडकेत दुचाकीवरील चौघांचाही घटनास्थळीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना भुसावळ तालुक्यातील फुलगाव परिसरातील हिरा मारु तीजवळ घडली विजय शंकर काळे (१९), ऐश्वर्या बहाद्दूर भोसले (३०), विघ्नेश शंकर चव्हाण (१४) आणि मोनालिसा शिवबसप्पा भोसले (१) अशी मृतांची नावे असून ते सर्व मलकापूर येथील रहिवासी होते.या घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.अपघातात ठार झालेले चौघेही मूळचे मलकापूर येथील रहिवासी होते. मात्र, मजुरीच्या कामासाठी ते वरणगाव-दीपनगर दरम्यान असलेल्या कपिलवस्तीनगरात तात्पुरते राहत होते. हे चौघे जण लस्सी पिण्यासाठी दुचाकीवरून घराबाहेर पडत होते. त्यावेळी घरच्यांनी त्यांना बाहेर जाउ नका असे बजावले होते, मात्र घरच्यांचे सांगणे बाजूला ठेवून ते घराबाहेर पडले आणि फुलगाव परिसरात त्यांच्यावर काळाने झडप घातली. मृत चौघे दुचाकीने (क्रमांक ग्क्त२२ एव्र ३६८१) वरणगावकडे येत होते. याच दरम्यान, हिरा मारु तीजवळ विरुद्ध दिशेने येणा-या एका पांढ-या रंगाच्या स्कार्पिओ गाडीने (क्रमांक MH 19 EV 5353) त्यांच्या दुचाकीला अत्यंत भीषण धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की, दुचाकीवरील चौघांचाही जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर स्कार्पिओ चालक गाडी घटनास्थळीच सोडून फरार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच वरणगाव पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, फरार स्कार्पिओ चालकाचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.

## पुण्यात गॅस गळतीमुळे भीषण स्फोट; एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**बीड/प्रतिनिधी-** पुणे येथील खराडी भागात गॅस गळतीमुळे झालेल्या प्रचंड स्फोटात परळी तालुक्यातील (जि. बीड) नंदागौळ एकाच कुटुंबातील तिघांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला. खराडीतील खांदवेनगर येथील फार्च्युन सिटी सोसायटीमध्ये ही काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. सिलेंडर बदलत असताना अचानक झालेल्या या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात आणि परळी तालुक्यात मोठी शोककळा पसरली आहे.विष्णू मुंजाजी गिते (वय ६०), पांडुरंग विष्णू गिते (वय ३५) आणि वृंदावनी विष्णू गिते (वय ५५, सर्व सध्या रा. खांदवेनगर, खराडी, पुणे, मूळ रा. नंदागौळ, ता. परळी, जि. बीड) अशी या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या दुर्दैवी सदस्यांची नावे आहेत. या दुर्घटनेत राजेश्री पांडुरंग गिते आणि निहारिका पांडुरंग गिते (वय ५ वर्षे) या किरकोळ जखमी झाल्या असून त्या बालंबाल बचावल्या आहेत. हे कुटुंब कामानिमित्त पुण्यामध्ये स्थायिक झाले होते.मिळालेल्या माहितीनुसार, खांदवेनगर परिसरातील एका घराच्या पहिल्या मजल्यावर स्वयंपाकघरातील गॅस सिलेंडर संपल्याने दुसरा सिलेंडर लावण्याचे काम सुरू होते. त्याच वेळी अचानक गॅसची मोठी गळती होउन सिलेंडरने पेट घेतला. पांडुरंग गिते यांनी प्रसंगावधान राखून पेटता सिलेंडर गॅलरीतून बाहेर फेकण्याचा प्रयत्न केला, परंतु त्याच क्षणी घरात पसरलेल्या गॅसचा प्रचंड स्फोट झाला. या आगीत घरात असलेले विष्णू, पांडुरंग आणि वृंदावनी हे तिघेही गंभीररीत्या भाजले. त्याच वेळी सून राजेश्री या बाथरूममध्ये आणि पाच वर्षांची मुलगी निहारिका गॅलरीत असल्याने त्या दोघी या भीषण आगीतून सुखरूप बचावल्या.घटनेची माहिती मिळताच खराडी, येरवडा आणि धानोरी येथील अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. गंभीर जखमी झालेल्या तिघांना तात्काळ ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचार सुरू असताना दुपारी त्यांचा मृत्यू झाला. या स्फोटामुळे घरातील फर्निचर, इलेक्ट्रानिक्स वस्तू आणि छताचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेची नोंद चंदननगर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक या दुर्घटनेचा पुढील तपास करीत आहेत.

## देवस्थान इनाम कायदा स्थगित केल्याबद्दल महसूलमंत्र्यांचे आभार-हिंदु जनजागृती समिती

**मुंबई/प्रतिनिधी-**राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज नागपूर येथे महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप २०२६ हा प्रस्तावित कायदा स्थगित करण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. या मंदिरहितैषी निर्णयाचे आम्ही मन?पूर्वक स्वागत करतो. या कायद्याच्या संदर्भात मंदिर विश्वस्तांच्या बाजूने राज्यभर मंदिर विश्वस्त बैठकीत अभ्यासपूर्ण विषय मांडून, निवेदने, हरकती-सूचना, पत्रकार परिषदा, देवस्थान भूमी संरक्षण परिषदा घेउन शासनाला सकारात्मक निर्णय घेण्यास दिशा देणा-या महाराष्ट्र मंदिर महासंघ, अष्टविनायक मंदिर समिती, विश्व हिंदु परिषद आणि राज्यभरातील समस्त मंदिर विश्वस्तांचे आम्ही जाहीर अभिनंदन करतो. हा निर्णय म्हणजे सर्व मंदिर विश्वस्त आणि समस्त हिंदुत्ववादी संघटनांच्या संघटित लढ्याला आणि प्रयत्नांना आलेले मोठे यश आहे, असे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे संघटक सुनील घनवट यांनी म्हटले आहे. महसूलमंत्र्यांनी मांडलेल्या सूत्रांवर मंदिर महासंघाची भूमिका मांडताना सुनील घनवट म्हणाले की, देवस्थानच्या इनाम जमिनी पुन्हा मंदिरांना परत मिळवून देणे, वक्फ बोर्डाप्रमाणे सरकारकडून तेथील अतिक्रमणे काढून देणे, न्यायालयीन लढ्यासाठी नामांकित वकिलांचा सल्ला घेणे, आणि १००-२०० वर्षांच्या जुन्या वहिवाटींबाबत मंदिरांचे नुकसान न होउ देता जवळपासच्या परिसरात 'समान मूल्याचा' भूखंड मंदिराला देण्याची बंधनकारक तरतूद करणे, हे महसूलमंत्र्यांचे निर्णय अत्यंत स्वागतार्ह आणि मंदिर हिताचे आहेत. यासोबतच १५ ऑगस्टपर्यंतच्या सुनावणी प्रक्रियेसाठी स्थापन होणा-या अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या १५ सदस्यीय समितीत देवस्थान प्रतिनिधींना स्थान देण्याच्या भूमिकेचे आम्ही स्वागत करतो.शासनाने मंदिर हिताचे अनेक निर्णय घेतले असले, तरी हिंदू मंदिरांच्या सर्वांगीण रक्षणासाठी आमच्या मंदिर विश्वस्तांच्या ठरावातील अत्यंत महत्त्वाच्या विषयांचा या नव्या प्रक्रियेत आणि कायद्यात समावेश व्हावा, अशी आमची आग्रही मागणी आहे. भक्तांनी अर्पण केलेला निधी केवळ हिंदू धर्माचा प्रचार-प्रसार, मंदिरांचा जीर्णोद्धार आणि हिंदू समाजाच्या धार्मिक गरजांसाठीच वापरला जावा; तो कोणत्याही निधर्मी किंवा सरकारी योजनांवर खर्च केला जाउ नये. राजकीय लागेबांध्यांतून मंदिरांचा निधी वापरला जाणे थांबले पाहिजे. तसेच, राज्यातील लहान व उपेक्षित मंदिरांच्या पुनर्बांधणीसाठी मोठ्या मंदिरांतील निधीचा सुयोग्य वापर व्हावा आणि खेड्यापाड्यात निरलसपणे देवाची सेवा करणा-या गुरव आणि इतर सेवेक-यांसाठी दरमहा किमान १०,००० ते १५,००० रुपये निर्वाह निधी सुरू करण्यात यावा.



## इराणने होर्मुझमध्ये ड्रोन डागले, प्रत्युत्तरात अमेरिकेकडून तेहरानच्या रडार केंद्रांवर हल्ला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-**इराण आणि अमेरिका यांच्यातील सुरू असलेला संघर्ष पुन्हा एकदा एका गंभीर वळणावर पोहोचला आहे. अमेरिकी सैन्याने होर्मुझच्या सामुद्रधुनीच्या दिशेने डागलेले चार इराणी ड्रोन पाडले. याला प्रत्युत्तर म्हणून, अमेरिकी सैन्याने इराणी किनारी निगराणी रडार केंद्रांवर बाम्बहल्ला केला, ज्यामुळे या प्रदेशातील तात्पुरता शस्त्रसंधी धोक्यात आली आहे.अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने सोशल मीडियावर या कारवाईची पुष्टी केली आणि म्हटले की, हल्ला करणा-या ड्रोनमुळे या प्रदेशातील सागरी वाहतुकीला तात्काळ धोका निर्माण झाला होता. भविष्यातील हल्ले रोखण्यासाठी एक सुरक्षा उपाय म्हणून, अमेरिकेच्या संरक्षण विभागाने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील एका बेटासह अनेक किनारी रडार केंद्रांना लक्ष्य केले.या आठवड्याच्या सुरुवातीला झालेल्या एका हल्ल्यानंतर हा ताजा लष्करी संघर्ष झाला आहे, ज्यामध्ये इराणच्या एका ड्रोनने कुवेतच्या मुख्य विमानतळावरील प्रवासी टर्मिनलचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले होते. या हल्ल्यात एक व्यक्ती ठार झाली आणि अनेक जण जखमी झाले, ज्यामुळे विमानतळ काही काळासाठी बंद ठेवावे लागले. वाढता तणाव आणि युद्धविराम धोक्यात येण्याच्या भीतीदरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विस्कान्सिनमधील शेतक-यांसोबतच्या एका कार्यक्रमादरम्यान पत्रकारांना सांगितले की, इराणसोबतची परिस्थिती खूप चांगली आहे. त्यांनी असे संकेत दिले की, अमेरिका वाटाघाटींद्वारे किंवा कठोर भूमिकेद्वारे या मुद्द्यावर जलद आणि ठामपणे तोडगा काढेल.



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## काँग्रेसमधील 'संकटमोचक'

भारतीय राजकारणात संकटमोचकांना नेहमीच सत्तेचे सर्वोच्च पद मिळत नाही. अनेकदा त्यांचा उपयोग पक्षासाठी होतो; पण अंतिम निर्णयाच्या वेळी दुसऱ्याच नावाला प्राधान्य दिले जाते. काँग्रेसच्या अलीकडच्या इतिहासात अशा अनेक उदाहरणांची नोंद आहे. सचिन पायलट यांना राजस्थानमध्ये पक्षाचा चेहरा म्हणून पुढे आणण्यात आले होते. त्यांनी पक्षाला पुन्हा उभारी दिली; मात्र सत्तेच्या वाटपाच्या वेळी निर्माण झालेल्या असंतोषाकडे वेळेत लक्ष दिले गेले नाही. परिणामी, संघर्ष उफाळून आला. मध्यप्रदेशमध्ये ज्योतिरादित्य शिंदे यांनी पक्षासाठी मोठे योगदान दिले; पण त्यांनाही आपल्या राजकीय भविष्याबाबत अनिश्चितता वाटू लागली. त्याचे परिणाम काँग्रेसला सत्ता गमावून भोगावे लागले. या घटनांकडे केवळ व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेच्या चष्म्यातून पाहणे चुकीचे ठरेल. कर्नाटकमध्ये काँग्रेसचे निष्ठावान नेते डी. शिवकुमार मुख्यमंत्रिपदी विराजमान झाल्यानंतर हे वास्तव नव्याने पडताळून पहायला मिळाले. पक्षासाठी सातत्याने काम करणाऱ्या नेत्याला केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष नेतृत्वाची संधी दिली जाऊ शकते, हा संदेश या निमित्ताने दिला गेला आहे; मात्र हा निर्णय जितका महत्त्वाचा आहे, तितकाच धोकादायकही आहे. कारण आता शिवकुमार यांच्याकडे सबबी राहिलेल्या नाहीत. आतापर्यंत ते संघटक, रणनीतिकार किंवा संकटमोचक म्हणून ओळखले जात होते. आता त्यांना मुख्यमंत्री म्हणून परिणाम दाखवावे लागतील. जनतेला राजकीय व्यवस्थापनापेक्षा चांगले प्रशासन अधिक महत्त्वाचे वाटते. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुका त्यांच्या नेतृत्वाची पहिली मोठी परीक्षा असेल. यापुढील काळात काँग्रेसला केवळ सत्तेत राहून चालणार नाही, तर जनतेत विश्वास टिकवून ठेवावा लागणार आहे. याशिवाय शिवकुमार यांना स्वतःच्या प्रतिमेचेही व्यवस्थापन करावे लागणार आहे. आपल्या समर्थकांसाठी ते लढाऊ आणि परिणामकारक नेते आहेत; परंतु विरोधक त्यांच्यावर विविध प्रकारे टीका करत आले आहेत. मुख्यमंत्री म्हणून त्यांना अधिक संयमी, सर्वसमावेशक आणि संस्थात्मक नेतृत्व दाखवावे लागेल. राज्याचा नेता आणि पक्षाचा नेता यातील फरक त्यांनी समजून घेतला पाहिजे. या संपूर्ण प्रक्रियेकडे राष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात पाहिल्यास आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो. काँग्रेस अनेक वर्षांपासून प्रभावी प्रादेशिक नेतृत्वाच्या शोधात आहे. राष्ट्रीय पातळीवरील नेतृत्वाबरोबर राज्यांमध्ये स्वतंत्र प्रभाव असलेले नेते निर्माण करणे ही पक्षाची गरज बनली आहे. कर्नाटकमध्ये शिवकुमार, तेलंगणामध्ये रेवंथ रेड्डी, हिमाचल किंवा इतर राज्यांमधील नेतृत्वाकडे या प्रयोगांचा भाग म्हणून पाहता येईल. यशस्वी राजकीय पक्ष केवळ विचारधारेवर उभे राहत नाहीत, तर ते नेतृत्व घडवण्याच्या क्षमतेवर भर देतात. भाजपने गेल्या काही वर्षांमध्ये राज्यनिहाय नेतृत्व उभे केले. प्रादेशिक पक्षांनी तर आपापल्या राज्यांमध्ये मजबूत नेतृत्व निर्माण केलेच. काँग्रेसला राष्ट्रीय स्तरावर पुन्हा प्रभावी व्हायचे असेल, तर विविध राज्यांमधील सक्षम नेत्यांवर विश्वास ठेवावा लागेल. शिवकुमार यांची मुख्यमंत्रिपदी नियुक्ती हे त्या दिशेने टाकलेले पाऊल मानता येईल. यात एक प्रकारचा राजकीय संदेश दडला आहे, तो म्हणजे पक्षासाठी काम करणाऱ्यांना न्याय मिळू शकतो; मात्र हा संदेश विश्वासार्ह ठरवण्यासाठी पक्षाच्या इतर स्तरांवरही बदल दिसला पाहिजे. काँग्रेस खरोखरच आपल्या जुन्या चुका सुधारत आहे का, निष्ठावान आणि जनाधार असलेल्या नेत्यांना ती योग्य वेळी संधी देणार का की हा अपवाद ठरणार आहे, या प्रश्नांची उत्तरे पुढील काही महिन्यांमध्ये मिळतील. आज मात्र एवढे निश्चितपणे म्हणता येईल, की शिवकुमार यांची निवड ही एका व्यक्तीच्या राजकीय उन्नतीची कथा नसून काँग्रेसच्या आत्मपरीक्षणाची आणि संघटनात्मक पुनर्बांधणीच्या प्रयत्नांची नवी सुरुवात आहे. पुढील विधानसभा निवडणूक या प्रयोगाच्या यशापयशाचा निकाल देईल. त्या निकालावर केवळ कर्नाटकचे नव्हे, तर काँग्रेसच्या राष्ट्रीय भवितव्याचेही गणित काही अंशी अवलंबून असेल. शिवकुमार यांचे राजकीय व्यक्तिमत्त्व समजून घेतल्याशिवाय या निर्णयाचे महत्त्व लक्षात येणार नाही. कर्नाटकच्या राजकारणात ते केवळ एक प्रभावी वोक्कलिंगा नेता नाहीत, तर संघटन उभे करणारे, कार्यकर्त्यांना प्रेरित ठेवणारे आणि संकटसमयी पक्षाला आधार देणारे नेते म्हणून ओळखले जातात. भाजपच्या विस्तारवादी राजकारणाला तोंड देताना काँग्रेसला ज्या काही राज्यांमध्ये आपला प्रभाव टिकवता आला, त्यात कर्नाटक अग्रस्थानी राहिले. त्यामागे शिवकुमार यांच्या संघटनकौशल्याचा मोठा वाटा होता. २०१९ मध्ये मध्य प्रदेशातील काँग्रेस सरकार कोसळल्यानंतर आणि विविध राज्यांमध्ये आमदारफुटीचे राजकारण वाढल्यानंतर काँग्रेससाठी सर्वांत मोठे आव्हान होते ते आपल्या निवडून आलेल्या प्रतिनिधींना एकत्र ठेवण्याचे.अडचणीच्या काळात राजस्थानमधील काँग्रेस सरकार वाचवण्यासाठी आमदारांची सुरक्षित व्यवस्था करण्यापासून विविध राजकीय संकटांमध्ये पक्षाच्या हितासाठी सक्रिय भूमिका बजावण्यापर्यंत डी. शिवकुमार यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. त्यामुळेच त्यांना पक्षाचा 'संकटमोचक' अशी प्रतिमा लाभली. राजकारणात प्रतिमा केवळ भाषणांनी तयार होत नाही, तर कृतीतून घडते. शिवकुमार यांची प्रतिमा अशाच कृतीतून निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सोपवण्यामागे पक्षश्रेष्ठींनी केवळ जातीय किंवा प्रादेशिक समीकरणांचा विचार केला असे म्हणणे योग्य ठरणार नाही. त्यामागे संघटना आणि सरकार यांच्यातील दुवा मजबूत करण्याची रणनीतीही दिसून येते; मात्र मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणे आणि यशस्वी मुख्यमंत्री म्हणून स्वतःला सिद्ध करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवकुमार यांच्यापुढे अनेक आव्हाने आहेत. सर्वांत पहिले आव्हान आहे सत्ताविरोधी वातावरणाला सामोरे जाण्याचे. कोणतेही सरकार काही काळानंतर जनतेच्या अपेक्षांच्या ओझ्याखाली येते. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने, कल्याणकारी योजना, रोजगारनिर्मिती, पायाभूत सुविधा आणि महागाई यांसारख्या मुद्द्यांवर मतदार सरकारचे मूल्यमापन करतात. म्हणूनच मुख्यमंत्री म्हणून शिवकुमार यांना प्रशासनाच्या कार्यक्षमतेची छाप निर्माण करावी लागेल. केवळ पक्षसंघटना मजबूत असणे पुरेसे ठरणार नाही.

# देशात पाऊस पडेल; पण कोठे?

**अल निनोच्या प्रभावाने देशासमोर असमान पावसाचे गंभीर संकट उभे आहे. भारतात दुष्काळामुळे जितके संकट निर्माण होते, तितकेच असमान पावसामुळेही होते. काही जिल्ह्यांत पूर आणि काही जिल्ह्यांत कोरडेपणा हे भारतीय मान्सूनचे नवे वास्तव बनत चालले आहे.**



देशातील राजकीय पक्ष अजूनही जनगणना, मतदारसंघ पुनर्रचना आणि सत्तासमीकरणांच्या चर्चेत अडकलेले असताना भारतीय हवामान विभागाने दिलेला एक इशारा मात्र ग्रामीण भारतासाठी अधिक गंभीर ठरण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. २०२६ च्या नैर्ऋत्य मान्सूनचा अंदाज विभागाने पुन्हा खाली आणत तो दीर्घकालीन सरासरीच्या (एलपीए) ९० टक्क्यांवर स्थिरावला आहे. हा आकडा कागदावर फक्त दोन टक्क्यांची घट वाटत असली, तरी त्यामागे दडलेली शक्यता देशातील कोट्यवधी शेतकरी कुटुंबांसाठी अस्वस्थ करणारी आहे.

हवामान विभागाचा अंदाज प्रत्यक्षात उतरला, तर २०२६ हे वर्ष २०१५ नंतरच्या सर्वात कोरड्या मान्सूनपैकी एक म्हणून नोंदले जाऊ शकते. विशेष म्हणजे, २०१४ आणि २०१५ या सलग दोन वर्षांच्या अपुऱ्या पावसाने ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलेला फटका अजूनही विसरलेला नाही. गेल्या ११५ वर्षांच्या इतिहासात अशी सलग दोन दुष्काळी वर्षे अवघ्या चार वेळाच आली होती; मात्र यंदाच्या मान्सूनबाबत खरी चिंता पावसाच्या एकूण आकड्याची नाही. चिंता आहे ती पावसाच्या वितरणाची. कारण, भारतात दुष्काळामुळे जितके संकट निर्माण होते, तितकेच असमान पावसामुळेही होते. काही जिल्ह्यांत पूर आणि काही जिल्ह्यांत कोरडेपणा हे भारतीय मान्सूनचे नवे वास्तव बनत चालले आहे.

भारतीय मान्सूनचा २०१५ चा अनुभव या गोष्टीचा अस्सल पुरावा आहे. त्यावर्षी जून महिन्यात देशात सरासरीपेक्षा १६ टक्के अधिक पाऊस झाला होता. त्यामुळे सुरुवातीला मान्सूनबाबत आशावाद निर्माण झाला; मात्र त्यानंतर जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये पावसाने अक्षरशः पाठ फिरवली. देशाच्या अनेक भागांत पिके करपली, तर काही प्रदेशांमध्ये परिस्थिती तुलनेने समाधानकारक राहिली. म्हणजेच राष्ट्रीय पातळीवरील सरासरीने खरी परिस्थिती लपवून ठेवली होती. यंदाचा धोकाही असाच असल्याविषयी तज्ज्ञ वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, अल निनोच्या प्रभावामुळे पावसात दीर्घ खंड पडण्याची शक्यता आहे. सामान्य वर्षात सात ते आठ दिवसांचा असणारा मान्सून ब्रेक काही भागांत २० ते २५ दिवसांपर्यंत जाऊ शकतो. शेतीसाठी हा कालावधी विनाशकारी ठरू शकतो. विशेषतः मध्य भारत, महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि दक्षिण द्वीपकल्पातील प्रदेशांवर त्याचा अधिक परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे ईशान्य भारतात चांगल्या पावसाबरोबर पूरस्थितीही निर्माण होऊ शकते. म्हणजेच एका देशात एकाचवेळी दुष्काळ आणि पूर अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या स्थितीचा सर्वाधिक फटका कोणाला बसेल, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय उत्पादनाची आकडेवारी कदाचित फारशी ढासळणार नाही. देशाचे सकल उत्पन्नही मोठ्या प्रमाणावर घसरणार नाही; परंतु कोरडवाहू शेती करणारा, दोन-तीन एकर जमिनीवर उदरनिर्वाह करणारा आणि पावसाच्या प्रत्येक सरीवर अवलंबून असलेला छोटा शेतकरी मात्र सर्वात मोठा बळी ठरू शकतो. दिल्लीतील धोरणकर्ते आणि अर्थतज्ज्ञ राष्ट्रीय सरासरीच्या आकड्यांत समाधान शोधतील; परंतु ग्रामीण भारताचे वास्तव त्या आकड्यांपेक्षा खूप वेगळे असते. गावागावांतील विहिरी, करपणारी पिके, वाढणारे कर्ज आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतर हेच शेवटी मान्सूनच्या यशापयशाचे खरे मोजमाप ठरते.

यामुळे २०२६ च्या मान्सूनकडे केवळ पावसाच्या टक्केवारीच्या चष्म्यातून पाहणे धोकादायक ठरेल, असे तज्ज्ञांचे मत आहे. यंदा खरी परीक्षा पावसाच्या वितरणाची, प्रशासनाच्या तयारीची आणि ग्रामीण भारताच्या सहनशक्तीची असणार आहे. २०१५ चा इतिहास पुन्हा लिहिला जाणार की त्यातून धडा घेऊन संकटाची तीव्रता कमी केली जाणार, याचे उत्तर पुढील चार महिन्यांत मिळणार आहे.

**राजेंद्र जोशी**

# राजेश एक्सपोर्ट्सः एक 'सिस्टीम'केंद्री दृष्टिकोन!

**हा दृष्टिकोन विकसित केला पाहिजे. नाहीतर सध्याचे राज्यकर्ते बदलून, जे आपण बदलूया, नवीन राज्यकर्ते आले तरी घोटाळे घडणार. नावे बदलतील एवढाच काय तो फरक. कारण सिस्टीम तीच राहणार.**



राजेश एक्सपोर्ट्स कंपनीच्या महाघोटाळ्यावर मेंस्ट्रीम आणि सोशल मीडियावर गेले दोन दिवस चर्चा सुरू आहे.गेल्या काही वर्षात, देशात बँकिंग आणि भांडवल बाजारातील महाघोटाळे नियमितपणे उघडकीस येत आहेत. निरव मोदी, मेहुल चोक्सी, विजय मल्ल्या, संदेसरा, आय एल एफ एस, दिवाण हाऊसिंग, आयसीआयसीआय बँक, येस बँकष्ठ.अशी भली मोठी यादी आहे. या सर्व घोटाळ्यातील आकडे मोठे होतेच. पण राजेश एक्सपोर्ट्स मधील १५ लाख कोटी रुपयांचा आकडा सर्व त्या सर्वांवर कडी करणारा आहे.

आठवून बघा. अशा प्रत्येक घोटाळ्याची ब्रेकिंग न्यूज, धूमकेतूसारखी सारखी येऊन आदळते. त्यात एक अचानकपणा असतो. पण सत्य हे आहे की त्याआधी अनेक वर्षे, संबंधित व्यक्तींकडून, इमारत आतून पोखरण्याची प्रक्रिया थंड डोक्याने अनेक वर्षे पद्धतशीरपणे घडवली जाते. असह्य झाल्यावर डोलारा कोसळतो. अनेक वेळा घोटाळा फोडण्याची वेळ त्याच लोकांनी निवडलेली असू शकते. (सत्यम कॉम्प्युटर्स).

कोसळलेली इमारत पोखरणाऱ्या त्या व्यक्ती सिस्टीम नक्की कशी चालते, कायद्यातील तरतुदी किंवा पळवाटा कोणत्या याचा अभ्यास करून सर्व काही करत असतात. त्यांच्यात किंवा त्यांच्या सल्लागारात चार्टर्ड अकाउंटंट, कॉर्पोरेट लॉयर ( मर्चंट बँकर्स, क्रेडिट रेटिंग संस्था, सल्लागार कंपन्या) असे अनेक व्हाईट कॉलर प्रोफेशनल्स असतात.

हा मुद्दा मुद्दामहून अधोरेखित केला पाहिजे. कारण भ्रष्टाचार म्हटला की राजकीय नेत्यांची नावे आणि चेहरे जनतेच्या मनात येतात. पण जवळपास प्रत्येक बँकिंग, कॉर्पोरेट, वित्तक्षेत्राच्या घोटाळ्यात उच्च शिक्षित मध्यमवर्गीय प्रोफेशनल्सचा active or passive सहभाग/मार्गदर्शन असल्याशिवाय तो घडू शकत नाही. पिरियड.

घोटाळ्यातील दोषी व्यक्तींना कठोर शिक्षा झाली पाहिजे हे कोण नाकारेल. पण घोटाळे पुन्हा पुन्हा घडत असतील तर त्यात काही सामायिकपणा आहे का? त्यात काही पॅटर्न आहे का? सिस्टीम, सबंधित कायदा यामध्ये कोणत्या फटी आहेत ज्याचा गैरफायदा पुन्हा पुन्हा निरनिराळ्या संदर्भात उठवला जातोष्ठअसे प्रश्न विचारणे सयुक्तिक आहे. राजेश एक्सपोर्ट्सच्या निमित्ताने दोन निरीक्षणे.

### अपारदर्शी कॉर्पोरेट स्ट्रक्चर

असे घोटाळे बहुतांश वेळा कॉर्पोरेट समूहात घडतात. कंपन्या, त्यांच्या उपकंपन्या, उपकंपन्यांच्या उपकंपन्या असे गुंतागुंतीचे स्ट्रक्चर असते. जागतिकीकरणाच्या युगात तर मोठ्या उद्योगसमूहांच्या परदेशात नोंदीकृत झालेल्या उपकंपन्या हा न्यू नॉर्मल झाला आहे.

त्या विविध कंपन्यांमध्ये भांडवल गुंतवणूक,वस्तुमाल आणि सेवांची खरेदी विक्री होत असते, ऑफिसेस हमखास एकाच छताखाली असतात, एकच व्यक्ती अनेक कंपन्यांचे व्यवहार बघते, टॉप मॅनेजमेंट ओव्हरलॅपिंग असते इत्यादी. या सगळ्यामुळे व्यवहार अपारदर्शी होतात. डोक्यावरचे केस उपटले तरी थांग लागणार नाही. किंबहुना गुंतागुंतीचे स्ट्रक्चर करण्याचा तोच उद्देश असतो.

याचा विशिष्ट राज्यातून आलेल्या प्रवर्तकांशी काहीही संबंध नाही. आय एल एफ एस चे सर्वेसर्वा रवी पार्थसारथी, उच्च शिक्षण, प्रोफेशनलष्ठ. आय एल एफ एस च्या ३५० उपकंपन्या होत्या ष्ठआज देखील सर्वत्र हेच मॉडेल आहे. फक्त गुगल करा.

### चार्टर्ड अकाउंटंट

प्रत्येक घोटाळ्यात विविध आकडे तावातावाने चर्चिले जातात. पण ते आकडे काही कोणा जादूगाराच्या हॅट मधून आलेले नसतात.कंपनी कायद्याअंतर्गत कंपनीमध्ये येणाऱ्या आणि कंपनीतून जाणाऱ्या प्रत्येक रुपयाचा हिशोब नोंदला जातो. त्यासाठी आवश्यक ते कागदी / इलेक्ट्रॉनिक पुरावे असावे लागतात. कंपनीची हिशोबवही आणि त्यातील प्रत्येक एन्ट्री बरोबर आहे की नाही याची शहानिशा करून तसे सर्टिफिकेट 'सनद' असलेल्या चार्टर्ड अकाउंटंटला द्यावे लागते. यात काहीही अनौपचारिक नसते.

घोटाळा बाहेर आल्यानंतर आकड्या मध्ये तफावत आहे असा शोध लागतो. पण त्या सर्व काळात कंपनीने नेमलेला, कंपनीकडून महाकाय फी घेतलेला, सनदी चार्टर्ड अकाउंटंट काय करत होता याबद्दल फारशा चर्चा होत नाहीत. शिक्षा वगैरे दूरच.

देशातील चार्टर्ड अकाउंटंटची असोसिएशन (ICAI) त्या व्यवसायासाठी सेल्फ रेग्युलेटर म्हणून काम करते. त्याला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. एखाद्या कंपनीतील घोटाळा बाहेर आल्यानंतर त्या कंपनीला चार्टर्ड अकाऊंट सेवा पुरवणाऱ्या सीए फर्म, कंपन्या, व्यक्ती यांचे ही असोशिएशियन नक्की काय करते?कोणाला काही माहीत आहे का?

आर बी आय, सेबी या नियामक मंडळांची नावे घेतली जातात. पण ICAI या सेल्फ रेग्युलेटरचे नाव घेतले जात नाही.

असे सिस्टीम केंद्री प्रश्न सार्वजनिक व्यासपीठांवर सतत तेवत ठेवले पाहिजेत. त्यातून हस्तक्षेपाच्या जागा पुढे येऊ शकतील. नाहीतर भ्रष्टाचाराची मुळे भ्रष्ट व्यक्ती मध्ये असतात असे म्हणणाऱ्या अण्णा आणि आपल्यात काही फरक राहणार नाही.

**-संजीव चांदोरकर**

# केरळमध्ये वेगळाच 'खेला'...?



एके काळी पेरुंबावूरच्या औद्योगिक परिसराची ओळख असलेला यंत्रांचा आवाज आता जवळजवळ नाहीसा झाला आहे. अनेक स्थलांतरित कामगार काही महिन्यांपूर्वीच आपापल्या 'गावी' परत गेल्यामुळे ८०% पेरुंबावूरमध्ये शुकशुकाट झाला होता. वर्षानुवर्षे, केरळच्या एर्नाकुलम जिल्ह्यातील पेरुंबावूर हे राज्यातील सर्वात मोठ्या औद्योगिक केंद्रांपैकी एक म्हणून ओळखले जात होते. हजारो स्थलांतरित कामगार पेरुंबावूरच्या अर्थव्यवस्थेचा कणा होते. मात्र, आज एके काळी अहोरात्र चालणारे अनेक प्लायवूड कारखाने एका वेगळ्याच वास्तवाला सामोरे जात आहेत. न वापरलेल्या लाकडाचे ढिग, निष्क्रिय यंत्रसामग्री आणि बंद झालेली उत्पादन युनिट्स ही आता सर्वसामान्य दृश्ये झाली आहेत.

कारण माहीत आहे? आसाम आणि बंगाल मध्ये झालेले SIR व त्यामुळे केरळमध्ये झालेला तीव्र कामगार तुटवडा.हे संकट तेव्हा सुरू झाले, जेव्हा मोठ्या संख्येने स्थलांतरित कामगार आपली ओळखपत्रे व आपले बेकायदेशीर अस्तित्व सिद्ध करण्यासाठी विशेषतः पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये गेले. अनेक महिने उलटूनही, त्यातील जवळपास ९५% लोक अद्याप परत आलेले नाहीत! पेरुंबावूरच्या प्रमुख उद्योगांपैकी एक असलेल्या प्लायवूड उत्पादन क्षेत्रावर याचा सर्वाधिक परिणाम जाणवत आहे. हा 'धंदा' प्रामुख्याने कोण करत होते हे मी सांगायला नको. परिणाम कारखान्यांपुरते मर्यादित नाहीत, तर कामगारांच्या कमतरतेचे परिणाम उत्पादन क्षेत्राच्या पलीकडेही पसरले आहेत. पेरुंबावूरमधील बांधकाम प्रकल्प, हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, किरकोळ विक्रीची दुकाने आणि लहान व्यवसाय (यात ही प्रामुख्याने मल्याळी पण 'तेच' आहेत) या सर्वांनी कमी झालेल्या मनुष्यबळामुळे अडचणी येत असल्याचे कारण सांगत 'धंदे' बंद केलेत. स्थलांतरित मजुरांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेली अनेक क्षेत्रे आपले सामान्य कामकाज चालू ठेवण्यासाठी संघर्ष करत आहेत. जर कामगार लवकर परत आले नाहीत, तर 'स्थानिक व शेजारच्या देशातील अर्थव्यवस्थेला' हा मोठा धक्का असणार आहे.

या 'स्थलांतरित कामगारांच्या कल्याणकारी संघटनांच्या' (लाल बावटे) प्रतिनिधींच्या मते,मतदार यादीतील बदल आणि त्यांच्या मूळ राज्यांमधील स्थानिक राजकीय घडामोडींसंबंधीच्या चिंतेमुळे अनेक कामगार यावर्षी मूळ राज्यात नव्हे, तर तिकडून थेट 'मायदेशी' परतलेत! त्यातही, भारतीय रेल्वेच्या विशेष रेल्वे सेवांमुळे त्यांचा जो 'परतीचा प्रवास' सोपा करण्यात आला होता, त्यामुळे नेहमीपेक्षा जास्त संख्येने कामगार केरळ सोडून गेले. मोदी सरकारने त्या सर्व रेल्वे सेवा रिटर्नसाठी मात्र मतदानाच्या दिवशीच बंद केल्या. दुष्ट कुठले..

पेरुंबावूरमध्ये जे पाहायला मिळत आहे, तशीच स्थिती केरळमध्ये अजून काही मोठ्या 'क्लस्टर्स' मध्ये बघायला मिळत आहेत. बंगाल,आसाम मध्ये मतदान झाले, मग ईद झाली, आता वाहतुकीच्या अडचणी पण कमी झाल्या तरी पेरुंबावूरमधून गेलेली लोकं काही परत येईनात!सणाचे निमित्त करून आणि परत येण्याच्या प्रवासासाठी घेतलेले पैसे पण डुबले.मग हे कामगार परत का येत नाहीयेत?

कारण ते मुळात भारतीय नव्हतेच! काँग्रेस-शासित असो की कम्युनिस्ट सरकार, त्यांना प्रचंड भीती आहे की ते पकडले गेले तर त्यांची अवस्था अजून वाईट होणार. जे काही कमी-जास्त इकडे कमवून ठेवले ते आणि थोडंफार आपल्या स्वधर्मीय मालकांना चुना लावून, ते 'मायदेशी' गेले.

तसे तर केरळ मधील लाखो स्थानिक (भारतीय नागरिक असलेल्या) बेरोजगार, गरजू युवकांना ही लोक नोकरी देऊ शकतात. देतील आता. या युवकांचा हक्क एवढी वर्षे बांगलादेशी घुसखोर मारत होते. ते बांगलादेशी परत येत नाही, किंबहुना आसाम बंगाल व केंद्र सरकार त्यांना येऊच देत नाही. याचा स्थानिक केरळी जनतेला आनंद आहे. आसाम, बंगालच्या SIR चे सकारात्मक पडसाद दक्षिणेतील केरळमध्ये ठळकपणे दिसत आहेत! भाजप आपली पाळेमुळे घट्ट करत आहे. ३ आमदारांचे ८३ होण्याची तयारी आहे ही. २०३१ साठीचे EVM २०२६ मध्ये हॅक होत आहे...

**- वेद कुमार**

## 'टेंपल बॉन्ड्स योजना' म्हणजे मंदिरांचे व्यापारीकरण!

मंदिरे ही चैतन्याचे स्रोत आणि अध्यात्मिक ऊर्जेचे भांडार आहे. त्यामुळे मंदिरांचे संरक्षण, संवर्धन आणि पावित्र्य टिकवून ठेवणे अत्यंत आवश्यक असते. असे म्हटले जाते की सत्ययुगात धर्म चार पायांवर, त्रेतायुगात तीन पायांवर द्वापार युगात दोन पायांवर आणि कलियुगात एकाच पायावर उभा आहे. सांप्रत धर्माविषयी फार अनास्था दिसून येते. कर्नाटकात स्टॅलीनसारखे नेते हिंदू धर्मावर अगदी खालच्या पातळीला जाऊन गलिच्छ टीका करतात.बालाजीच्या मंदिरात चरबीयुक्त तुपाचा प्रसादाच्या लाडवांसाठी वापर केला गेला. शिर्डी संस्थानचा कारभार लोकाभिमुख नाही असे बोलले जाते.टेंपल बाँड्स योजना म्हणजे मंदिरांना आर्थिक उत्पन्नाचे स्रोत या भूमिकेतून त्या विषयी विचार करणे म्हणजेच एका अर्थाने त्यांचे व्यापारीकरण करणे.एकदा का व्यापारीकरण झाले की मंदिर परिसरात मॉल, हॉटेल, मद्यालये उभी राहतील. मंदिरे ही पर्यटन केंद्रे असता कामा नयेत.मंदिराचे पावित्र्य भंग होईल अशी कोणतीही कृती दर्शनार्थींकडून होता कामा नये यासाठी महाराष्ट्रात काही मंदिरांतून दर्शन घेताना 'वस्त्र संहिता' म्हणजे पोशाखा विषयीची आचारसंहिता लागू केली आहे. मंदिरांकडून आर्थिक लाभाची अपेक्षा न करता मंदिरांना त्यांचे पवित्र्य राखण्यासाठी सहाय्य करायला हवे.

**संध्या काटदरे**

## आनंदी देशांमध्ये भारत कुठे?

वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्ट २०२६ च्या नुसार, भारताचा क्रमांक ११६ आहे. हे वर्ल्ड हॅपिनेस रिपोर्टच्या नवीनतम आवृत्ती २०२६ मध्ये आहे, ज्यात १४७ देशांचा समावेश आहे. भारताचे जीवन मूल्यमापन स्कोअर ४.५३६ आहे. गेल्या वर्षी २०२५ मध्ये भारत ११८ व्या क्रमांकावर होता, तर २०२४ मध्ये १२६ व्या स्थानावर होता. म्हणजेच भारताने सलग सुधारणा दाखवली आहे. पण तरीही तो अनेक शेजारी देशांच्या मागे आहे. या अहवालात आनंदी देशांची यादी फिनलँडने प्रथम क्रमांक कायम राखला आहे. त्यानंतर आयलँड, डेन्मार्क, कोस्टारिका इत्यादी नॉर्डिक आणि काही लॅटिन अमेरिकन देश आघाडीवर आहेत. भारताची स्थिती माध्यम ते खालच्या स्तरावर आहे, ज्यात अनेक आफ्रिकन आणि आशियाई देशांसोबत भारताची तुलना होते. पाकिस्तान १०४ व्या क्रमांकावर आहे. म्हणजे पाकिस्तान भारतापेक्षा बारा स्थानांनी पुढे आहे.

**प्रा. मधुकर चुटे**

रविवार, दि. ७ जून २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# जिल्हाधिकाऱ्यांच्या धडाक्यानंतर रेती माफियांना दणका!

## बाभुळगाव पोलिसांची मोठी कारवाई,१७.४७ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन गुन्हे दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ गौरव तातेड

**बाभुळगाव, दि. ६ : जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या आकस्मिक भेटीनंतर बाभुळगाव तालुक्यात अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरोधात प्रशासनाने आक्रमक मोहीम सुरू केली असून बाभुळगाव पोलीस व महसूल विभागाने संयुक्तपणे केलेल्या धडक कारवाईत दोन स्वतंत्र प्रकरणांत तब्बल १७ लाख ४७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे रेती माफियांमध्ये खळबळ उडाली असून संबंधितांविरुद्ध दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**



दि. ५ जून रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजता पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक पेट्रोलिंग करत असताना नायगाव परिसरात एमएच ३६ एफ ०५१९ क्रमांकाचा ट्रक संशयास्पदरीत्या रेती वाहतूक करताना आढळून आला. चालक अमन गजानन इंगळे (वय २४, रा. नायगाव) याच्याकडे रेती वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. पंचासमक्ष तपासणी केली असता ट्रकमध्ये सुमारे ३ ब्रास गौण खनिज रेती आढळली. याप्रकरणी ७ लाख रुपये किमतीचा ट्रक आणि १५ हजार ४८९ रुपये किमतीची रेती असा एकूण ७ लाख १५ हजार ४८९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ट्रक मालक आशीष सुभाषराव कारमोरे (रा. तळेगाव दशासर) व चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच दिवशी महसूल विभागाला तांबा येथील वर्धा नदी परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध रेतीसाठा केल्याची माहिती मिळाली. ग्राम महसूल अधिकारी नंदकिशोर पाडेन यांनी घटनास्थळी पाहणी केली असता शेख राहिल शेख मुनुस (वय ३०, रा. बाभुळगाव) याने नदीपात्रातून अवैधरित्या उत्खनन करून तब्बल २०० ब्रास रेतीचा साठा करून ठेवल्याचे निदर्शनास आले. प्रति ब्रास ५ हजार १६३ रुपये दरानुसार या रेतीची किंमत १० लाख ३२ हजार ६०० रुपये इतकी असून ती वाहतुकीसाठी साठवून ठेवण्यात आल्याचे तपासात समोर आले. या प्रकरणीही संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास बाभुळगाव पोलीस करीत असून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानंतर तालुक्यात अवैध रेती माफियांविरोधातील कारवाई आणखी तीव्र करण्यात आली आहे. प्रशासनाच्या या धडक मोहिमेमुळे रेती तस्करांचे धाबे दणाणले असून जप्त करण्यात आलेला रेतीसाठा शासनाच्या नियमानुसार घरकुल लाभार्थ्यांना वितरित केला जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# वाघाचा हल्ला दुधाळ गायीचा फडशा..! रुईकोट शिवारात दहशत

## वनविभागाकडून पंचनामा सुरू, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. ६ :** झरी येथून जवळ असलेल्या रुईकोट शिवारात दिवसा ढवळ्या वाघाने गोठ्यात बांधून ठेवलेल्या दुधाळ गायीवर हल्ला करून तिला ठार केल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रुईकोट शिवारातील सिंचन तलावाजवळ शेतकरी जगदीश लहान भुमन्ना बाजनलावार यांच्या शेतातील गोठ्यात गाय बांधलेली होती. दुपारी सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास वाघाने गोठ्यात शिरून गायीवर हल्ला केला. हल्ल्यात गायीचा जागीच मृत्यू झाला. मृत गाय दुधाळ असून तिची अंदाजे

### दिवसा झालेल्या हल्ल्याने चिंता वाढली

**रुईकोट परिसरात वाघाचा वावर यापूर्वीही दिसून आला होता. मात्र, दिवसा गोठ्यातील जनावरावर हल्ला झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली असून शेतात काम करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.**



किंमत ३० हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. नेहमीप्रमाणे जगदीश बाजनलावार शेतात गेले असता त्यांना गायीचा फडशा पडलेला दिसून आला. दरम्यान, परिसरातील काही शेतकऱ्यांनी वाघाला गायीवर हल्ला करताना पाहिले. त्यांनी आरडाओरड केल्याने वाघ तेथून जंगलाच्या दिशेने निघून गेला. घटनेची माहिती मिळताच वनविभाग मुकुटबनच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत पंचनामा प्रक्रिया सुरू केली. या भागात वाघाचा वावर वाढल्याने शेतकरी व नागरिकांनी वनविभागाने तातडीने उपाययोजना करून गस्त वाढवावी, अशी मागणी केली आहे.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शिवसेना (उबाठा) आक्रमक..!

## बाभुळगावात चक्काजाम आंदोलन,तहसीलदारांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. ६ :** शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बुधवार, दि. ४ जून रोजी बाभुळगाव येथे चक्काजाम आंदोलन केले . या आंदोलनाची मागण्यांचे निवेदन पक्षाच्या शिवसैनिकांनी तहसीलदार, बाभुळगाव यांना दिले आहे.



**अशा आहे प्रमुख मागण्या**

शिवसेनेच्या निवेदनात शासनाच्या धोरणाविरोधात खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत:

यात पिक विमा तत्काळ द्या:पिक विमा योजनेतून यवतमाळ जिल्हा वगळण्यात आला आहे. त्याची पुन्हा नोंद करून शेतकऱ्यांना पिक विमा तातडीने मिळून द्यावा. खताचा पुरवठा नियमित करा, खत दरवाढ तात्काळ रद्द करून खताचा पुरवठा नियमित करावा.

सरसकट कर्जमाफी,शेतकऱ्यांची कर्जमाफी अजूनही झाली नाही. तात्काळ सरसकट कर्जमाफी करण्यात यावी.

वीजबिलात सवलत व नियमित पुरवठा ग्रामीण भागात वीजबिल तिप्पट येत असूनही वीजपुरवठा नियमित होत नाही. वीजपुरवठा नियमित करून बिलात सवलत द्यावी व नवीन मीटर लावू नयेत.

**घरकुलचे हप्ते द्या:** गेल्या तीन ते चार महिन्यांपासून घरकुलचे हप्ते लाभार्थ्यांना मिळाले नाहीत. ते त्वरित जमा करावेत.

**प्रोत्साहनपर रक्कम:**जुन्या कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम त्वरित द्यावी. या निवेनावर तालुका प्रमुख गजानन पांडे, ता. संघटक सागर धवणे, अजय जुन्नाके युवा शहर प्रमुख, प्रणित येवतकर, प्रदीप तडसकार, स्वप्नील दातार,रमेश पेरकुंडे, अमोल उनपाणी, राजेंद्र तायडे, विलास गुल्हाने, अरुण खडसे, अशोक शेंडे, आदीं शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# महाविद्यालय फोडून संगणक लंपास करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश..!

## एलसीबीच्या सापळ्यात मुख्य आरोपी जेरबंद ३० हजारांचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ६ :** महागाव येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात घरफोडी करून संगणक, प्रिंटर व इतर साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून मुख्य आरोपीला अटक करून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे महागाव परिसरातील घरफोडी प्रकरणाचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे.



महागाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कला व वाणिज्य महाविद्यालयाचा दरवाज्याचा कडी-कोंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी संगणक, प्रिंटर व इतर साहित्य चोरी करून नेल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी महागाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २१९/२०२६ अन्वये कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवली. तपासादरम्यान सुरज प्रकाश पवार (वय २४, रा. फुकटनगर, महागाव) व त्याच्या तीन साथीदारांनी हा गुन्हा केल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी महागाव बाजारपेठ परिसरात सापळा रचून सुरज पवार याला ताब्यात घेतले. सुरुवातीला त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली; मात्र कसून चौकशी केल्यानंतर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर आरोपीच्या सांगण्यावरून दोन सीपीयू, एक मॉनिटर, एक प्रिंटर, की-बोर्ड व माऊस असा सुमारे ३० हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत घरफोडी प्रकरणातील एकूण चार आरोपी निष्पन्न झाले असून मुख्य आरोपीला पुढील तपासासाठी महागाव पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धिरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

## थोडक्यात

### विदर्भाच्या मातीतून राष्ट्रीय भरारी..!

**हृषीकेश मेंडोले यांची देशातील अव्वल युवा उद्योजकांमध्ये झेप**

**राळेगाव :** देशातील प्रतिष्ठेच्या "Success & Achievement of ४० Under ४० India २०२६ Leaders" या मानांकित यादीत राळेगाव येथील युवा उद्योजक हृषीकेश मेंडोले यांनी ११ वे स्थान पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, मागील वर्षी ते १२ व्या क्रमांकावर होते. त्यांच्या या यशामुळे राळेगाव तालुका व यवतमाळ जिल्ह्याचा गौरव वाढला आहे.



जिल्हा परिषद शाळेतून प्राथमिक शिक्षण घेतलेल्या हृषीकेश मेंडोले यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर यशाचा मार्ग तयार केला. माध्यमिक व उच्च शिक्षण नाशिक आणि पुणे येथे पूर्ण केल्यानंतर त्यांनी उद्योग क्षेत्रात प्रवेश केला. आपल्या दूरदृष्टी, नेतृत्वगुण आणि नाविन्यपूर्ण कार्यपद्धतीच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख निर्माण केली. आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यवतमाळच्या मातीतूनही राष्ट्रीय पातळीवरील सक्षम नेतृत्व घडू शकते, हे त्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. ग्रामीण भागातील युवकांसाठी त्यांचा प्रवास प्रेरणादायी ठरत असून, ध्येय निश्चित करून सातत्याने प्रयत्न केल्यास मोठे यश मिळवता येते, असा संदेश त्यांच्या कर्तृत्वातून मिळतो. हृषीकेश मेंडोले यांच्या या यशाबद्दल सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व व्यावसायिक क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### मुकुटबन येथे जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा..!

**वृक्षारोपणातून संवर्धनाचा संदेश**

**झरी :** बिरला कॉर्पोरेशन लिमिटेड (युनिट आरसीसीपीएल, मुकुटबन) आणि 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. युनिट हेड सुनील सुद, एचआर हेड जितेंद्र कुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेचे संयोजक डॉ. गोगुलवार यांच्या नियोजनातून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी दिलीप मिश्रा, सुदीप द्विवेदी, श्विजय चौहान, मुकेश तिवारी, अजय निर्वाण, शैलेंद्र, हिरापूरच्या सरपंच अर्चना पाईलवार, धर्मेंद्र पात्रा, विजय कांबळे, संतोष पाईलवार तसेच उपसरपंच लक्ष्मीबाई गोडे उपस्थित होते. मान्यवरांनी पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपणाचे महत्त्व, जलसंधारण, स्वच्छता आणि शाश्वत विकास याविषयी मार्गदर्शन केले. यानंतर उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला. प्रत्येक नागरिकाने अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भावना वऱ्हाटे यांनी केले.आम्ही आमच्या आरोग्यासाठी' संस्था व विकास गंगा समाजसेवी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेत हरित, स्वच्छ व निरोगी भविष्यासाठी योगदान देण्याचा संकल्प केला.

# आटलेल्या जलस्रोतांमुळे वन्यजीवांचे मानवी वस्त्यांकडे स्थलांतर..!

## राळेगाव परिसरात हरिण, रानगवे अन् माकडांचा वाढता वावर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ अरविंद तेलंगे

**राळेगाव, दि. ६ :** राळेगाव तालुक्यातील सराटी, बोराटी, दुर्ग आणि लगतच्या विस्तीर्ण वनक्षेत्रात यंदाच्या तीव्र उन्हाळ्याने वन्यजीवांसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण केला आहे.



वाढत्या तापमानामुळे जंगलातील नैसर्गिक पाणवठे आणि जलस्रोत कोरडे पडल्याने पाणी व अन्नाच्या शोधात वन्यजीवांना जंगल सोडून मानवी वस्त्यांचा आधार घ्यावा लागत आहे. परिणामी राळेगाव शहरासह ग्रामीण भागात हरिण, रानगवे, माकडे आणि इतर वन्य प्राण्यांचा वावर लक्षणीयरीत्या वाढला आहे. गेल्या काही दिवसांपासून माकडांचे मोठे कळप शहरातील वसाहती, शेतजमिनी आणि झाडांवर दिसून येत आहेत. अन्न व पाण्याच्या शोधात हे कळप थेट मानवी वस्त्यांपर्यंत पोहोचत असल्याने नागरिकांचेही लक्ष वेधले जात आहे. दरम्यान, कापसी मार्गावर हरिणांच्या कळपाचे दर्शन झाल्याने परिसरात आश्चर्य व्यक्त करण्यात आले. याशिवाय रानगवे, जंगली वराह आणि अन्य वन्यजीवही शहरालगतच्या भागात वारंवार आढळत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. जून महिन्याची सुरुवात होऊनही उष्णतेची तीव्रता कायम असल्याने जंगलातील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. नैसर्गिक जलस्रोत आटल्यामुळे वन्यजीवांना पाण्यासाठी अनेक किलोमीटरची भटकंती करावी लागत असून, त्यातूनच ते मानवी वसाहतींच्या दिशेने वळत आहेत. वन्यजीवांच्या या वाढत्या हालचाली पर्यावरणीय असंतुलनाचे आणि बदलत्या हवामानाचे गंभीर संकेत मानले जात आहेत. पर्यावरण तज्ज्ञांच्या मते, जंगलातील जलस्रोतांचे संवर्धन, कृत्रिम पाणवठ्यांची उभारणी आणि उन्हाळ्यात वन्यजीवांसाठी पिण्याच्या पाण्याची शाश्वत व्यवस्था करणे ही काळाची गरज बनली आहे. अन्यथा वन्यजीव आणि मानव यांच्यातील संघर्षाचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे शेतकरी वर्गही पावसाच्या प्रतीक्षेत आहे. शेतातील पूर्वमशागतीची कामे पूर्ण करून शेतकरी आकाशाकडे आशेने पाहत आहेत. ७ जूनपासून मृग नक्षत्रास प्रारंभ होत असला तरी बदलत्या हवामानामुळे पावसाचे आगमन नेमके कधी होणार, याबाबत अनिश्चितता कायम आहे. त्यामुळे शेतकरी, पशुपालक आणि वन्यजीव अशा सर्वच घटकांची नजर आता पहिल्या पावसाच्या सरींकडे लागली आहे. पावसाचे आगमन झाल्यानंतर कोरडे पडलेले पाणवठे पुन्हा भरतील, जंगलाला नवसंजीवनी मिळेल आणि पाण्यासाठी भटकणाऱ्या वन्यजीवांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तोपर्यंत मात्र तहानलेल्या जंगलाची ही शहराकडे सुरू असलेली धाव चिंतेचा विषय ठरत आहे.

# हिवरा (सं) येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ६ :** हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय यांचा शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. अठरा पगड जातीच्या मावळ्यांना घेऊन रयतेचे राज्य निर्माण करून ६जुन १६७४साली छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा संपन्न होवुन यवनी राजवटीच्या गर्द छायेत मराठी जणांचे स्वतंत्र स्वराज्य निर्माण झाले.या ऐतिहासिक सुवर्ण क्षणाला आज ३५२वर्षे उलटुन गेली .छत्रपती शिवरायांचा हा राज्याभिषेक दिनाचा सोहळा मोठ्या दिमाखात सर्वत्र साजरा केला होत असताना महागाव तालुक्यातील हिवरा(संगम) येथे छत्रपती शिवराय पुतळा उत्सव समितीच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमांचे अध्यक्ष माजी जि. प.सदस्य साहेबराव पाटील कदम हे होते तर प्रमुख अतिथी म्हणुन सेवानिवृत्त मुख्याध्यापक मुकुंद पांडे, सरपंचा मेघा बोरुळकर,उपसरपंच शरद पाटील,ज्येष्ठ पत्रकार विजयराव



बोंपिलवार, हिवरा पत्रकार संघाचे अध्यक्ष भगवानराव फाळके, माजी सरपंच धोंडेराव बोरुळकर,प्रविण जामकर,ग्रा.पं. सदस्य पंजाबराव पाटील, यांच्यासह शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे पुजन करून माल्यार्पण करण्यात येवुन अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन पत्रकार राजु गिरी यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी छत्रपती शिवराय पुतळा उत्सव समितीचे अध्यक्ष देवेंद्र कदम,उपाध्यक्ष सुनिल चव्हाण,सचिव महेश कामारकर,कोषाध्यक्ष मुकुंद जामकर,सहसचिव प्रवीण जामकर,सदस्य शेख फिरोज,अनिल मुडेवाड,किरण काळे यांनी अथक परिश्रम घेतले.

# ग्रामपंचायत इमारतीसाठी २५ लाख मंजूर..! जागेअभावी काम ठप्प!

## फुलसावंगीतील विकासाला प्रशासनाच्या दिरंगाईचा ब्रेक,निधी परत जाण्याची भीती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले

**फुलसावंगी, दि. ६ :** महागाव तालुक्यातील सर्वात मोठी १७ सदस्यीय ग्रामपंचायत असलेल्या फुलसावंगी येथे नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकामाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत सन २०२५-२६ मध्ये ग्रामपंचायत इमारतीसाठी तब्बल २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून, ई-निविदा प्रक्रिया देखील सुमारे तीन महिन्यांपूर्वी पूर्ण झाली आहे. मात्र आजपर्यंत बांधकामासाठी जागा उपलब्ध करून न दिल्याने प्रत्यक्ष कामाला सुरुवात होऊ शकलेली नाही. सदर कामाची निविदा फुलसावंगी येथील प्रशांत कन्स्ट्रक्शन या संस्थेला प्राप्त झाली आहे. तरीदेखील ग्रामपंचायत प्रशासनाकडून प्रस्तावित इमारतीसाठी जागा निश्चित करून बांधकाम संस्थेला ताब्यात देण्यात आलेली नसल्याने मंजूर निधी वापराविना पडून आहे.

> **फुलसावंगी ग्रामपंचायतला स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध आहे. ग्रामपंचायतीने ती जागा तातडीने उपलब्ध करून देऊन शासनाच्या मापदंडानुसार इमारतीचे बांधकाम पूर्ण करावे.**
>
> **-डी. एस. कदम**
> **गटविकास अधिकारी, महागाव**

परिणामी गावातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, वेळेत निधी खर्च न झाल्यास तो शासनाकडे परत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. फुलसावंगी हे तालुक्यातील मोठे व महत्त्वाचे गाव असतानाही आजपर्यंत ग्रामपंचायतीची स्वतंत्र, प्रशस्त व सर्व सुविधांनी युक्त इमारत उभी राहू शकलेली नाही. तालुक्यातील अनेक लहान गावांमध्ये आधुनिक ग्रामपंचायत इमारती व सभागृह उभारण्यात आले असताना फुलसावंगीसारख्या मोठ्या गावातील मंजूर काम केवळ जागेच्या प्रश्नामुळे रखडल्याने विकास प्रक्रियेलाच खीळ बसल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने जागेचा प्रश्न निकाली काढून मंजूर निधीचा योग्य वापर करावा व नवीन ग्रामपंचायत इमारतीचे बांधकाम त्वरित सुरू करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गावाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या प्रकल्पाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **"मी आणि तत्कालीन सरपंच सारजाबाई ग. वाघमारे यांनी ग्रामपंचायत सचिव विनोद चव्हाण यांना वारंवार नियोजित जागा उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केल्या होत्या. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. आज ग्रामपंचायतीवर प्रशासक असतानाही या विषयाकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे दिसते. आमच्या सूचना वेळेत मान्य झाल्या असत्या तर आज इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असते.**
>
> **- कुणाल नाईक**
> **उपसरपंच, फुलसावंगी**

> **नवीन ग्रामपंचायत इमारत बांधकामामध्ये होत असलेला विलंब प्रशासनाने तातडीने संपुष्टात आणावा. गावाच्या विकासासाठी मंजूर झालेल्या ग्रामपंचायत इमारतीचे काम त्वरित सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.**
>
> **- शमशेर लाला**

# विदर्भ साहित्य संघ यवतमाळ शाखेच्या अध्यक्षपदी डॉ. सतपाल सोवळे

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ६ :** विदर्भ साहित्य संघाच्या यवतमाळ शाखेच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. सतपाल सोवळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. स्थानिक लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयात झालेल्या सर्वसाधारण सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली.



सभेच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अनिरुद्ध पांडे होते. यावेळी शाखेच्या नवीन कार्यकारिणीचीही निवड करण्यात आली. सदस्य म्हणून डॉ. ललिता घोडे, प्रा. डॉ. ताराचंद कंठाळे, नितीन पखाले, विद्या खडसे, विनोद भगत, धनंजय पांडे, प्रा. अतुल सारडे आणि मोरेश्वर पुंडशास्त्री यांची निवड झाली. सभेला विदर्भ साहित्य संघाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रा. डॉ. देवेंद्र पुनसे, विवेक कवठेकर, माजी अध्यक्ष प्रा. डॉ. रमाकांत कोलते, प्रा. अशोक मेनकुदळे, प्रा. दिनकर वानखडे आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. विवेक विश्वरूपे यांनी प्रास्ताविक केले. नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सोवळे यांनी जिल्ह्यातील साहित्यिक चळवळींना अधिक गती देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस व्यक्त केला. सभेला आजीवन सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातून
# 'एस.आय.आर' प्रशिक्षण शिबिराचा राज्यव्यापी शुभारंभ

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आणि पक्ष संघटना तळागाळापर्यंत अधिक मजबूत व हायटेक करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. राज्यभरात राबवल्या जाणाऱ्या 'एस.आय.आर.' प्रशिक्षण शिबिराचा मुख्य शुभारंभ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने सर्वप्रथम धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातून केला. चांदुर रेल्वे येथील प्रसिद्ध यशवंत लॉन येथे हा सोह

ळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.शिबिराला कार्यकर्त्यांचा उदंड प्रतिसाद लाभला.

प्रशिक्षण शिबिराचे मुख्य मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ उपस्थित होते. यशवंत लॉन येथील आपल्या अभ्यासपूर्ण व धडाडीच्या मार्गदर्शनात त्यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, 'बदलत्या काळात तंत्रज्ञानाचा वापर करून पक्षाची ध्येयधोरणे मतदारांपर्यंत पोहोचवणे अत्यंत आवश्यक असून प्रत्येक कार्यकर्त्याने या प्रशिक्षणाचा पुरेपूर वापर करून निवडणूक प्रक्रियेत आघाडी घेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.यावेळी बोलताना



### महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा पुढाकार

खा.बळवंतराव वानखडे म्हणाले की, काँग्रेसचा कार्यकर्ता हाच पक्षाचा खरा कणा आहे आणि या आधुनिक शिक्षणामुळे कार्यकर्त्यांची ताकद अधिक वाढेल. माजी मंत्री सुनील देशमुख आणि माजी आमदार वीरेंद्र जगताप यांनीही स्थानिक पातळीवर पक्ष अधिक आक्रमकपणे जनतेचे प्रश्न मांडणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला माजी मंत्री डॉक्टर सुनील देशमुख,माजी आ.प्रा. वीरेंद्र जगताप,विरोधी पक्षनेते विलास इंगोले आणि अमरावती शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष बबलू शेखावत उपस्थित होते.शिबिराला धामणगाव, चांदूर रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील काँग्रेसचे सर्व प्रमुख पदाधिकारी, ब्लॉक अध्यक्ष, विविध सेलचे अध्यक्ष, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस, एन.एस.यु.आय., सेवादल आणि निष्ठावंत कार्यकर्ते व उपस्थित होते.

**'एस.आय.आर' प्रक्रियेचे तांत्रिक प्रशिक्षण**

शिबिराच्या मुख्य सत्रात मुख्य प्रशिक्षक अभिजित सपकाळ आणि अक्षय राऊत यांनी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना 'एस.आय.आर.' प्रणालीच्या संपूर्ण प्रक्रियेबद्दल दृकश्राव्य माध्यमातून सविस्तर प्रशिक्षण दिले.

या प्रणालीद्वारे मतदारांशी थेट संपर्क कसा साधावा, पक्षाचे बूथ व्यवस्थापन कसे मजबूत करावे आणि डेटा व्यवस्थापनाचा वापर करून विरोधकांचे अपप्रचार कसे हाणून पाडावेत, याबद्दल अत्यंत सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

**धामणगाव मतदार संघाला बहुमान**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने महत्त्वाच्या आणि राज्यासाठी पथदर्शी ठरणाऱ्या अभियानाची सुरुवात संपूर्ण महाराष्ट्रात सर्वप्रथम धामणगाव रेल्वे मतदार संघातून केल्यामुळे स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आणि पदाधिकाऱ्यांमध्ये प्रचंड आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# शिवराज्याभिषेक दिनी गिरीश चौधरी यांचे आंदोलन

### नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा



**अंजनगांव बारी/ वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून मासोद येथे जाणता युवा संघटनेचे संस्थापक तथा समाजसेवक अन्ना उर्फ गिरीश ह. चौधरी यांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलनास प्रारंभ केला.

तालुक्यातील अंजनगाव बारी सर्कलमधील मासोद व परिसरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधा, रस्ते, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्मशानभूमी विकास, विद्यार्थ्यांसाठी सुविधा, महिला बचतगटांसाठी भवन, युवकांसाठी क्रीडा मैदान, आवास योजनांतील लाभार्थ्यांना न्याय तसेच इतर विकासकामांच्या मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. यावेळी आंदोलनस्थळी भेट देऊन पाठिंबा देणाऱ्यांमध्ये अभिषेक उमक, अविनाश मसराम, विशाल नंदनवार, सुरज गवळी, ईश्वर गावंडे, रुपम दहार, गजानन गायगोले, अभिजित चव्हाण व प्रज्वल केवतकर यांचा समावेश होता. उपस्थितांनी आंदोलनाला नैतिक पाठिंबा देत नागरिकांच्या प्रश्नांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केली.

गेल्या अनेक दिवसांपासून विविध प्रश्न प्रलंबित असून संबंधित विभागांकडे वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने अन्नत्याग आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे गिरीश चौधरी यांनी सांगितले. प्रशासनाने मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा,अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.आंदोलनामुळे परिसरातील विकासाच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून नागरिकांमध्येही या आंदोलनाची चर्चा सुरू आहे.

# शिवमती किरणताई महल्ले यांचा सत्कार

**अमरावती/ का.प्र.**

जिजाऊ कमर्शियल को-ऑप बँक लि., अमरावती वालकट कंम्पाऊंड येथील बँकेच्या मुख्यालयात किरणताई महल्ले, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोग, सदस्य- (राज्यमंत्री दर्जा प्राप्त) यांचा या पदी निवड झाल्याबाबत सत्कार समारंभ घेण्यात आला.



सत्कार समारंभाला जिजाऊ परिवारातील व मराठा सेवा संघाचे अमरावती जिल्हाध्यक्ष सुरेंद्र आडे,शिवमती शिला पाटील, शिवमती प्रतिभा रोडे, राष्ट्रमाता जिजाऊ अर्बन को-ऑप पतसंस्थेचे अध्यक्ष अश्विन चौधरी व इतर संचालक, अमरावती जिल्हा कंत्राटदार असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रकाश राऊत, मराठा उद्योजक कक्ष, जिल्हाध्यक्ष, निलेश ठाकरे, जेष्ठ बँकर बाळासाहेब वैद्य, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष हर्षा ढोक तसेच बँकेचे अध्यक्ष बबन आवारे, माजी अध्यक्ष अविनाश कोठाळे, माजी अध्यक्ष अरविंद गावंडे, उपाध्यक्ष प्रदिप चौधरी, संचालिका पल्लवी बारब्दे, संचालक श्रीकांत टेकाडे, प्रशांत गावंडे डॉ. गौरव विधळे तसेच माजी संचालक संजय ढोरे, विलास राऊत, शरद बंड, सतीश काळमेघ तसेच सन्माननीय सभासदगण उपस्थित होते.

अतिशय भावूक होवुन उत्कृष्ठ वकृत्व शैलीने सत्कारमुर्ती किरणताई महल्ल यांनी आपल्या जिजाऊ परिवारातील वाटचालीबद्दल तसेच अमरावती शहरातील स्नुषा म्हणून ते महापौर,जिजाऊ बँकेच्या उपाध्यक्षा,संचालिका असा २०२४ पर्यंतचा ४५ वर्षाचा प्रवास हृदयस्पर्शी शब्दामध्ये सांगीतला. तसेच सर्वांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.प्रास्ताविक अरविंद गावंडे ह्यांनी केले.

पल्लवी बारब्दे व अविनाश कोठाळे यांनी किरण महल्ले महापौर असतांना आपल्या कार्याचा ठसा उमटविला असे सांगीतले. अध्यक्ष बबन आवारे यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रदर्शन बँकेचे संचालक डॉ. गौरव विधळे यांनी केले.

# भंगार बस ठरताहेत प्रवाशांसाठी मनस्ताप

**आसोगाव पूर्ण/ वार्ताहर**

अमरावती–परतवाडा महामार्गावरील एसटी बससेवा वारंवार बिघाडामुळे प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहे.



शनिवारी (६ जून) परतवाडाहून अमरावतीकडे जाणारी एमएच-०६ एस-८८४७ क्रमांकाची बस दुपारी २ वा. आसेगाव बसस्थानकावर अचानक बंद पडली.

त्यामुळे बसमधील प्रवाशांना भर उन्हात ताटकळत थांबावे लागले.


या प्रकारामुळे प्रवाशांनी राज्य परिवहन महामंडळाच्या भोंगळ कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. काही वेळाने दुसरी बस उपलब्ध झाल्यानंतर प्रवाशांची पुढील प्रवासाची व्यवस्था करण्यात आली. वारंवार होणाऱ्या बिघाडांमुळे बसच्या देखभाल-दुरुस्तीकडे अधिक लक्ष देण्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# जनावरांच्या चोरीचा तपास रखडला; शेतकऱ्याचा आरोप

**अचलपूर/ वार्ताहर**

'जनावरे चोरीला गेली, लाखोंचे नुकसान झाले... तरीही पोलिसांनी फक्त तक्रारी घेतल्या;पण कारवाईचा पत्ता नाही!' असा संतप्त आरोप करत अचलपूर येथील विलायतपुऱ्यातील शेतकरी मोहन कन्हैय्यालाल बटाऊवाले यांनी थेट मुंबई येथील पोलिस उपसंचालक कार्यालयाकडे धाव घेतली आहे. त्यामुळे अचलपूर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मोहन बटाऊवाले हे मौजा खेल टेकाड येथील गट क्रमांक ६८ मधील तब्बल ३.२० हेक्टर शेतीचे मालक असून गेल्या १५ ते २० वर्षांपासून पशुपालन व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत. मात्र गेल्या काही वर्षांपासून त्यांच्या शेत परिसरात चोरी, अवैध रेतखनन आणि गुन्हेगारी कारवायांनी अक्षरशः हैदोस घातल्याचा आरोप त्यांनी अर्जातून केला आहे.बटाऊवाले



### अचलपूर पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या शेतातील तब्बल तीन जनावरे चोरीला गेली असून त्यात दोन हेल्या व दोन म्हशींचा समावेश आहे.या चोरीमुळे त्यांचे तब्बल १ लाख ८० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी त्यांनी अचलपूर पोलिस ठाण्यात अधिकृत तक्रारी नोंदविल्या. मात्र, तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी केवळ कागदावर नोंद केली; प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई केली नाही,असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

याहून धक्कादायक बाब म्हणजे, सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर ११ ऑगस्ट २०१५ रोजी अमित मोहन बटाऊवाले यांची हत्या झाल्याचा दावा अर्जात करण्यात आला आहे.

शेतालगतच्या नदीत सुरू असलेल्या अवैध रेतखननामुळे परिसरात गुन्हेगारी वाढल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. शेतातील विहीरपंप, अवजारे आणि इतर साहित्य वारंवार चोरीला जात असल्याने कुटुंब भयभीत झाल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अचलपूर पोलिसांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी बटाऊवाले यांनी आपल्या निवेदनातून केली आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त 'माझी वसुंधरा' शपथ

**अमरावती/ का.प्र.**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात 'माझी वसुंधरा अभियान' अंतर्गत पर्यावरण संवर्धन व हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करण्यासाठी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी अधिकारी कर्मचाऱ्यांना पर्यावरण संवर्धना संबंधीची विशेष शपथ दिली. या उपक्रमाद्वारे विभागातील सर्व नागरिक, लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी यांनी पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारून पृथ्वीच्या रक्षणासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी यावेळी केले.

यात्रसंगी विभागीय आयुक्त गुंडे तसेच अपर आयुक्त अजय लहाने, संजय जाधव यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालयाच्या परिसरात वृक्ष लागवड करुन अभियानात सर्वांनी सक्रीय सहभाग घेण्याचे सूचना केल्या. 'माझी वसुंधरा'



### विभागीय आयुक्तांकडून वृक्ष लागवड

शपथेमध्ये पृथ्वी, वायू, जल, ऊर्जा आणि आकाश या पंचमहाभूतांच्या संवर्धनासाठी विविध संकल्पांचा समावेश असून त्यानुसार प्रत्येकाने संकल्प घ्यावा. विशेष प्रसंगी किमान पाच वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करणे, पर्यावरणपूरक वाहतूक साधनांचा वापर करणे, पाणी व विजेचा काटकसरीने वापर करणे तसेच सेंद्रिय खतांच्या साहाय्याने परसबाग विकसित करून इतरांनाही त्यासाठी प्रोत्साहित करणे, अशा महत्त्वपूर्ण बाबींचा शपथेमध्ये समावेश आहे, त्यानुसार सर्वांनी स्वयंस्फुर्तीने उपरोक्त बाबींचा आपल्या जीवनशैलीत अंगीकार करावा, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी यावेळी केले.

अमरावती विभागातील सर्व जिल्ह्यांमधील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांमधील पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही शपथ घेण्याचे प्रशासनाकडून निर्देश देण्यात आले असून, सर्वांनी ऑनलाईन पोर्टलवर ई-शपथ घेणे अनिवार्य करण्यात आले आहे.

# संक्षिप्त

## डॉ. मोहना कुलकर्णी शुक्रवारी दूरदर्शनवर

**अमरावती**- आपण समाजाचे देणे लागतो या भावनेतून वैद्यकीय सेवेला विराम देऊन समुपदेशन कार्याचा वसा घेतलेल्या अमरावतीच्या प्रख्यात सायकोथेरपिस्ट डॉ. मोहना चंद्रशेखर कुलकर्णी यांची मुलाखत शुक्रवार (ता.१२) ला दुपारी १२ वाजता सह्याद्री वाहिनीवरील 'हॅलो सह्याद्री' या कार्यक्रमात प्रसारित होणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत निवेदक नितीन भट त्यांच्याशी संवाद साधणार आहेत.'विवेकी व्यक्ती- विवेकी समाज' असा चर्चेचा विषय असणार आहे.अमरावती शहरात २५ वर्ष वैद्यकीय क्षेत्रात काम केल्यानंतर डॉ. मोहना कुलकर्णी समुपदेशनाच्या क्षेत्राकडे वळल्या असून बालपण ते वृद्धत्व यादरम्यानच्या अनेक विषयांवर त्या समुपदेशन करतात. 'अफेअर्स' या पुस्तकाच्या लेखिका असलेल्या डॉ. मोहना कुलकर्णी यांनी आपल्या पुस्तकातून मांडलेला विषयदेखील उलगडून सांगितला आहे. या कार्यक्रमाच्या निर्मात्या मीनल पाठराबे आहेत.



## ग्रामसखींसाठी कॅन्सरविरुद्ध जनजागृती मोहीम

**कुऱ्हा**- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत प्रभाग संघ व ग्रामसंघ स्तरावर कार्यरत ग्रामसखी यांच्यासाठी कॅन्सर रोगाविषयी जनजागृती, महिलांनी घ्यावयाची काळजी व सुरक्षितता, वेळेवर निदान, उपचार पद्धती तसेच रुग्ण व कुटुंबीयांचे समुपदेशन या विषयांवर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये मार्गदर्शिका दिपाली बाबुळकर यांनी महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तन कॅन्सर, गर्भाशय मुखाचा कॅन्सर तसेच इतर कॅन्सरच्या प्रकारांविषयी सविस्तर माहिती दिली. कॅन्सरची सुरुवातीची लक्षणे ओळखणे, नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व, योग्य आहार व जीवनशैली, प्रतिबंधात्मक उपाययोजना त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी कॅन्सरग्रस्त व्यक्ती व त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक आधार देण्यासाठी समुपदेशनाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान स्वतः कॅन्सर ग्रस्थ असतानाचे अनुभव कथन करून उपचाराच्या विविध टप्प्यांत सध्यस्थितीत उपलब्ध अत्याधुनिक उपचार व तंत्रज्ञान बाबत संवादात्मक सत्र व प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून ग्रामसखींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.उमेद अभियानाच्या माध्यमातून आयोजित या उपक्रमामुळे ग्रामसखींना आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण माहिती प्राप्त झाली.



## साफल्य विद्यालयात पर्यावरण दिन

**लेहेगाव**- नजिकच्या सावरखेड पिंगळाई साफल्य विद्यालयात सामाजिक वनीकरण विभाग अमरावती ,परिक्षेत्र मोर्शी व साफल्य विद्यालय, सावर खेड पिंगळाई यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.यावेळी मोर्शी परिक्षेत्र विभागाच्या अधिकारी पी.एच. राठोड,मनोज चौधरी,विज्ञान शिक्षक नरेंद्र भि. सुळे,प्रयोगशाळा परिचर आर. बी.मालपे,शिपाई बि. ओ.ठाकूर, रोजगार सेवक राजेंद्र काजळकर, विजय नगराळे, सतिश खंडारे, प्रभाकर वानखडे,ठाकरे,संजय ठवळी इत्यादींच्या उपस्थितीत वड, पिंपळ, कडुनिंब,जांभूळ यासारख्या विविध रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच झाडांच्या संरक्षणाकरिता लोखंडी ट्री-गार्ड बसवण्यात आले.



## ब्राह्मणवाडा थडी येथील मरिमाय मंदिरात पुन्हा चोरी

**ब्राह्मणवाडा थडी/ वार्ताहर**

येथील मरीमाय मंदिरात पुन्हा दानपेटी फोडून चोरी झाल्याची घटना दि. ६ जून रोजी सकाळीच उघडकीस आली. याबाबत मरीमाय मंदिरातील अध्यक्ष व पूर्ण संस्थेतील सदस्यगण यांनी कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे नागरिकांमध्ये रोष दिसून आला आहे.याबाबतची पोलीस स्टेशनमध्ये कोणीही तक्रार दाखल केलेली नाही.नागरिकांची अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव यांनी आपले पद सोडून तरुण वर्गांना संस्थेची जबाबदारी द्यावी अशी मागणी गावातील नागरिकांकडून होत आहे. यापूर्वी सदर मंदिर हे गंगामाई संस्थान यांच्याकडे देखरेखीकरिता होते. तेव्हा या मंदिराची देखरेख व सुव्यवस्था व्यवस्थित असल्याची माहिती गावातील नागरिकांनी दिली आहे.आता याबाबत संस्थेचे पदाधिकारी व सदस्य काय? निर्णय घेतात याकडे सर्व गावातील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे.



## निधन वार्ता

### सुरेशसिंग नागले


**कुऱ्हा**- भाकपचे कार्यकर्ते कुऱ्हा येथील वार्ड नं.१ मधील तथा वयोवृद्ध सुरेशसिंग महादेवसिंग नागले यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी ५ जूनला रात्री दहा वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, स्नुषा, जावाई,नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.स्व.सुरेशसिंग नागले यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.



### शालिनी सवाई

**टाकरखेडा संभू/ वार्ताहर**

येथील रहिवासी असलेल्या शालिनी शरदराव सवाई (वय ७६) यांचे दीर्घ आजाराने ६जून २०२६ शनिवारला सकाळी ८.३० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी विवाहित, सुना, नातवंड असा आप्त परिवार आहे त्यांच्यावर त्यांच्याच शेतात अंतिम संस्कार करण्यात आले.



# शैक्षणिक भ्रष्टाचाराचा कळस!

**सध्याचे ‘नीट’चे पेपरफुटी प्रकरण बघता आपली एकूणच भ्रष्ट यंत्रणा आता एका वर्गापुरती, एका प्रदेशापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर तिची विषारी पाळेमुळे देशभर पसरली आहेत.**

उत्तम डॉक्टर्स, उत्तम इंजिनीअर्स तयार करायचे तर त्याची प्रवेश परीक्षेपासूनची पूर्वतयारीदेखील राष्ट्रीय कर्तव्य म्हणून पार पाडावी लागेल.तसेच केवळ सरकारवर अवलंबून चालणार नाही. इथे नैतिकतेचा मुद्दा जास्त महत्त्वाचा आहे. पेपर लीक करणारे जितके दोषी तितकेच, किंबहुना अधिक पेपर विकत घेणारे विद्यार्थी. त्यांना लाखोंनी पैसे पुरवणारे पालक हेसुद्धा दोषी आहेत. त्यांचा शोध घेऊन त्यांनाही कडक शिक्षा होणे, त्यांची नावे समाजासमोर येणे महत्त्वाचे आहे. त्याशिवाय अशा प्रकारांना आळा बसणार नाही.

नीटच्या गोंधळाबद्दल मीडियामध्ये खूप लिहून, दाखवून, पाहून झाले. आपली शिक्षण व्यवस्था किती किडली आहे हेच यावरून सप्रमाण सिद्ध होते. शिवाय सामाजिक नैतिकतादेखील किती खालच्या पातळीवर पोहोचली आहे हेही दिसून येते. इथे शासन, शिक्षण विभाग, परीक्षा घेणारी संस्था, एकूणच परीक्षेचे नियोजन करणारी उच्चस्तरीय कमिटी (ज्यात आयआयटी, एनआयटीचे निर्देशक, आयएएस अधिकारी असतात) हे सगळेच दोषी आहेत. त्यांचा निष्काळजीपणा, त्यांचा गुन्हा हा भयंकर आहे. कारण लाखो तरुण-तरुणींच्या भविष्याशी, जिवाशी निर्घृण खेळ चालला आहे. हे टाळता येण्यासारखे नाही का? तर निश्चितच टाळता आले असते. त्यासाठी डोळ्यांत तेल घालून प्रामाणिकपणे काम करणारी निष्ठावंत यंत्रणा लागते. गेली अनेक दशके आयआयटीची प्रवेश परीक्षा होत आहे. त्यातही अनेक बदल झालेत. एकाऐवजी प्रीलिम अन् अॅडव्हान्स अशा दोन परीक्षा होतात. इथे तर आयआयटीत काम करणा-या प्राध्यापकांची मुलेदेखील परीक्षेला बसतात. अयशस्वी होतात जर नीट लिहिला नाही तर! पण या परीक्षेचा पेपर लीक होणे असे आजपर्यंत घडले नाही. प्रश्नपत्रिकेच्या कीविषयी किंवा रँकिंग लिस्टच्या नियमाविषयी गोंधळ झालाय. एकदा प्रकरण कोर्टात नेले गेले. जे काम आयआयटीच्याच प्राध्यापकाने केले, पण कधीच पेपर लीक झाले नाहीत.

मग उद्याचे डॉक्टर घडविणा-या परीक्षेच्या बाबतीतच असे का घडते? ही गांभीर्याने सखोल संशोधन करण्याची बाब आहे. इथे केवळ परीक्षा घेणारी यंत्रणा व शासनच दोषी नाही, तर विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, कोचिंग क्लासेसचे नियोजक सगळेच दोषी आहेत. पालकच मुलांना वाममार्गाने जाण्यासाठी आधीपासून प्रवृत्त करताहेत. मग यातून उद्याचे जबाबदार नागरिक व प्रामाणिक, नैतिक डॉक्टर कसे निर्माण होणार, हा प्रश्न आहे. ‘मन की बात’मध्ये परीक्षेविषयी मार्गदर्शन करणा-यांनी याविषयी कुणाला उपदेश केल्याचे ऐकिवात नाही!

सध्याचे ‘नीट’चे पेपरफुटी प्रकरण बघता आपली एकूणच भ्रष्ट यंत्रणा आता एका वर्गापुरती, एका प्रदेशापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर तिची विषारी पाळेमुळे देशभर पसरली आहेत. रोजच्या रोज जी नावे प्रसिद्ध होताहेत ती बघता आणि त्यांचे अधिकार, संस्था बघता एकूणच देशातील तपास यंत्रणा, सुरक्षा यंत्रणा, कायदा-




सुव्यवस्था किती तोकडी, पोकळ आहे हेही लक्षात येते. मुळात या प्रोफेशनल शिक्षणाच्या (इंजिनीअरिंग, मेडिकल अन् तत्सम) प्रवेश परीक्षांसंबंधी, मेरिट लिस्टसंबंधी बदलत्या काळानुसार नव्याने विचार करण्याची गरज आहे. मेरिट, गुणवत्ता कोणत्या निकषावर ठरवायची याचाही नव्याने विचार करावा लागेल. या बहुतेक परीक्षा ऑब्जेक्टिव टाईप असतात. बहुपर्यायी उत्तरातून एक उत्तर शोधताना त्यामागे बुद्धिमत्ता, तर्क यांचा वापर असेलच याची खात्री नसते.अभ्यास केलेला नसताना खरे उत्तर माहिती नसतानादेखील अशीच टिक केलेली उत्तरे बरोबर निघण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एकतर आयआयटीसारखे दोन परीक्षांचे मॉडेल वापरता येईल. त्यामुळे पहिल्या चाचणीत बरेच जण गळून पडतील. अर्थात ही प्रोसेसदेखील विचारपूर्वक अमलात आणावी लागेल. दुसरे म्हणजे या परीक्षांसाठी एक-दोन प्रश्नपत्रिका तयार करण्याऐवजी खूप मोठी क्वेश्चन्स बँक तयार करावी. त्यातून ठरावीक विद्यार्थ्यांसाठी ठरावीक प्रश्न संगणक निवडेल. त्याच्या जवळ असलेल्या कीप्रमाणे संगणकच गुणपत्रिका तयार करेल. या परीक्षा ठरावीक महिन्यांत विशिष्ट डेटा सेंटर्समध्ये विद्यार्थ्यांना सोयीनुसार देता येतील. या सेंटरमध्ये असलेले व्हिडीओ कॅमेरे विद्यार्थ्यांवर नजर ठेवतील. काहीही अयोग्य वर्ण आढळून आल्यास ती परीक्षा रद्द झाल्याचे सिग्नल संगणकच देईल. आजच्या डिजिटल युगात एआयचा वापर केला तर हे सहज शक्य आहे. याला बरीच पूर्वतयारी करावी लागेल. विशेषकरून उत्तम प्रश्नांची बँक तयार करणे, त्यात सिक्रेट कोडद्वारे गुप्तता पाळणे, त्या प्रश्नांची अचूक की तयार करणे. हे काम एकदा नीट केले, त्यात सुसूत्रता आली की पुढचे सगळे सोपे जाईल. सध्याची जी कोणती नॅशनल टेस्ट एजन्सी आहे, त्यातील लूप होल्स शोधून त्या दूर करणे अन् वरील नवे बदल तद्न्य प्राध्यापक, अभ्यासक यांच्या संमतीने अमलात आणणे फारसे कठीण नाही. त्यासाठी इच्छाशक्ती हवी. मुख्य म्हणजे प्रोफेशनल उच्च शिक्षण ही हलक्याने घेण्याची गोष्ट नाही हे गांभीर्याने ठरवावे लागेल, मान्य करावे लागेल.

उत्तम डॉक्टर्स, उत्तम इंजिनीअर्स तयार करायचे तर त्याची प्रवेश परीक्षेपासूनची पूर्वतयारीदेखील राष्ट्रीय कर्तव्य म्हणून पार पाडावी लागेल. तसेच केवळ सरकारवर अवलंबून चालणार नाही. इथे नैतिकतेचा मुद्दा जास्त महत्त्वाचा आहे. पेपर लीक करणारे जितके दोषी तितकेच, किंबहुना अधिक पेपर विकत घेणारे विद्यार्थी. त्यांना लाखोंनी पैसे पुरवणारे पालक हेसुद्धा दोषी आहेत. त्यांचा शोध घेऊन त्यांनाही कडक शिक्षा होणे, त्यांची नावे समाजासमोर येणे महत्त्वाचे आहे. त्याशिवाय अशा प्रकारांना आळा बसणार नाही. जो विद्यार्थी प्रवेश घेतानाच अनैतिकतेचा आधार घेतो तो डॉक्टर झाल्यानंतर काय दिवे लावेल याची आपण कल्पना करू शकतो. आपलीदेखील सामाजिक जबाबदारी आहे की, असा भ्रष्टाचार करणाऱ्यांचे समुपदेशन करणे, वेळ पडल्यास त्यांना धडा शिकवणे, खड्यासारखे बाजूला करणे हे आपणा सर्वांचेदेखील नैतिक कर्तव्य आहे. हे झाले नाही तर अशा गुन्हेगारांची संख्या वाढत जाईल. जागतिक बाजारात आपली किंमत कमी होईल. जागतिक गुरू वगैरे होणे राहिले बाजूला अनैतिक गुन्हेगारांची गुंडगिरी वाढत जाईल. या प्रकाराला वेळीच आळा बसायला हवा. वर जे उपाय सुचवले ते करून बघावे. याहीपेक्षा उत्तम काही सुचले तर सोने पे सुहागा!

**विजय पांढरीपांडे**

# ‘रहे ना रहे हम’

भारतीय संगीताच्या सुवर्ण युगात म्हणजे १९६० ते ७० च्या दशकात मराठी गानविश्वात आणि हिंदी चित्रपट सृष्टीत अधिराज्य गाजवणाऱ्या लता आणि आशा यांच्या तोडीस तोड ठरावा असा एक दैवी आवाज म्हणजे सुमन कल्याणपूर. आशा भोसले ह्यांचा आवाजाचा पोत वेगळा होता पण लता मंगेशकर आणि सुमन कल्याणपूर यांच्या आवाजाचा पोत सारखा असल्याने हे गाणे सुमनताईंचे होते की लताचे असा प्रश्न अनेक संगीत रसिकांना पडायचा त्यामुळेच त्यांना दुसरी लता असे म्हटले गेले. लतादीदी आणि आशाताई या दोन दैवी स्वरतारकांच्या समकालीन असूनही तेवढ्याच जोरकसपणे सुमनताईंच्या स्वतंत्र अस्तित्वाची नोंद रसिकांना आजपर्यंत वारंवार घ्यावी लागली यातच त्यांचे मोठेपण सामावले आहेत.

सुमन कल्याणपूर यांचे व्यक्तिमत्व ही दैवी होते.विद्या विनयेन शोभते (म्हणजे नम्रता असणाऱ्यांकडे विद्या शोभून दिसते) त्याचप्रमाणे कलाकाराकडे निगर्वीपणा असेल तर तो समाजाच्या मनात अधिक ठसतो,सर्वांना जवळ वाटतो. सुमनताईंचे हे एक वैशिष्ट्य होते.लतादीदींशी त्यांची नेहमीच तुलना झाली आणि पत्रकार त्यांना त्याविषयी काही नकारात्मक प्रश्नही सतत विचारत परंतु सुमनताई कधीही तुलना, स्पर्धा, इर्ष्या आदींच्या आहारी गेल्या नाहीत.पत्रकारांना कधीही त्यांनी त्या विषयावर रेंगाळू दिले नाही हेच त्यांच्या सालस आणि सुसंस्कारी स्वभावाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. हीच मनाची शुद्धता त्यांच्या मुखावर झळकली आणि तीच त्यांच्या अलौकिक दैवी आवाजातून रसिकांपर्यंत पोहचली जात होती.



प्रचंड प्रसिद्धी वलयाच्या हिंदी, मराठी गानविश्वात तेथील मायाजालाचा स्पर्श ही होऊ न देता त्यापासून अलिप्त राहून रसिकांना उत्तम उत्तम स्वरसाज प्रदान करणाऱ्या सुमनताई ‘रंगात रंगुनी साऱ्या रंग माझा वेगळा’ याप्रमाणे राहिल्या.संगीतकार आणि गायिका यांच्या तारा जुळल्या तर अजरामर वाटाव्या अशा संगीत कलाकृतींची निर्मिती होऊ शकते.सुमन ताईंचे मन त्यांना स्वरबद्ध करणाऱ्या संगीतकाराची एकरूप झालेले होते. त्यात सुधीर फडके,यशवंत देव, कमलाकर भागवत,दशरथ पुजारी यांच्यापासून नौशाद, शंकर जयकिशन, कल्याणजी आनंदजी, आर डी बर्मन आणि लक्ष्मीकांत प्यारेलाल पर्यंत अनेक जण होते.

त्यांचे ‘सुमन सुगंध’ हे चरित्र लिहिणाऱ्या आणि गान विश्वातून अलिप्त झाल्यावरही कार्यक्रमांच्या माध्यमातून रसिकांशी भेट घालून देऊन त्यांचा उत्साह परत मिळवून देणाऱ्या प्रसिद्ध निवेदिका मंगला खाडिलकर लिहितात की त्या सुखाने, समाधानाने आणि सात्विकतेने भरभरून जगल्या. यातील सात्विकतेने हा पैलू अतिशय महत्त्वाचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अध्यात्मिक अंग दर्शवणारा आहे. त्या अत्यंत सोज्वळ, शालीन, सुस्वभावी,आणि मितभाषी होत्या.त्यांचे आयुष्य स्वच्छ आणि पारदर्शी होते. माधुर्य आणि कोमलता हे त्यांच्या स्वरांचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. त्यांच्या निर्मळ व्यक्तिमत्त्वाने त्यांना दिलेली ती दैवी देणगी होती. त्यांना बागकाम करण्याची आवड होती. त्यांनी लावलेली झाडे नेहमीच बहरत.चित्रकलेतेही त्यांना उत्तम जाण होती. केवळ अपार गोडवाच,नव्हे तर आर्जव,तळमळ,आत्मीयता, आपुलकी आणि मुख्य म्हणजे एक प्रकारची प्रगल्भता त्यांच्या स्वरामध्ये होती त्यामुळे रसिक श्रोत्यांच्या अंतरंगाचा ठाव घेतला जायचा.‘जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे’ या अध्यात्मिक गाण्यात जशी ती दिसली तेवढीच ती त्यांच्या प्रेम गीतांत ही दिसली. त्यांची युगलगीते ऐकताना कधी छचोरपणा वाटला नाही याचे कारण तो काळच तसा होता परंतु त्यांच्या स्वरातील अंतर्मुखता हेही त्यामागील एक कारण होते.‘उठा उठा चिऊताई’ यासारख्या बालगीतांसाठी त्या प्रसिद्ध झाल्या.तशाच सर्व बालगीतांमध्ये आणि त्यांच्या प्रसिद्ध ‘निंबोणीच्या झाडामागे’ यासारख्या अंगाईगीतांमध्येही एक प्रकारची दर्जेदार आणि इतरांना अंतर्मुख करणारी स्वरा प्रगल्भता होती. ‘जिथे सागरा धरणी मिळते’ सारख्या विरहा गीतां मध्ये तर ती प्रकाशाने जाणवलीच. संगीतातील सर्व प्रकार तेवढ्याच ताकदीने गाता येणाऱ्या हाताच्या बोटावर मोजाण्या इतके गायक कलाकार असतात त्यापैकी त्या एक होत्या. गझल, ठुमरी, भावगीते, प्रेम गीते आणि भक्ती गीते सर्वच त्यांनी लिलया गायले. ८५ व्या वर्षी २५ च्या मुलीसारखा सूर हाही दैवीच होता. मराठी गानविश्वात संतपरंपरा रुजवणारा त्यांचा स्वर होता.

कुठलाही आवाज चांगला असलेल्या मुलीला मराठी गाणे म्हणायला सांगितले तर ती आतापर्यंत ‘केशवा माधवा’ हे गाणे म्हणत असे. ७०/८० च्या दशकात मुलगा बघण्याच्या कार्यक्रमात तर कित्येक मुलींनी हे गाणे म्हटल्यावर त्यांची लग्न जुळलेली आहे ही गंमत नव्हे तर सत्यता आहे. या भक्ती गीताच्या माध्यमातून सुमनताईंचा स्वर प्रत्येक मराठी घरात पोचला.जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे अभंग त्यांनी गायले त्यातील ‘ओंकार प्रधान रूप गणेशाचे’ हे तर अविस्मरणीय झाले आहे. संत नामदेवांचा ‘देह जाओ अथवा राहो’ हा अभंग किंवा कवी सुधांशु यांची ‘देव माझा विठू सावळा’ ही रचना ऐकत दोन पिढ्या मोठ्या झाल्या.‘तुझ्या कांती सम रक्तपताका पूर्व दिशा उजळली’ हे ग.दि. माडगूळकरांचे भक्ती गीत अतिशय लोकप्रिय झाले.बहिणाबाईंचे ‘अरे संसार संसार’ असो किंवा शांता शेळके यांची ‘केतकीच्या बनी’असो ‘वाट इथे स्वप्नातील ’असो त्या त्या भावनेशी आर्तता त्यांच्या स्वरातून परिपूर्ण व्यक्त झाली.

प्रेम गीतातही अंतरंगाचा ठाव घेणारा त्यांचा स्वर. मृदुल करांनी तारा छेडीत तेरा भाषांत साडेतीन हजाराहून अधिक गाणी त्यांनी गायली आहे.त्यातील ‘शब्द शब्द रसिकांच्या गानगंगाजळीत जपून ठेवले आहेत.चपलख शब्द आणि उत्कृष्ट संगीत यांना तितक्याच तोडीचा स्वर लाभला तर काय होते यासाठी ‘ना तूम हमे जानो’ ‘तुमने पुकारा और हम चले आये’अशा त्यांच्या अनेक प्रेम गीतांची उदाहरणे देता येतील.‘आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे’ किंवा ‘नाना करते प्यार’यासारखी उडती गाणी ही रसिकांच्या लक्षात राहिली. शेवटी कितीही मोठ्या स्पर्धेच्या युगात अस्सल टिकतेच हा धडा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून घेऊन युवा पिढी स्वतः कष्ट घेण्यावर भर देऊ शकते. सुमन ताईंना पद्मभूषण आणि लता मंगेशकर नव्हे तर मोहम्मद रफी, सुधीर फडके, माणिक वर्मा यांच्या नावांचेही पुरस्कार लाभले. त्यांच्या सत्वगुणी विलोभनीय व्यक्तिमत्त्वाचे स्मरणरंजन हीच त्यांना आदरांजली.

**लीना गाडगीळ**

## कोवळ्या कळ्यांची वेदना

वेली,झाडावरील कळी
रडूनच सांगत होती
असे मला कुस्करू नका
सांभाळा ना हो नातीगोती...१

माझे स्वप्न आहे फुलणे
अवघ्याना सुगंध देणे
नयनरम्य शृंगाराने
आसमंत धुंद करणे...२

अवेळीच किती वेदना
तुमचेकडून असह्य,
नको मला दुष्ट नजर
मागितले नाही मी साह्य..३

तडफडणारी कलीका
छिन्नविछिन्न अवस्था
माणुसकी वेशीवरती
असता,फक्त शुष्क आस्था..४

घश्याखाली घास गिळता
आठवा कुकर्माचा पाढा,
इथले इथेच भोगणे
अभ्यास सांगतसे गाढा..५


**अॅड.सुलभा गोगरकर,** अमरावती
भ्रमणध्वनी क्र- ९४२३६००४६८

# मानसशास्त्र:काळाची गरज आणि सद्यस्थिती

२५ जुलै २०२५ रोजी श्री सुखदेव शहा यांनी आंध्र प्रदेश सरकार विरोधात सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली आणि त्याला अनुसरून सर्वोच्च न्यायालयाने देशातील विद्यार्थ्यांवरील ताण तणाव कमी करण्याच्या अनुषंगाने विस्तृत सूचना निर्गमित केल्या. त्याबाबत महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घेतली असून मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष समिती गठीत करण्यात आली. या समितीद्वारा प्रत्येक शाळेमध्ये १०० विद्यार्थ्यांमध्ये एक समुपदेशक असावा असा शासन निर्णय ७ जानेवारी २०२६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार आता प्रत्येक शाळेमध्ये शालेय समुपदेशकांची नेमणूक करावी लागणार आहे. महाराष्ट्रात जितक्या शाळा आणि विद्यार्थी संख्या आहे त्या तुलनेत समुपदेशकांची संख्या अतिशय अल्प आहे. आता मानसशास्त्राचे उत्तम ज्ञान असणाऱ्या, योग्य प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तीला समुपदेशक म्हणून कार्य करता येणार आहे शिवाय येथे मोठ्या प्रमाणावर व्यवसायाची संधी निर्माण होणार आहे हे निश्चित.

शैक्षणिक आणि मानसिक आरोग्य क्षेत्राप्रमाणे कुटुंब, सामाजिक संबंध, व्यवसाय, व्यक्तिमत्व विकास, आधुनिक तणावपूर्ण जीवनशैली, गुन्हेगारी व सामाजिक समस्यांचे निराकरण करण्याकरिता सुद्धा मोठ्या प्रमाणावर मानसशास्त्रीय मदत घेतली जाते. आधुनिक काळात मानवाने वैज्ञानिक प्रगती मोठ्या प्रमाणावर केली, मात्र या धकाधकीच्या जीवनात बदलत्या जीवनशैलीमुळे मानसिक स्वास्थ्य जपणे हा सुद्धा एक महत्त्वाचा विषय बनलेला आहे. मानसशास्त्रज्ञाची मदत घ्यायची म्हणजे एक प्रकारचा कमीपणा किंवा कलंकाची भावना असा समज फार मजबूत होता, मात्र कोरोना नंतर मानसिक क्षमता, मानसिक सक्षमता याचे महत्त्व लक्षात आल्याने हळूहळू ही जागरूकता निर्माण व्हायला लागली आहे. वाढत्या स्पर्धात्मक परिस्थितीमुळे शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड चढाओढ निर्माण झालेली दिसते. प्रत्येक पालकाला आपले पाल्य या स्पर्धेत टिकून राहावे असे वाटते आणि मग त्यासाठी सर्व परीने प्रयत्नही केले जातात. त्यामुळेच तर आता शालेय समुपदेशकांची नियुक्ती करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. विशेष म्हणजे आधुनिक काळात ‘जेन झी’ च्या समस्या या तर फारच वेगळ्या आहेत. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांच्या संकल्पना, जीवनशैली, प्रेम आणि आकर्षण यातील भेद ओळखण्याची क्षमता, यांच्यासोबत कसे जुळवून घ्यायचे हीच खरी कसरत पालकांना करावी लागते. त्यामुळे पालक आणि पाल्य यामधील अंतर सुद्धा वाढलेले दिसून येते जे दोघांच्याही मानसिक स्वास्थ्यास अपाय करणारे आहे.

आधुनिक जीवनशैलीमुळे वैवाहिक जीवनातील कलह, संघर्ष वाढल्याचे दिसून येते.राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण हे केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाद्वारा केले जाते. यानुसार व कौटुंबिक न्यायालयातील आकडेवारी नुसार गेल्या पाच वर्षात घटस्फोटाचे प्रमाण ३५ टक्क्यांनी वाढलेले दिसून येते. माहिती व तंत्रज्ञान क्षेत्र हे वैज्ञानिक दृष्ट्या प्रगत क्षेत्र समजले जाते मात्र यामध्ये घटस्फोटाचे प्रमाण अधिक दिसून येते. कारण बदलत्या जीवनशैलीमुळे तसेच प्रसार माध्यमांचा प्रभाव त्यांचा अतिरिक्त वापर यामुळे व्यक्तींमधील भावनिक संवाद कमी होताना दिसून येतो व ही समस्या कशी सोडवावी याकरिता मानसशास्त्रीय समुपदेशकांची नितांत गरज भासते. एकूणच सध्याची परिस्थिती पाहता जीवनाच्या सर्वच टप्प्यांवर मानसशास्त्रीय मदतीची गरज निर्माण झालेली आहे.



मानसशास्त्राचा शिक्षक म्हणून कार्य करतांना असे निदर्शनास येते की, आता समाजात मानसिक आरोग्य, समुपदेशकाची मदत, मानसोपचार घेणे, याबाबत हळूहळू जागरूकता निर्माण होत आहे. विद्यार्थी सुद्धा शिक्षण घेताना मानसशास्त्र विषयाला प्राधान्य देतात कारण आता या क्षेत्रात भविष्यात भरपूर व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहे हा विचार आता कुठेतरी समाज मनात रुजायला लागलेला आहे.

मानसशास्त्र हा प्रात्यक्षिकाचा विषय आहे त्यात भरपूर गुण मिळतात असा समज असलेले बहुतांश विद्यार्थी पाहायला मिळतात. कोरोनाच्या काळात त्या परिस्थितीला अनुसरून महाविद्यालयात न जाताच ऑनलाइन परीक्षा होणे, भरपूर प्रमाणात मिळालेले गुण, यामुळे एक वेगळीच मानसिकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली दिसून येते.महाविद्यालयात प्रवेश घेणे आणि प्रत्यक्षात अनुपस्थित राहणे हा एक पायंडा सर्वत्र निर्माण झालेला दिसतो. काही तज्ञ मंडळी पारंपारिक अभ्यासक्रमानंतर त्यांना कुठे नोकरी मिळत नाही म्हणून ते शिक्षणही गांभीर्याने घेत नाही असा विचार मांडतात. पण वाढत्या लोकसंख्येनुसार सर्वांनाच नोकरी मिळणे शक्य आहे का?हा विचार करण्याइतपत ते तज्ञ सुज्ञ असावे असे वाटते.

सध्या तर विद्यापीठ अनुदान आयोगाने १२ ऑगस्ट २०२५ च्या निर्देशानुसार मानसशास्त्र आणि आरोग्याशी संबंधित अभ्यासक्रमांना ऑनलाइन पद्धतीने व दूरस्थ शिक्षण पद्धतीने दिलेली मान्यता रद्द केलेली आहे. कारण या अभ्यासक्रमाचा संबंध थेट मानवी जीवनाशी असल्यामुळे या विषयांचे प्रत्यक्ष व गुणवत्ता पूर्ण ज्ञान हे ऑनलाइन व दूरस्थ पद्धतीने शक्य होत नाही त्यामुळे आता मानसशास्त्र हे नियमित, प्रत्यक्ष महाविद्यालयात जाऊनच शिकणे गरजेचे झालेले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण प्रणालीत झालेला बदल हा सकारात्मक पद्धतीने स्वीकारण्याची गरज आता निर्माण झालेली आहे. अर्थात त्यात अनेक नवीन समस्या सुद्धा निर्माण झालेल्या आहेत पण कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम हा फार महत्त्वाचा आणि उपयुक्त असा पैलू या शिक्षण प्रणालीमध्ये प्रकर्षाने जाणवतो. पारंपरिक शिक्षणानंतर जरी सर्वांना नोकऱ्या मिळत नसल्या तरी एखादा व्यवसाय करण्याची कौशल्य विकसित करून अर्थार्जन करता येणे शक्य आहे असे मानसशास्त्राच्या संदर्भात आवर्जून जाणवते. पूर्वी केलेल्या विवेचनावरून समाजाला मानसशास्त्राची नितांत गरज आहे व त्याकरिता कौशल्य विकसित असलेले मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक ,मनोचिकित्सक निर्माण होणे गरजेचे आहे.

मानसशास्त्र शिकण्याचे कुतूहल विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते पण त्यातील कौशल्य, क्षमता आत्मसात करणे याकडे लक्ष केंद्रित करण्याऐवजी विद्यार्थी परीक्षा केंद्रित, मार्क्स केंद्रित झालेले दिसतात.त्यामुळे खरंच पुढे भविष्यात आपण टिकणार आहोत का?आणि उद्या आपण एक समुपदेशक म्हणून कार्य करताना एका मानवी जीवनाशी संबंधित हाताळणी आहोत याचा विद्यार्थ्यांनी विचार करणे गरजेचे आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात पदवी स्तरावर शिक्षण घेताना पहिल्याच वर्षी विद्यार्थ्याला आपला मुख्य विषय म्हणजेच मेजर विषय निश्चित करावा लागतो. त्यामुळे आपण जर मानसशास्त्रासारखे विषय निवडणार असाल तर त्यातील व्यवसायाभिमुख कौशल्य आत्मसात करण्याकडे विद्यार्थ्यांनी भर दिला पाहिजे. कारण उद्या मानसशास्त्रज्ञ म्हणून किंवा समुपदेशक म्हणून जर आपण समाजात वावरणार असाल तर प्रत्यक्ष मानवी जीवनातील समस्या सोडवण्याची क्षमता आपल्यात निर्माण झाली पाहिजे. अन्यथा एखाद्या समस्येचे स्वरूप लक्षात घेण्याची आपलीच पात्रता नसेल तर एखाद्या समस्याग्रस्त व्यक्तीच्या जीवनाचा खेळ खंडोबा होणार नाही याची जबाबदारी आपण घेतली पाहिजे.समाजाला मानसशास्त्रज्ञांची गरज आहे. आपण सक्षम असाल तर अर्थार्जनही नक्कीच होईल यात शंका नाही म्हणूनच मानसशास्त्र ही आता काळाची गरज बनलेली आहे मात्र सद्यस्थितीवरही गांभीर्यपूर्वक विचार करणे ही तितकेच गरजेचे आहे.



**डॉ. गजानन र. रत्नपारखी**
मानसशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती

# ४९१ कोटींच्या विकास आराखड्याला अधिका–यांचा ठेंगा ?

## पालकमंत्री, खासदार, आमदारांनाही न जुमानणा–या अधिका–यांवर कारवाई कधी ? ; राजेंद्र पातोडे यांचा संतप्त सवाल

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्याच्या विकासासाठी तब्बल ४९१ कोटी ७० लाख रुपयांचा नियतव्यय मंजूर झाला, विकासकामांना गती देण्यासाठी पालकमंत्र्यांनी स्पष्ट निर्देश दिले, लोकप्रतिनिधींनी विविध प्रश्न मांडले; मात्र या सर्व प्रक्रियेलाच अनेक अधिकाऱ्यांनी जणू काही थेट ठेंगा दाखवल्याचे चित्र जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पाहायला मिळाले. बैठकीला मोठ्या प्रमाणावर अधिकारी गैरहजर राहिल्याने प्रशासनाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, हा प्रकार म्हणजे जिल्ह्याच्या विकासाशी खेळ असल्याची घणाघाती टीका वंचित बहुजन युवा आघाडीचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांनी केली आहे.



'जिल्ह्याच्या विकासासाठी ४९१ कोटींचा निधी मंजूर होतो, पण त्याची अंमलबजावणी करणारे अधिकारीच बैठकीला दांडी मारतात. अशा अधिकाऱ्यांना केवळ नोटिसा देऊन उपयोग नाही. जिल्ह्याच्या विकासाशी खेळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे.'

**राजेंद्र पातोडे,**
प्रदेश महासचिव, वंचित बहुजन युवा आघाडी,
महाराष्ट्र प्रदेश

नियोजन भवन येथे पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत जिल्हा वार्षिक योजना २०२६-२७ अंतर्गत ४९१ कोटी ७० लाख रुपयांच्या नियतव्ययाला मंजुरी देण्यात आली. या निधीतून रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि इतर विकासकामांना चालना मिळणार आहे. मात्र, ज्या अधिकाऱ्यांवर या निधीच्या अंमलबजावणीची जबाबदारी आहे, त्यांच्यापैकी अनेक अधिकारी बैठकीलाच अनुपस्थित राहिल्याने संपूर्ण यंत्रणेच्या गंभीरतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

पातोडे यांनी आरोप केला की, बैठकीला गैरहजर राहणारे अधिकारी पालकमंत्री, खासदार, आमदार, जिल्हाधिकारी किंवा जिल्हा नियोजन समिती यांपैकी कोणालाही जुमानत नसल्याचे यावरून स्पष्ट झाले आहे. जिल्ह्याच्या विकासाचा रोडमॅप ठरविणाऱ्या बैठकीलाच अधिकारी अनुपस्थित राहतात, ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनातील वाढत्या बेफिकिरीचे द्योतक असल्याचे त्यांनी म्हटले.

**४९१ कोटींच्या निधीची अंमलबजावणी धोक्यात?**

जिल्ह्यातील रस्ते, पायाभूत सुविधा आणि इतर विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधी मंजूर झाला असला, तरी संबंधित अधिकारीच बैठकीपासून दूर राहत असतील तर या निधीची प्रभावी अंमलबजावणी कशी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मंजूर निधी वेळेत खर्च न झाल्यास विकासकामांवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पातोडे यांनी प्रशासनाला लक्ष्य करताना म्हटले की, विकासकामांच्या बाबतीत अधिकारी उत्तरदायी ठरत नसतील, तर केवळ बैठका आणि घोषणांमुळे जिल्ह्याचा विकास होणार नाही. शासनाने अशा अधिकाऱ्यांविरोधात प्रत्यक्ष आणि कठोर कारवाई करून उत्तरदायित्व निश्चित करावे, अन्यथा जिल्हा नियोजन समितीच्या निर्णयांनाही अर्थ उरणार नाही.

### 'महाराजस्व अभियान' प्रमाणे नियोजन समितीचाही बोजवारा

जिल्हा नियोजन समितीची बैठक ही विकासकामांच्या अंमलबजावणीसाठी अत्यंत महत्त्वाची असते. मात्र अधिकाऱ्यांनी या बैठकीचाही 'महाराजस्व अभियान' प्रमाणे बोजवारा उडविल्याचा आरोप पातोडे यांनी केला. शासनाकडून निधी मंजूर होतो, नियोजन समिती निर्णय घेते; परंतु अंमलबजावणीच्या टप्प्यावर अधिकारीच उदासीन राहिल्यास विकासकामांचे काय होणार, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### 'शो-कॉज' नोटीस म्हणजे केवळ औपचारिकता?

बैठकीला अनुपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र यापूर्वीही अशा नोटिसा देण्यात आल्या असून त्याचा कोणताही परिणाम झालेला दिसत नाही, असे पातोडे यांनी म्हटले. अधिकाऱ्यांना अशा नोटिसांची भीती राहिलेली नसून त्या केवळ कागदी कारवाईपुरत्याच मर्यादित राहतात, असा आरोप त्यांनी केला. त्यांच्या मते, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकींना अधिकारी गांभीर्याने घेत नसल्याने प्रशासनात उत्तरदायित्वाची भावना कमी होत चालली आहे. परिणामी विकासकामांच्या प्रस्तावांपासून ते अंमलबजावणीपर्यंत अनेक त्रुटी कायम राहतात.

### अवास्तव प्रस्ताव, गंभीर चुका; तरीही कारवाईचा अभाव

बैठकीत कार्यालयांनी अवास्तव प्रस्ताव पाठवू नयेत, तसेच कामांमध्ये गंभीर चुका करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, अशा सूचना देण्यात आल्या. मात्र अशा सूचना वारंवार द्याव्या लागतात, यावरूनच प्रशासनातील गोंधळ आणि निष्काळजीपणाचे वास्तव समोर येते, असे पातोडे म्हणाले. अकोला जिल्ह्यात यापूर्वी अनेक विकासकामांबाबत गंभीर अनियमितता, निकृष्ट दर्जाची कामे आणि भ्रष्टाचाराच्या तक्रारी समोर आल्या. अनेक वेळा जनप्रतिनिधींनीही या बाबी निदर्शनास आणून दिल्या.

तरीही एकाही दोषी अधिकाऱ्यावर ठोस आणि कठोर कारवाई झाल्याचे उदाहरण जिल्ह्यात दिसत नाही, असा आरोप त्यांनी केला.

**Change In Name**
I have change my name From
**ZUBER AHEMAD GULAM SHABBIR**
-To-
**ZUBER AHMED GULAM SHABBIR**
Address - Chota Mominpura Balapur, Akola,
Maharashtra -444302
Passport No :- L9488945

**जाहीर सुचना**

दि. ४.६.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हे रामदास श्रीकृष्ण सरोदे यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे खडकी बू, ता. जि अकोला येथील शेत सर्व्हे क्र २१/पार्ट पैकी लेआऊट प्लॉट क्र ४४ क्षेत्रफळ १७२.५० चौ. मी. या प्लॉटवर बांधलेल्या डूप्लेक्स/ब्लॉक क्र १ क्षेत्रफळ ३१.५९ चौ मी. बिल्ट अप एरिया, जमिनीतील अविभाजित हिश्यासह ज्यास चतुः सिमा पूर्वेस ब्लॉक क्र २, पश्चिमेसः रोड, उत्तरेस सर्व्हिस लेन, दक्षिणेसः- संदीप भुमरे यांचा ब्लॉक अशी मालमत्ता विकत घेत आहेत व तसा करार झालेला आहे. आमचे पक्षकार सदर मालमत्ता दि विदर्भ प्रिमियर को-ऑप हाऊसिंग सोसाईटीकडे गहाण ठेऊन कर्ज घेणार आहेत.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मोबाईल क्र ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७८४/२०२६ प्रोसेस नं.६८३६/२०२६
चौ.ता. ०९/०७/२०२६ दिनांक : १३/०५/२०२६

**अर्जदार :** १. रंजनाबाई जगदेवराव ढवळे रा. रंभापूर, निपाणा, जि. अकोला २. अपर्णा सुनिल पळसपगार रा. मु. पो. भामोड, ता. दर्यापूर, जि. अमरावती. ३. स्वाती गणेश तायडे रा. पंचशिल नगर, वाशिम रोड बायपास, अकोला, ता. जि. अकोला, ४. अविनाश जगदेव ढवळे रा. वणीरंभापूर, निपाणा, अकोला. ५. जया प्रविण पळसपगार रा. भामोड, दर्यापूर, जि. अमरावती. ६. सिद्धांत जगदेवराव ढवळे रा. मु. वणी रंभापूर, वणी, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जगदेव बबन ढवळे
**पत्ता :-** रा. रंभापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जगदेव बबन ढवळे यांचे दि. ११/०९/२०२५ रोजी सिटी हॉस्पिटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतांस वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का)

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**तहसिलदारअकोट यांचे कार्यालय, ता. अकोट, जि. अकोला**

क्र.प्रस्तु-३/ना.तह/कावि- ७५ /२०२६ दिनांक : ०१ /०४/२०२६

**जाहीरनामा**

मौजे मुंडगांव व इतरत्र लोकांना याव्दारे सूचित करण्यात येते की, अर्जदार ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत मुंडगांव, रा. अकोट, ता. अकोट, जि. अकोला यांनी या कार्यालयात प्रस्ताव सादर करुन, वामन तुळशीराम रौंदळकर यांचा मृत्यु दि. ०७/०८/१९७० रोजी झालेला असून त्याची नोंद ग्राम पंचायत मुंडगाव यांचे जन्म - मृत्यु नोंदवहीमध्ये अनावधानाने झालेली नसल्यामुळे वामन तुळशीराम रौंदळकर यांचा मृत्यु दि. ०७/०८/१९७० रोजी झाल्याबाबत ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत मुंडगांव यांच्या जन्म - मृत्यु नोंदवहीमध्ये नोंद घेण्याकरीता जन्म - मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) सुधारीत आदेश २०२३ नुसार परवानगी आदेश निर्गमित करण्याबाबत विनंती केली आहे.

उपरोक्त प्रमाणे परवानगी आदेश देण्याबाबत कुणाची काही हरकत / आक्षेप असल्यास हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या कार्यालयात आपली हरकत / आक्षेप लेखी स्वरुपात दाखल करावी. मुदतीनंतर आलेली हरकत / आक्षेप ग्राह धरली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

(शिक्का)

**तहसिलदार,**
**अकोट**

# रॉबरी प्रकरणातील फरार आरोपीला ठोकल्या बेड्या

## दोन साथीदारांकडून देशी कट्टे, काडतुसे जप्त : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील गुन्हेगारीविरोधातील कारवाईला वेग देत स्थानिक गुन्हे शाखेने 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मोठी कारवाई करत जबरी चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला जेरबंद केले. विशेष म्हणजे, आरोपीच्या दोन साथीदारांकडून दोन देशी कट्टे आणि जिवंत काडतुसे जप्त करण्यात आल्याने अवैध शस्त्रसाठ्याचे धागेदोरे समोर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

काही दिवसांपूर्वी जुने शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पातूर रोडवर ट्रक चालकाला मारहाण करून लुटण्यात आले होते. या गुन्ह्यात सहभागी असलेला अतिष विष्णू सूर्यवंशी हा फरार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार संबंधित आरोपीकडे देशी



कट्टा असल्याचेही उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी तातडीने दोन स्वतंत्र पथके तयार करून आरोपींच्या हालचालींवर पाळत ठेवण्यास सुरुवात केली.

मालवाडा ते हातरूण मार्गावर सापळा रचून पोलिसांनी अतिष विष्णू सूर्यवंशी (रा. डोंगरगाव) व त्याचा साथीदार अभिषेक बबन डोंगरे (रा. मालवाडा) यांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान अभिषेक डोंगरे याच्याकडून एक देशी कट्टा आणि एक जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. त्याचवेळी दुसऱ्या पथकाने पातूर येथील टीकेव्ही चौक परिसरातून सूरज ऊर्फ सुऱ्या शंकर सोनटक्के (रा. चिखलवाडी, नांदेड) याला अटक केली. त्याच्याकडूनही एक देशी कट्टा आणि जिवंत काडतूस हस्तगत करण्यात आले.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे ही कारवाई यशस्वी ठरली.

### चौकशीत रॉबरी प्रकरणाचा उलगडा

ताब्यात घेतलेल्या आरोपींची कसून चौकशी केली असता अतिष सूर्यवंशी हा जुने शहर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्यातील फरार आरोपी असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे त्याला पुढील तपासासाठी जुने शहर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तर अभिषेक डोंगरे आणि सूरज सोनटक्के यांच्याविरोधात पातूर व उरळ पोलिस ठाण्यात शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### अवैध शस्त्रांच्या साखळीचा तपास सुरू

या कारवाईत दोन देशी कट्टे आणि जिवंत काडतुसे जप्त झाल्याने आरोपींकडे ही शस्त्रे नेमकी कुठून आली, त्यामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. आगामी चौकशीत आणखी काही धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# रोटरी क्लब अकोला नॉर्थ द्वारे शालेय विद्यार्थिनींना ५० सायकलींचे वितरण



■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रीराम कृष्ण विवेकानंद सेवा मंडळ अकोला द्वारा संचालित मा सारदा ज्ञानपीठ येथे अकोल्यातील सेवाभावी संस्था रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थ रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० च्या संकल्पित मिशन एज्युकेशन: विंग्स ऑन व्हील या उपक्रमा द्वारे होतकरू आणि गरजू विद्यार्थिनींसाठी निशुल्क सायकल वितरण कार्यक्रमाचे आयोजन रामकृष्ण विवेकानंद सेवा मंडलाचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ सत्यनारायण बाहेती यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला यामध्ये विविध शाळेतील ५० विद्यार्थिनींना नवीन उत्कृष्ट दर्जा असलेल्या सायकली चे निशुल्क वितरण करण्यात आलेष.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री रामकृष्ण मिशन आश्रम पालघरचे प्रमुख स्वामी तनिष्का आनंद जी महाराज रोटरी क्लबच्या नॉर्थच्या अध्यक्षा डॉ श्रद्धा अग्रवाल, प्रकल्प प्रमुख व माजी अध्यक्ष एड रवी शर्मा तसेच शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत खत्री हे मंचावर उपस्थित होते रोटरी क्लब सदस्यांच्या सौजन्याने सायकली उपलब्ध करून देण्यातआल्या.

कार्यक्रमाचा प्रारंभ मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन आणि शारदा स्तवनाने झाला. प्रमुख अतिथीं चे स्वागत डॉक्टर श्रद्धा अग्रवाल यांनी केले.

# मनपा शिक्षकांच्या सातव्या वेतन थकबाकी वितरणास प्रारंभ

## आमदार साजिद पठाण यांच्या पाठपुराव्याला यश; शिक्षक संघटनेकडून आभार

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेतील शिक्षकांच्या सातव्या वेतन आयोगाअंतर्गत देय असलेल्या ५० टक्के थकबाकीच्या वितरणास अखेर सुरुवात झाली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या मागणीला प्रतिसाद मिळाल्याने शिक्षकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या प्रश्नाच्या पाठपुराव्यासाठी पुढाकार घेतलेल्या अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण आणि अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धीरज लिंगाडे यांचे शिक्षक संघटनेने आभार मानले आहेत.



महानगरपालिकेतील शिक्षकांचे सातव्या वेतन आयोगाची थकबाकी, मुख्याध्यापक पदोन्नती, पदवीधर शिक्षक पदोन्नती, निवड श्रेणी तसेच वरिष्ठ वेतन श्रेणी यांसह विविध सेवा विषयक प्रश्न दीर्घकाळ प्रलंबित होते. या पार्श्वभूमीवर २०२५ मध्ये आमदार साजिद पठाण आणि आमदार धीरज लिंगाडे यांनी मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्यासोबत बैठक घेऊन संबंधित विषयांवर चर्चा केली होती.

शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, यासाठी दोन्ही लोकप्रतिनिधींनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यानंतर मनपा प्रशासनाने सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या वितरणाची प्रक्रिया सुरू केली असून, इतर प्रलंबित विषयांवरही कार्यवाहीला गती मिळाल्याचे सांगितले जात आहे.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अकोला मनपा शिक्षक संघटनेच्या वतीने आमदार साजिद खान पठाण यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील भूमिका घेतल्याबद्दल संघटनेने त्यांचे तसेच मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष अर्जुन कोळी, राज्य सरचिटणीस राजीव भिरड, राज्य संघटक अन्वर हुसेन शेख, रहेमान अवधूत, हाफिज खान, नईम फराज, युवराज पठाडे, मनोज बोचरे, गजेंद्र ढवळे, मजहर सर, अनीस खान, नझीम सर, संदीप राठोड, मयूर पवार, सुशीला सोनवणे, नयना गोटे, सज्जाद अहमद, वसीमूर रहेमान, रिजवान सर यांच्यासह शिक्षक व पदाधिकारी उपस्थित होते.

सातव्या वेतन आयोगाच्या थकबाकी वितरणाला सुरुवात झाल्याने शिक्षकांच्या दीर्घकाळ प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याची भावना व्यक्त होत आहे. उर्वरित सेवा विषयक प्रश्नांबाबतही लवकरच सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा शिक्षक वर्गातून व्यक्त करण्यात येत आहे.

# वादळाने घातला घाला; केळी उत्पादक हवालदिल

## तेल्हाऱ्यातील बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख मदतीची मागणी; विलास ताथोड यांचा आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

गेल्या काही दिवसांत तेल्हारा तालुक्यात झालेल्या भीषण वादळी वाऱ्याने केळी व पपई उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, कापणीच्या उंबरठ्यावर असलेल्या फळबागा अक्षरशः जमीनदोस्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक मदत देण्यात यावी, अशी जोरदार मागणी शरद जोशी स्थापित शेतकरी संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य विलास ताथोड यांनी केली आहे. प्रशासनाने त्वरित निर्णय न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.





ताथोड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे सांगितले की, वर्षभर प्रचंड मेहनत, कर्जाचा डोंगर आणि वाढत्या उत्पादन खर्चाचा सामना करत शेतकऱ्यांनी केळी व पपईच्या बागा उभ्या केल्या होत्या. मात्र अचानक आलेल्या वादळी वाऱ्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला. अनेक शेतांमधील केळीच्या बागा कोसळल्या असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

आधीच खतांच्या वाढत्या किमती, उत्पादन खर्चाच्या तुलनेत मिळत नसलेला दर आणि सततच्या नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असताना या नव्या संकटाने त्याचे कंबरडे मोडले आहे. अशा परिस्थितीत केवळ पंचनाम्यांचे सोपस्कार करून वेळकाढूपणा न करता प्रत्यक्ष मदत पोहोचविण्याची गरज असल्याचे ताथोड यांनी नमूद केले. शेतकरी संघटनेने प्रशासनासमोर काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये तेल्हारा तालुक्यातील सर्व बाधित शेतांचे कोणत्याही अटींशिवाय तात्काळ संयुक्त पंचनामे करण्यात यावेत, केळी व पपई पिकांच्या नुकसानीसाठी विशेष पॅकेज जाहीर करून फळबाग उत्पादकांना प्रतिहेक्टर एक लाख रुपयांची नुकसानभरपाई थेट खात्यात जमा करावी, तसेच पीक विमा कंपन्यांच्या दिरंगाईला आळा घालून विमा रक्कम त्वरित मंजूर करावी, यांचा समावेश आहे. 'शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू सरकारला दिसत नाहीत का? संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देणे ही शासनाची जबाबदारी आहे,' असा सवाल करत ताथोड यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, नुकसानीची व्याप्ती लक्षात घेता शासनाने विशेष मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी बाधित शेतकऱ्यांमधूनही होत आहे. प्रशासनाने तात्काळ पावले न उचलल्यास शेतकरी संघटना रस्त्यावर उतरून आंदोलन छेडेल, असा इशारा विलास ताथोड यांनी दिला आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८१**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आरक्षण निश्चिती करा

## राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची माहिती; सार्वत्रिक व पोटनिवडणुकीबाबत आढावा बैठक

**वर्धा/जनमाध्यम**

ग्रामपंचायतीच्या सदस्य पदासाठी विविध प्रवर्गाकरीता राखून ठेवावयाच्या जागेची आरक्षण निश्चिती भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करुन निश्चिती करावी, अशा सुचना राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी केल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात सार्वत्रिक व पोट निवडणूकी संदर्भात आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी त्यांनी या सुचना केल्या. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी, अप्पर जिल्हाधिकारी संजय तेली, उपजिल्हाधिकारी रमा जोशी, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश खताळे, आर्वीचे उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, हिंगणघाटचे आकाश अवतारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक वैशाली रसाळ, आठही तहसिलचे तहसिलदार उपस्थित होते.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीबाबत न्यायालयाने आदेश दिल्यास दिवाळीनंतर निवडणूका घेण्यात येईल. यासाठी सर्व संबंधित विभागांनी निवडणुकीसाठी तयारी करावी. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी कर्मचारी वर्ग कमी पडत असल्यास इतर विभागातील कर्मचा-यांची निवडणूक कामासाठी नियुक्ती करावी. आराक्षण निश्चितीबाबत अडचण असल्यास निवडणूक आयोगाचे मार्गदर्शन घ्यावे, अशा सुचना दिनेश वाघमारे यांनी केल्या.

उपलब्ध असलेल्या इव्हीएम मशीन सोबतच आयोगाकडे प्राप्त झालेल्या अत्याधुनिक नवीन इव्हीएम मशीन लवकरच उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. नवीन मशीनमध्ये बदल असलेल्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पुरविण्यात येणा-या मशीनसाठी गोदाम उपलब्ध करुन ठेवावे. या गोदामामध्ये सीसीटीही कॅमेरे, फायर सुरक्षा, लाकडी प्लॅटफार्मवर लोखंडी रॅकची सुविधा असावी.

बैठकीमध्ये जिल्ह्यातील ५१९ ग्राम पंचायतीपैकी सन २०२४ मध्ये ३१५ ग्रामपंचायत, सन २०२५ मध्ये १ ग्रामपंचायत, सन २०२६ मध्ये ५० ग्रामपंचायतीची मुदत संपलेली असून २ नवनिर्मित ग्रामपंचायत असून अशा एकुण ३६८ ग्रामपंचायतीच्या सदस्य पदासाठी आरक्षण निश्चित करण्यात येणार असल्याचे तसेच सदस्याचे आरक्षण निश्चित करतांना उद्भवणा-या अडचीणी व ५० टक्केच्या मर्यादेत आरक्षण निश्चित झालेल्या ग्रामपंचायती, ५० टक्के च्या वर आरक्षण जात असलेल्या ग्रामपंचायतीची माहिती तसेच जिल्ह्यात उपलब्ध असलेल्या इव्हीएम मशीनच्या संख्येची माहितीचा तपशिल बैठकीत सांगण्यात आला.

# टाकळीकर तहानेने होरपळले; ८० लाखांची पाण्याची टाकी कोरडी

## 'जलजीवन'चा निधी गिळंकृत, प्रशासकाच्या बेफिकीरीने टाकळी (निधा) वाळवंटाच्या उंबरठ्यावर

**टाकळी (निधा)/ जनमाध्यम**

शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या योजनांचा गवगवा एकीकडे आणि दुसरीकडे पाण्याच्या एका थेंबासाठी जीव मुठीत धरून भटकणारे टाकळी (निधा) येथील ग्रामस्थ! जलजीवन मिशन आणि ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या नावाखाली लाखो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला, मात्र गावकऱ्यांच्या नशिबी आजही तहान आणि हालअपेष्टाच आल्या आहेत. गावात दहा वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्चून उभारण्यात आलेली पहिली पाण्याची टाकी आजपर्यंत वापरात आलीच नाही. ग्रामपंचायतीशेजारी उभारलेली ही टाकी, यशोदा नदीकाठी खोदलेली विहीर आणि संपूर्ण गावात टाकलेली पाईपलाईन आज धूळ खात पडली आहे. टाकीत कधी पाणीच भरले गेले नसल्याने तिच्यावर तडे गेले असून लाखो रुपयांचा निधी अक्षरशः मातीमोल झाला आहे.



ग्रामस्थांच्या संतापानंतर तीन वर्षांपूर्वी जलजीवन मिशन अंतर्गत तब्बल ८० लाख रुपये खर्च करून नवीन टाकी व नवीन पाईपलाईन उभारण्यात आली. मात्र या योजनेचेदेखील तीन तेरा वाजले. ८० लाखांची नवी टाकीही आजपर्यंत कोरडीच आहे. तीन वर्षे पाणी न पाहिलेल्या या टाकीलादेखील आता भेगा पडू लागल्या असून शासनाचा निधी पुन्हा वाया जाण्याच्या मार्गावर आहे. विशेष म्हणजे गावात दोन-दोन टाक्या, मुबलक पाण्याची विहीर आणि तयार पाईपलाईन असतानाही नागरिकांना नळाद्वारे पाणी मिळत नाही. गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या प्रशासक राजमुळे गावाचा कारभार पूर्णपणे वाऱ्यावर सोडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामसेवक आणि प्रशासक गावाकडे फिरकत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे.

# सामाजिक वनिकरण विभागाच्या रोपवाटिकेत वृक्षारोपण



**वर्धा/जनमाध्यम**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभाग, वन परिक्षेत्र, वर्धा यांनी एमआयडीसी येथील रोपवाटिकेत वृक्षारोपणाचे आयोजन केले. याप्रसंगी जांभूळ व कडुलिंबासह विविध प्रजातींच्या रोपांची लागवड करण्यात आली.

या कार्यक्रमात सामाजिक वनीकरण विभागाच्या सहायक वनसंरक्षक अंकिता तेलंग, वनपरिक्षेत्र अधिकारी संगीता ढोबळे, मुख्य लेखापाल प्रीती पुसनाके, लेखापाल कल्पना सोनवणे, वनपाल उमेश बावणे, चंद्रशेखर कुटारे, सतीश उरकुडे, वनरक्षक विजय दिघोळे, मानद वन्याजीव प्रतिपालक कौशल मिश्र, महात्मा गांधी अंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बी.एस.मिरगे यांच्यासह इतरांनी रोपांची लागवड केली. या कार्यक्रमादरम्यान, कारंजा वनक्षेत्रातून गोळा केलेल्या विविध जातीच्या देशी आंब्यांच्या गुठळ्या वन विभागाकडे सुपूर्द करण्यात आल्या. वर्धा जिल्ह्यात आढळणाऱ्या आंब्याच्या विविध प्रजातींच्या बिया गोळा करून रोपवाटिकेत लावल्या जात आहेत. रोपे तयार झाल्यावर त्यांची विविध ठिकाणी लागवड केली जाईल. यासाठी वन्यजीव संरक्षक कौशल मिश्र, बी.एस. मिरगे, ?ड. ताम्रध्वज बोरकर इत्यादींनी पुढाकार घेऊन कारंजा परिसरातून पहिली खेप गोळा केली. सामाजिक वनीकरण विभागाने या उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि पर्यावरण संरक्षण व संवर्धनाच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे म्हटले.

# 'येळकोट येळकोट जय मल्हार!'च्या गजरात अहिल्यादेवींच्या कार्याला अभिवादन

## वर्धा येथे ३०१ वी जयंती उत्साहात साजरी

**वर्धा/जनमाध्यम**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त वर्धा शहरात भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा संगम अनुभवायला मिळाला. 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषात धनगर समाज बांधवांनी मोठ्या उत्साहाने विविध उपक्रम राबवून अहिल्यादेवींना अभिवादन केले. जयंतीनिमित्त समाजहिताचा संदेश देत पवणार येथील धाम नदी घाट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. 'एक दिवस माझ्या समाजासाठी' या ब्रीदवाक्याखाली आयोजित या उपक्रमाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी वंजारी चौक येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक परिसरात गृहराज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते



अहिल्यादेवींच्या पुतळ्याचा दुग्धाभिषेक करण्यात आला. यावेळी धनगर समाज सेवा मंडळाचे पदाधिकारी व समाजातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर आयोजित कार्यक्रमात समाजातील सेवानिवृत्त कर्मचारी व अधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विविध विभागांमध्ये नवनियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचाही गौरव करण्यात आला. मार्च २०२६ मध्ये दहावी व बारावी परीक्षेत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. कार्यक्रमात सतीश महाराज देशमुख यांचे प्रेरणादायी व्याख्यान झाले. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, भाजप नेते जयंत कावळे, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मी घोडके, डॉ. अनिल लोणारी आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सायंकाळी काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेने संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या वेशभूषेतील आकर्षक चित्ररथ, लेझीम पथक, भजन मंडळे आणि समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे मिरवणुकीला विशेष रंगत आली. वंजारी चौक येथील स्मारकापासून सुरू झालेली मिरवणूक इंदिरा मार्केट, सोशालिस्ट चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे पुन्हा स्मारकस्थळी पोहोचताच कार्यक्रमाची सांगता झाली. अहिल्यादेवींच्या लोककल्याणकारी कार्याचा आदर्श समाजासमोर ठेवत श्रद्धा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश देणारा संस्मरणीय ठरला.

### झाडे लावा, भविष्य वाचवा

# निमगावात पर्यावरण दिनी वृक्षारोपणाचा हिरवा संकल्प



**वर्धा/जनमाध्यम**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त निमगाव येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. सामाजिक कार्यकर्ते तथा गायक गंगाधर मसराम यांच्या शेतशिवारातील बांधावर विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमात गावातील महिला संघटनांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली. यावेळी गंगाधर मसराम यांनी पर्यावरणाचे महत्त्व विषद करत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रेरणादायी विचार मांडले तसेच पर्यावरण जनजागृतीपर गीत सादर केले. कार्यक्रमाला वृक्षप्रेमी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. वृक्षारोपणातून निसर्ग संवर्धनाचा संदेश देत पर्यावरण रक्षणाचा दृढ संकल्प यावेळी करण्यात आला.

# जागतिक सायकल दिनानिमित्त आज 'संडेज ऑन सायकल'

**वर्धा/जनमाध्यम**

भारत सरकारच्या फिट इंडिया व खेलो इंडिया उपक्रमांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा खेलो इंडिया बॉक्सिंग सेंटरच्या संयुक्त विद्यमाने जागतिक सायकल दिनानिमित्त ७ जून रोजी संडेज ऑन सायकल या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जास्ती संख्येन सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सायकलींगमुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढण्यास मदत होते, पर्यावरण संवर्धनास हातभार लागतो तसेच इंधन बचतीमुळे देशाच्या प्रगतीस योगदान मिळते. फिट इंडिया-ग्रीन इंडिया-सायकल इंडिया या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रॅलीचा शुभारंभ जिल्हा क्रीडा संकुल येथून होणार असून आंबेडकर पुतळा-गांधी पुतळा परत जिल्हा क्रीडा संकुल येथे रॅली येणार आहे. या सायकल रॅलीमध्ये जास्तीत जास्त खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडाप्रेमी, नागरिक व युवक युवतींनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी केले आहे.



# 'जमनालाल' पुन्हा चौकात विराजमान; सौंदर्यीकरणानंतर पुतळ्याचे पुनर्स्थापन

**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा शहरातील प्रमुख वाहतूक मार्गांना जोडणाऱ्या ऐतिहासिक जमनालाल बजाज चौकातील जमनालाल बजाज यांच्या पुतळ्याचे सौंदर्यीकरणानंतर पुन्हा मूळ जागेवर पुनर्स्थापन करण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे.

चौकाच्या सर्वांगीण सौंदर्यीकरणाचे काम सध्या सुरू असून हे काम बजाज समूहाच्या पुढाकारातून करण्यात येत आहे. सौंदर्यीकरणाच्या कामासाठी पुतळा तात्पुरता हलविण्यात आला होता. मात्र पुतळा हटविल्यानंतर शहरात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले होते. काही नागरिकांनी पुतळा कायमस्वरूपी हलविण्यात येणार असल्याचीही चर्चा केली होती. दरम्यान, चौकातील काम अंतिम टप्प्यात पोहोचल्यानंतर जमनालाल बजाज यांच्या पुतळ्याचे पुन्हा सन्मानपूर्वक मूळ ठिकाणी पुनर्स्थापन करण्यात आले. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, या चौकाच्या सौंदर्यीकरणासाठी शासनाच्या निधीचा वापर होत नसून संपूर्ण खर्च बजाज समूहाकडून उचलण्यात येत आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. सौंदर्यीकरण पूर्ण झाल्यानंतर जमनालाल बजाज चौक अधिक



आकर्षक, सुशोभित आणि आधुनिक स्वरूपात नागरिकांसमोर येणार असून शहराच्या वैभवात आणखी भर पडणार आहे असे अनुराग बजाज यांनी सांगितले.

# पावसाळ्यापूर्वी विरूळमध्ये नाल्यांच्या साफसफाईला वेग

**विरूळ (आकाजी) /जनमाध्यम**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर विरूळ ग्रामपंचायतीकडून गावातील नाल्यांच्या साफसफाईची मोहीम हाती घेण्यात आली आहे. वर्षभर साचलेला गाळ, कचरा आणि झुडपे यामुळे अनेक नाल्या तुंबल्या होत्या. त्यामुळे पावसाळ्यात नाल्यांचे पाणी रस्त्यावर येऊन गावात अस्वच्छता निर्माण होण्याची शक्यता होती.

ही बाब लक्षात घेऊन ग्रामपंचायतीने संपूर्ण गावातील नाल्यांची साफसफाई सुरू केली आहे. मजुरांच्या माध्यमातून नाल्यांमधील गाळ व कचरा काढण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून पाण्याचा प्रवाह सुरळीत करण्यावर भर दिला जात आहे. यामुळे पावसाळ्यात पाणी



साचणे, दुर्गंधी आणि साथीच्या रोगांचा धोका कमी होण्यास मदत होणार आहे.

ग्रामविस्तार अधिकारी मनवे यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचारी राहुल मेश्राम, अविनाश तेलंग, निलेश वानखेडे आणि ज्ञानेश्वर उयके यांच्या देखरेखीखाली साफसफाईची कामे सुरू आहेत. गावातील प्रमुख रस्ते व वस्त्यांमधील नाल्यांची स्वच्छता करण्यात येत असून पावसाळ्यापूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

ग्रामपंचायतीच्या या उपक्रमामुळे गावातील स्वच्छतेला चालना मिळणार असून नागरिकांनीही परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत.

# मोटारसायकलच्या धडकेत कारचे नुकसान

**वर्धा**-शहरालगतच्या नालवाडी शिवारात अज्ञात मोटारसायकलस्वाराने भरधाव वेगात कारला धडक दिल्याने कारचे मोठे नुकसान झाल्याची घटना घडली. लक्ष्मीनगर येथील विनय मून हे आपल्या एमएच-३२ एक्स-४०५१ क्रमांकाच्या कारने प्रवास करीत असताना ही घटना घडली.

अचानक आलेल्या दुचाकीस्वाराने कारला जोरदार धडक दिली. अपघातानंतर दुचाकीस्वार घटनास्थळावरून पसार झाला. या धडकेत कारच्या बॉडीसह अन्य भागांचे नुकसान झाले असून सुमारे ६० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा अंदाज आहे. घटनेची माहिती मिळताच संबंधितांनी रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे वाहनचालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वीरशैव सेवा मंडळाच्या उपक्रमाला भरघोस प्रतिसाद

## धर्मसभा व आशीर्वचनांनी भाविक भारावले

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील वीरशैव सेवा मंडळाच्या वतीने पवित्र ज्येष्ठ अधिकमासानिमित्त आयोजित धर्मसभा, आशीर्वचन व दर्शन सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. परमपूज्य श्री श्री श्री १००८ जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी, जंगमवाडी मठ, काशीज्ञानपीठ यांच्या दिव्य सानिध्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

या प्रसंगी अध्यात्म, धर्म आणि मोक्षमार्गाचा संदेश देणाऱ्या 'मार्ग हा मुक्तीचा' या ग्रंथाचे लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला प्र.भ्र. १०८ डॉ. वीरुपाक्ष बाळापूरकर स्वामी (मांजरसुंभा), प्र.भ्र. १०८ श्री शिवशंकर शिवाचार्य स्वामी (नेरपिंगळाई) तसेच प्र.भ्र. १०८ सदाशिव शिवाचार्य स्वामी (वेळापूर, जि. सोलापूर) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित संत-महंतांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यानंतर विविध स्वामींनी आपल्या आशीर्वचनातून धर्म, संस्कार, समाजएकता आणि अध्यात्मिक जीवनाचे महत्त्व विशद केले. जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांनी आपल्या प्रभावी मार्गदर्शनातून मानवजन्माचे सार्थक साधण्यासाठी सदाचार, सेवा आणि शिवभक्तीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन केले.

यावेळी वर्धा नगर परिषदेचे अध्यक्ष तथा शहराचे प्रथम नागरिक सुधीरभाऊ पांगुळ यांचाही जगद्गुरूंच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. धर्मसभेला वीरशैव-लिंगायत समाजातील महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने



उपस्थित राहून संतांच्या आशीर्वादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाची सांगता प्रसाद वितरणाने झाली. प्रसाद वितरणाची व्यवस्था वसंतराव मरडवार यांच्या सौजन्याने करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वीरशैव सेवा मंडळाचे अध्यक्ष श्यामरावआप्पा आनपान यांच्यासह विजयराव माजरखेडे, सुनील मोकाशी, विलास मोकाशी, अभय नगरे, अविनाश कोमलवार, शिवकुमार निलेवार, सुरेशराव कापसे, मनोज मरडवार तसेच महिला मंडळातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. भक्ती, अध्यात्म आणि समाजएकतेचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थितांच्या स्मरणात दीर्घकाळ राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १९०**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# सर्जन असोसिएशनचा समाज कल्याण सप्ताह

## वृक्षारोपण, कॅन्सर जागरूकता, रक्तदान शिबिरासह विविध कार्यक्रम




**अमरावती/प्रतिनिधीः-** असोसिएशन ऑफ सर्जन ऑफ इंडिया द्वारा सामाजिक कल्याण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या निमित्य १४ जून पर्यंत विविध सामाजिक उपक्रम घेतले जात आहे. या सप्ताहाचा डॉक्टर राजेंद्र गोडे मेडिकल महाविद्यालय व पीडीएमसी मध्ये वृक्षारोपण करून शुभारंभ झाला आहे. विविध कार्यक्रम १४ जून पर्यंत घेण्यात येणार असल्याची माहिती आज शनिवार ६जून रोजी झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये असोसिएशनचो अध्यक्ष डॉ.मुरलीधर बुब यांनी दिली. त्यांनी सांगितले की या अंतर्गत रविवार ७ जून रोजी होमगार्ड ऑफिस मध्ये मूलभूत जीवन आधार वर मार्गदर्शन सकाळी सात ते नऊ वाजेपर्यंत होणार व सायंकाळी आयएमए हॉलमध्ये वरिष्ठ सर्जन डॉक्टरांचा सत्कार सोहळा सायंकाळी ७ ते १० वाजेपर्यंत पार पडणार आहे. यामध्ये डॉ. सत्यनारायण कासट, डॉ. सुरेश सावदेकर, डॉ. उद्धवराव देशमुख, डॉ. प्रभाकर जवंजाळ, डॉ. आर एम शेळके यांचा सत्कार होणार आहे. सोमवार ८ जून रोजी नर्सेस ट्रेनिंग कार्यक्रम सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत होणार असून ९ जून रोजी शिवटेकडी येथून वॉकथान सकाळी ७ वाजता सुरू होणार आहे. १० जून रोजी आसेगाव पूर्णा येथे स्तन कॅन्सर जागरूकता अभियान व आशा वर्कर प्रशिक्षण कार्यक्रम होणार आहे. ११ जून रोजी कारंजा लाड येथील रामयोगी मठामध्ये स्तन कॅन्सर जागरूकता अभियान व आशा वर्कर प्रशिक्षण कार्यक्रम आणि वृक्षारोपण होणार आहे. १२ जून रोजी डॉक्टर डगवार यांच्या क्रिकेट टर्फ मध्ये वृक्षारोपण होणार आहे. याच दिवशी सायंकाळी गाडगे महाराज वृद्धाश्रमामध्ये अन्नदान कार्यक्रम होणार आहे. १३ जून रोजी पीडीएफसी मध्ये सामाजिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. १४ जून रोजी डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज, सुजान कॅन्सर हॉस्पिटल, मंगरूळपीर येथील पूना हॉस्पिटल व परतवाडा मध्ये पोरे हॉस्पिटलमध्ये सकाळी दहा वाजता रक्तदान शिबीर होणार आहे. कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डॉ. ओ.जी मुंदडा यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या कार्यक्रमांमध्ये डॉ.जयश्री इंगोले, डॉ.राजेंद्रसिंह अरोरा, डॉ. अनंत पोरे, डॉ. किशोर बेले, डॉ. कौस्तुभ सारडा, डॉ. संगीता खोना, डॉ. राजेंद्र गणेरीवाल, डॉ. आशिष डगवार, योगेंद्र गोडे, डॉ. योगेश गोडे, डॉ. सुधा जैन, डॉ. ए.टी. देशमुख, डॉ. दिनेश वाघाडे, डॉ. विक्रम वानखडे, डॉ. रोहन बोबडे, डॉ. खोंना,सौ. सहस्त्रबुद्धे, डॉ जोशी, डॉ. नवहाते, डॉ.कोल्हे, प्रकाश चव्हाण, डॉ. नैना कडू, सुवर्णा जवंजाळ आदि प्रयत्न करत आहे. पत्रकार परिषदेमध्ये डॉ. मुरली बुब, डॉ. मंजुश्री बुब, डॉ. कौस्तुभ सारडा, डॉ. राजेंद्र गणेरीवाल, डॉ. जयश्री इंगोले, डॉ. आशिष डगवार, डॉ. राजेंद्रसिंह अरोरा, डॉ. उमाळे आदि उपस्थित होते.

**१० पासून योगा फॉर डॉक्टर्स-**

सामाजिक सप्ताह अंतर्गत आय एम ए हॉलमध्ये १० जून ते २१ जून पर्यंत सकाळी सात ते साडेआठ वाजेपर्यंत योगा फॉर डॉक्टर चे आयोजन करण्यात आले आहे. हे योग शिबिर डॉ. आशिष डगवार यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये योग गुरु व मार्गदर्शक जनार्दन स्वामी, योगाभ्यास मंडल चे शिक्षक मकरंद जोक स्मिता जोक मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमाला डॉक्टर दिनेश वाघाडे, डॉ. विक्रम वानखडे, डॉ. रोहन बोबडे यांचे सहकार्य लाभले आहे.

# आज ट्रायओरिजिन स्माइल मुद्रा मेडिटेशन सेमिनार व भव्य आरोग्य शिबिर

**अमरावती/प्रतिनिधीः-** संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी दुपारी १२ ते रात्री ८ वाजेपर्यंत ट्रायओरिजिन स्माइल मुद्रा मेडिटेशन सेमिनाराचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत दुपारी ३.३० ते ५.३० या वेळेत नागरिकांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजनही करण्यात आले असून नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा सेमिनार दवा ना खाना या यूट्यूब चैनलवर लाइव लाइव राहणार आहे .

हा सेमिनार ट्रायओरिजिन सायन्सवर आधारित असून या विज्ञानाचे संस्थापक प्रा. पार्क जे वू आहेत. या विज्ञानाच्या आधारे विविध स्माइल मुद्रांचा विकास ओरिजिन स्माइल फाउंडेशनचे संस्थापक व स्माइल मेडिटेशन अकादमीचे संचालक डॉ. पंकज जैन यांनी केला आहे. सेमिनारमध्ये सहभागी होणाऱ्यांना ॲक्युप्रेशर, सुजोक स्माइल मुद्रा, मेरिडियन स्माइल मुद्रा, इमोशन स्माइल मुद्रा, स्माइल ताई-ची तसेच इतर विविध उपयुक्त मुद्रांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाणार आहे.

या सेमिनाराचा मुख्य उद्देश नागरिकांची एकाग्रता वाढविणे, तणाव व्यवस्थापन, भावनिक संतुलन विकसित करणे, मानसिक व शारीरिक थकवा दूर करणे, अभ्यासात रुची निर्माण करणे तसेच जीवनाकडे सकारात्मक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी प्रभावी व सोप्या तंत्रांची माहिती देणे हा आहे. दैनंदिन जीवनात विविध मुद्रांचा उपयोग करून आरोग्य व आनंद कसा वाढविता येईल याबाबतही सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यक्रमाचे प्रमुख व संचालक म्हणून डॉ. पंकज जैन कार्यरत असून कार्यक्रम समन्वयाची जबाबदारी नीलिमा भटकर, वैशाली बोरकर, विशाल सोमकुमार , वर्षा पेरके ,दीपक करवा यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. अमरावती व नागपूर स्माइल टीमच्या वतीने सर्व नागरिकांना या सेमिनार व आरोग्य शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन आरोग्य, आनंद आणि सकारात्मक जीवनशैलीचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# आज भव्य सायकल रॅली; पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालयाच्या 'मेरा युवा भारत' उपक्रमांतर्गत अमरावती येथे 'नेशन फर्स्ट चॅलेंज: पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करा' या मोहिमेचा भाग म्हणून आणि 'जागतिक सायकल दिन - २०२६' निमित्ताने भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली रविवार, दिनांक ७ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ७ वाजता जिल्हा स्टेडियम, अमरावती येथून सुरू होईल. रॅलीचा मार्ग जिल्हा स्टेडियमवरून निघून बाबासाहेब आंबेडकर चौक - राजकमल चौक - बाबासाहेब आंबेडकर चौक - गर्ल्स हायस्कूल मार्गे अमरावती ग्रामीण पोलीस ग्राउंड असा असणार आहे.

ही रॅली 'माय भारत अमरावती', महानगरपालिका अमरावती, पोलीस अधीक्षक कार्यालय ग्रामीण, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा परिषद, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती आणि 'अमरावती सायकलिंग असोसिएशन' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केली जात आहे. पर्यावरणपूरक वाहतुकीचे साधन म्हणून सायकलचा वापर वाढवणे, इंधनाची बचत करणे, तसेच नागरिकांमध्ये आरोग्यदायी जीवनपद्धती आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश आहे.

या मोहिमेच्या माध्यमातून अमरावतीकरांना 'फिट, हेल्दी आणि एकता ' चा संदेश दिला जाणार असून, शहरातील शेकडो नागरिक, युवक आणि सायकलप्रेमी यात मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

# मान्सूनमध्ये वीज पडण्यापासून बचाव करण्यासाठी 'दामिनी' ॲप वापरा

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** मान्सून काळात, विशेषतः जून आणि जुलै महिन्यांत वीज पडण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ होते. यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर जीवित, वित्त आणि पशुहानी होते. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षेसाठी भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाने विकसित केलेल्या 'दामिनी' मोबाईल ॲपचा वापर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी केले आहे.

या ॲपच्या माध्यमातून वीज पडण्याच्या संभाव्य घटनांची पूर्वसूचना सुमारे १५ मिनिटे आधी मिळू शकते. जीपीएस प्रणालीवर आधारित असलेले हे ॲप वापरकर्त्यांच्या सद्यस्थितीनुसार परिसरातील विजेची हालचाल आणि संभाव्य धोका दर्शविते, ज्यामुळे नागरिकांना वेळेत सुरक्षित




ठिकाणी जाणे शक्य होते. ग्रामपातळीवरील सर्व स्थानिक व शासकीय अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी हे ॲप डाऊनलोड करून, त्यातील अलर्टनुसार नागरिकांना पूर्वसूचना द्यावी आणि जीवितहानी टाळण्यासाठी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी येरेकर यांनी केले आहे.

**असे डाऊनलोड करा 'दामिनी' ॲप-** हे ॲप मोबाईलमध्ये डाऊनलोड करण्यासाठी गुगल प्ले स्टोअरवर जाऊन 'Damini Lightning Alert' असे शोधावे आणि अधिकृत ॲप इन्स्टॉल करावे. ॲप सुरू केल्यानंतर मोबाईलचे लोकेशन (GPS) सुरू करून आवश्यक परवानग्या द्याव्यात, तसेच वेळेवर सूचना मिळण्यासाठी नोटिफिकेशन सुविधा सुरू ठेवावी.

जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषिसेवक, आपदा मित्र व सखी, कोतवाल, आशा वर्कर्स, सरपंच आणि पोलीस पाटील यांना या ॲपचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, वीज आणि पूर या आपत्तींमध्ये 'काय करावे व काय करू नये' याबाबत विनाईल बोर्डच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये जनजागृती करण्यात येत असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# जिल्हा सामान्य रुग्णालय येथे जागतिक क्लब फूट दिन उत्साहात

## -जन्मजात पायाच्या विकाराविषयी जनजागृती

अमरावती/प्रतिनिधीः-

जन्मजात पायाच्या विकाराविषयी जनजागृती निर्माण करणे, लवकर निदानाचे महत्त्व पटवून देणे आणि उपलब्ध मोफत उपचार सुविधांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे या उद्देशाने जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे डीआयईसी विभाग व बालरोग विभागाच्या संयुक्त विद्यमाने नुकताच जागतिक क्लब फूट दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

क्लब फूट हा जन्मजात पायाचा विकार असून यामध्ये बाळाचा एक किंवा दोन्ही पाय आत व खाली वळलेले असतात. हा विकार जन्मतःच दिसून येतो. मात्र योग्य वेळी निदान करून उपचार सुरू केल्यास बालकाला पूर्णपणे सामान्य जीवन जगणे शक्य होते.

जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे सन २०१९ पासून क्लब फूट उपचार कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन व प्युअर इंडिया संस्थेच्या संयुक्त विद्यमाने क्लब फूट बाधित बालकांना मोफत उपचार, समुपदेशन, आवश्यक साहित्य व नियमित फॉलोअप सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत ८८ क्लब फूट बाधित बालकांवर यशस्वी उपचार करण्यात आले असून अनेक बालकांना सामान्यपणे चालणे व दैनंदिन जीवन जगणे शक्य झाले आहे.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित पालकांना क्लब फूट विकार, त्याची कारणे, लक्षणे, उपचारपद्धती आणि उपचारांचे महत्त्व याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील ज्या बालकांना हा विकार आहे, त्यांच्या पालकांनी कोणतीही भीती अथवा आर्थिक चिंता न बाळगता जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे दर मंगळवारी ऑर्थोपेडिक विभागाच्या ओपीडी क्रमांक १० मध्ये उपस्थित राहून मोफत वैद्यकीय सल्ला व उपचारांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# शक्तीस्वरूपा बहुउद्देशीय संस्थेचा स्थापना दिन व पर्यावरण दिन उत्साहात

अमरावती/प्रतिनिधीः-

शक्तीस्वरूपा बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिवटेकडी येथे जागतिक पर्यावरण दिन तसेच संस्थेचा स्थापना दिवस उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाला अमरावती शहराचे महापौर श्रीचंद तेजवानी, पर्यावरण संरक्षण समितीचे अध्यक्ष हरिहर बोचरे , नगरसेविका तथा शहर सुधार समितीच्या अध्यक्ष राधा कुरील, माजी नगरसेविका गंगा खारकर, नगरसेविका मधुरा कहाडे, महिला मोर्चाच्या जया माहोरे तसेच News २४ चॅनेलच्या संपादिका प्रीती साहू यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी असंख्य महिला व मातृशक्ती उपस्थित होत्या.

'सशक्त महिला – सशक्त समाज' हे उद्दिष्ट समोर ठेवून संस्था पुढील काळात सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणार असल्याचे संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा शीतल प्रलय वाघमारे आणि सचिव प्रीती शहा यांनी सांगितले. महिलांच्या कौशल्यांना वाव देणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन, आरोग्य शिबिरे, योग शिबिरे, प्रशिक्षण शिबिरे तसेच विशेषतः बचत गटातील महिला आणि घरेलू कामगारांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात महिलांनी पर्यावरण विषयावर आधारित पथनाट्य, नृत्य आणि गीताचे सुंदर सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस्विनी पाटील यांनी केले.

याच निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'Selfie With Own Garden' या ऑनलाइन स्पर्धेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेसाठी जवळपास ७० सेल्फी प्राप्त झाल्या. संस्थेच्या आयोजन समितीत एकूण २१ महिला कार्यरत आहेत.

स्पर्धेतील विजेत्यांना मलबार गोल्ड यांच्या वतीने तीन आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# तरुणावर प्राणघातक हल्ला

**अमरावती/प्रतिनिधीः-** खोलापुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत एका तरुणावर प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. विक्की बसतेलाल इवनाते (वय २०) असे हल्ल्यात जखमी तरुणाचे नाव आहे तर संकेत परदेशी (वय १९), सागर नेवारे (वय २६) व अन्य एक आरोपी आहे. माहितीनुसार शुक्रवारी रात्री ११.३० वाजता सुमारास तिरंगा बाडी मेल गड्डा येथे ही घटना घडली. शुक्रवारी रात्री आरोपींनी विक्की इवनाते याला रस्त्याच्या मधात थांबवून त्याच्याशी वाद घातला आणि त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यांमध्ये तो जखमी झाला. त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. मेडिकल तपासणी नंतर खोलापुरी गेट पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहे.


## पाहिजेत

न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा व्दारा संचालित अनुदानित व विनाअनुदानित शाळेमध्ये रिक्त पद भरणे आहे.

| अ.क्र. | पदाचे विवरण | शैक्षणिक पात्रता | पद संख्या | पुर्ववेळ / अर्धवेळ | वेतन | अनुदानित / विनाअनुदानित | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ महाविद्यालय शाखा एच.एस.सी.व्ही | एम.ए.मराठी. बी.एड (व्दितीय श्रेणी) | १ | घडयाळी तासिका नुसार | शासन नियमाप्रमाणे | अनुदानित | |
| | | एम.ए. इंग्रजी, बी.एड (व्दितीय श्रेणी) | १ | | | | |
| | गांधी प्राथमिकशाळा | एम.कॉम बी.एड (व्दितीय श्रेणी) पायाभुत अभ्यासक्रम | १ | | | | |
| २ | (मराठी माध्यम जुनी वस्ती, बडनेरा, पुर्व प्राथमिक शिक्षक (के.जी १ केजी २) गांधी प्राथमिक शाळा | एस.एस.सी./एच.एस.सी (विज्ञान शाखा) बी.एस.सी./एम.एसी. डी.एड. मॉन्टेसरी | ३ | पूर्णवेळ | एकमुस्त मानधन | विनाअनुदानित | |
| ३ | (इंग्रजी माध्यम जुनी वस्ती, बडनेरा, पुर्व प्राथमिक शिक्षक (के.जी १ केजी २) | एच. एस.सी टी.ई.टी. (विज्ञान शाखा) बी.एस.सी./एम.एसी डी.एड. मॉन्टेसरी | ७ | पूर्णवेळ | एकमुस्त मानधन | | |

**टिपः १)** इच्छुक पात्रता धारक उमेदवारानी शनिवार दि.१३.०६.२०२६ ला प्रत्यक्ष मुलाखतीसाठी संस्थेचे कार्यालय, गांधी विद्यालय, बडनेरा रेल्वे. (रेल्वे स्टेशनजवळ) ता.जि. अमरावती. येथे सकाळी १०.०० वाजता आपले शैक्षणिक, व्यवसायिक व इतर पात्रतेच्या मुळ कागदपत्रासह स्वखर्चाने हजर राहावे.

**डॉ.श्री.बळीरामजी ना.ग्रेसपुजे**
**सभापती शाळा समन्वय समिती, न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा रेल्वे.ता.जि. अमरावता**

**श्री.विनोद व. चिचोळकर**
**सचिव, न्यू एज्युकेशन सोसायटी बडनेरा रेल्वे, ता.जि. अमरावती.**

**डॉ.श्री. हेमंतजी मु.देव**
**अध्यक्ष, न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा रेल्वे, ता.जि. अमरावती.**



## सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.-३९५/२०२६/कलम २२ पुढील तारीख-२५/०६/२०२६**

**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक - लाईफलाईट एज्युकेशन सोसायटी येवदा - ता.दर्यापूर, जि. अमरावती - नोदणी क्रमांक - एफ ४७३/अमरावती**

**अर्जदार - फरजान अहेमद मोहम्मद जहीर ताहेर, रा. उर्दू हायस्कुल जवळ, गढीपुरा,करजगाव, ता.चांदूर बाजार, जि. अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उप-आयुक्त , अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत** - निरंक

**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** मौजे चौधरखेल करजगांव झोन क्र.४ प्रगणे व ग्रा.पं. करजगांव ता.व नो.पो. तुकडी चांदूर बाजार जि.प.अमरावती कक्षेतील वार्ड नं.२ मधील मालमत्ता क्र. २०५ नझुल शिट नं.४ मधील सि.स.नं.३००९ क्षेत्रफळ ११७.० चौ.मी. या घरापैकी बांधकाम २०.० चौ.मी. क्षेत्रफळाचे असून ९७.० चौ.मी. खुली जागा आहे. याची चतुःसिमा -

**पुर्वेस - श्री दादाराव गोपाळराव सुताने यांचे घर,पश्चिमेस - शेख वजीर व शे.कालु यांचे घर**
**उत्तरेस - संस्थेची खूली जागा, दक्षिणेस- श्री राजेंद्र चौधरी यांची जागा व सरकारी जागा**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय उपआयुक्त, अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक २१.०५.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**वाय.एस.शेख**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती



## जाहीर सुचना

सर्व जनतेला या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, मौजा म्हसला, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे क्र.४०/१/अ/२३ मधील २ हे ८५ आर जमिनीतील विद्यमान तहसिलदार साहेब, अमरावती यांनी त्यांच्या फाईलावरील रे.के.नं. एन.ए.पी.-३४/म्हसला-१२/१९८९-१९९०, नि.ता.१८.०७.१९९० नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील कोंडेश्वर नगर या नावाने ओळखल्या जाणा-या जागेतील प्लॉट नं.२३ (तेवीस) याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे असून याचे एकूण क्षेत्रफळ १९३८.०८ चौ.फुट (१८० चौ.मी.) याची चतुःसिमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस - रोड, पश्चिमेस - प्लॉट नं. १८
उत्तरेस - प्लॉट नं. २४ दक्षिणेस- प्लॉट नं. २२

वरील वर्णनाचा प्लॉट माझे पक्षकार श्रीमती प्रमिला पुरुषोत्तम गायकवाड यांचे पती व श्री किरण पुरुषोत्तम गायकवाड, श्री निलेश पुरुषोत्तम गायकवाड, व श्री सुमित पुरुषोत्तम गायकवाड यांचे वडिल मयत पुरुषोत्तम बाळकृष्ण गायकवाड, रा.गडकरी नगर, भूसावळ, ता.जि.भूसावळ यांनी दिनांक ०७.०२.१९९२ रोजी रजिस्टर खरेदीखत क्र.२५४/१९९२ नुसार मे.कोंडेश्वर बडनेरा ट्रेडर्स तर्फे भागीदारी श्री सुरेश प्रभुदास तेली रा. जुनी वस्ती बडनेरा, ता.जि.अमरावती यांच्याकडून विकत घेतली आहे. सदहू दस्तऐवज विद्यमान दुय्यम निबंधक अमरावती ग्रामीण यांच्या कार्यालयात नोदणीकृत झाले आहे व त्याबाबतचा फेरफार श्री पुरुषोत्तम गायकवाड यांच्या नावाने झाला आहे. परंतु त्यांच्या वारसाचे नावाने फेरफार अनावधानाने राहून गेला आहे. याबाबत विद्यमान तलाठीकडे फेरफाराकरिता अर्ज केला असता त्यांनी माझे पक्षकाराला शोध अहवाल सादर करण्याचे सांगितले. वरील प्लॉटवर खरेदीनंतर माझेच पक्षकाराचा ताबा व मालकी हक्क आहे.

करिता वरील नमुद प्लॉटवर कोणाचाही गहाण, बोजा, हितसंबंध, वारसा हक्क, इतर अधिकार, ताबा असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्याचे ८ दिवसांचे आत खालील पत्यावर संपर्क करावा अथवा मुळ हरकती सह खालील पत्यावर संपर्क साधावा. अन्यथा सात दिवसांचे आत कोणीही आपली हरकत नसल्यास असे ग्राहय समजण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतीचा विचार केल्या जाणार नाही व माझे पक्षकार वरील प्लॉटचा फेरफार आपल्या नावाने राजस्व दप्तरी करुन घेतील,याची नोंद घ्यावी. सबब या नोटीसीने कळवित आहे.

**दिनांक :- ०६/०६/२०२६**

**ॲड. एम.व्ही. बंग**
**ऑफिस पत्ता-शॉप नं. १०७-बी गांधी कॉम्प्लेक्स, रायली प्लॉट, अमरावती, ता.जि.अमरावती**
**मो.९४२०८३५२८०**



## जाहीर नोटीस
## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती

**क्रमांक/न.भू-१/अपील अर्ज क्र.२६९४/२०२५ अमरावती, दिनांक २६/०५/२०२६**

**प्रति,**

१) सुभाष रामराव जावरकर
२) जगतराव रामराव जावरकर
३) अंबादास रामराव जावरकर
४) रामदास रामराव जावरकर
५) सुर्यकांता गुलाबराव मेहरे
६) लता रघुनाथ वाट
अ.क्र. १ते ६ रा.सासन रामापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती
७) वैशाली संजयराव चिंचोळकर,
रा.सासन रामापुर, ता.दर्यापुर, जि.अमरावती
८) पदमावती सुभाषराव रायबोले
रा.नांदरुग्ण ता.दर्यापूर, जि.अमरावती

**अपिलार्थी**

**विरुध्द**

१) भिमराव ताराचंद रायबोले
२) पंजाबराव ताराचंद रायबोले
३) धर्मा ताराचंद रायबोले
४) प्रमोद ताराचंद रायबोले
५) जितेंद्र ताराचंद रायबोले
६) रेखाताई गोवर्धन इंगळे
७) सिमा संतोष खंडारे
८) सुजाता पोपटलाल इंगळे
९) लंकाबाई ताराचंद रायबोले
अ.क्र. १ते ९ रा.नांदरुग्ण, ता.दर्यापुर, जि.अमरावती
१०) विमल गणेश मेहरे
११) लक्ष्मण शंकरराव पाखरे
१२) प्रविण बळवंतराव बानुबाकोडे
१३) सुदाम पारनाजी कांबे
अ.क्र.१० ते १३ रा.नांदरुग्ण, ता.दर्यापुर, जि.अमरावती
१४) उपअधिक्षक भूमि अभिलेख, दर्यापूर, जि.अमरावती

**उत्तरार्थी**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे नांदरुग्ण, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील सर्व्हे नं. २६ मधील गट नं.९० ते ९२ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी क्र.१ ते १३ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसलेमुळे उत्तरार्थी यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक ०७/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २६/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख अमरावती**



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### पुष्पक वरघटची सैन्यात निवड



**चांदूर रेल्वे**-स्थानिक मदनगोपाल मुंधडा आर्ट, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचा बी.कॉम. अंतिम वर्षाचा विद्यार्थी पुष्पक अ. वरघट याची भारतीय सैन्यात निवड झाल्याने महाविद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.पुष्पक वरघट हा महाविद्यालयातील क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचा सक्रिय विद्यार्थी असून त्याने महाविद्यालयाचे विविध आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये यशस्वी प्रतिनिधित्व केले आहे.क्रॉस-कंट्री,ॲथलेटिक्स, व्हॉलीबॉल आदी स्पर्धांमध्ये तो दरवर्षी सहभागी होत आला असून आपल्या उत्कृष्ट क्रीडा कामगिरीमुळे त्याने जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये अनेक पुरस्कार व सन्मान प्राप्त केले आहेत. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत कारमोरे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या प्रमुख डॉ. अलका करणवाल, कॉमर्स विभाग प्रमुख एस.जी. गवई यांनी पुष्पकचे अभिनंदन करून त्याच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### आज जागतिक सायकल दिनानिमित्त रॅली

**अमरावती**-भारत सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयांतर्गत 'मेरा युवा भारत अमरावती'च्यावतीने 'नेशन फर्स्ट चॅलेंज : पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करा' या उपक्रमाचा भाग म्हणून आणि 'जागतिक सायकल दिन २०२६' निमित्त रविवार, ७ जून रोजी सकाळी ७ वाजता भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.जिल्हा स्टेडियम-बाबासाहेब आंबेडकर चौक-राजकमल चौक- बाबासाहेब आंबेडकर चौक-गर्ल्स हायस्कूल अमरावती ग्रामीण पोलिस ग्राउंड असा रॅलीचा मार्ग असणार आहे. उत्सुक सायकलप्रेमींनी https:// forms.gle /PPW Sv9taoH9KhKrX6 या गुगल फॉर्मद्वारे किंवा क्यूआर कोडद्वारे आपली नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पेपरफुटीविरोधात एनएसयूआय, युवक काँग्रेसचा एल्गार

- इर्विन ते जयस्तंभ चौकापर्यंत काढला मशाल मोर्चा
- चक्काजाम आंदोलनमुळे वाहतूक कोंडी



**अमरावती/का.प्र.**
वैद्यकीय क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या 'नीट' परीक्षेत झालेली पेपरफुटी व सीबीएसई च्या परीक्षेतील गोंधळाविरोधात 'एनएसयूआय' व युवक काँग्रेसच्यावतीने मशाल मोर्चा काढण्यात आला. यावेळी आक्रमक झालेल्या कार्यकर्त्यांनी अचानक जयस्तंभचौकात चक्काजाम आंदोलन केल्यामुळे वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली. त्यामुळे पोलिसांचीही तारांबळ उडाली होती.

विविध परीक्षांमधील गोंधळ व पेपरफुटींच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या निषेधार्थ देशभरात एनएसयूआयच्यावतीने आंदोलन सुरू आहे. त्याचअनुषंगाने एनएसयूआयचे राष्ट्रीय अध्यक्ष विनोद जाखड, माजी पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. सुनील देशमुख, खा. बळवंत वानखडे या ज्येष्ठ नेत्यांच्या नेतृत्वात इर्विन चौकातून जयस्तंभ चौकातील म. गांधी यांच्या पुतळ्यापर्यंत हा मशाल मोर्चा काढण्यात आला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण केल्यावर 'करो पढाई, लढो लढाई' आदी घोषणा देत देशातील तरूणाईला या देशव्यापी आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करीत कार्यकर्ते पुढे निघाले. त्यानंतर जयस्तंभ चौकातील महात्मा गांधींच्या पुतळ्याला हारार्पण केल्यावर पुन्हा सरकारवर हल्लाबोल करण्यात आला. यावेळी कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करीत अचानक ऐन रस्त्याच्या मधोमध ठिय्या दिला. आधीच मोठी वर्दळ असल्याने वाहनचालकांसह पोलिसांचीही तारांबळ उडाली. त्यामुळे पोलिसांनी कार्यकर्त्यांना रस्त्याच्या बाजूला नेण्याचा प्रयत्न केला असता, कार्यकर्त्यांनी आणखी घोषणाबाजी सुरू केली. या आंदोलनात काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, विरोधी पक्षनेते विलास इंगोले, एनएसयूआयचे प्रदेश अध्यक्ष सागर साळुंके, उपाध्यक्ष संकेत कुलट, जिल्हाध्यक्ष सर्वेश खांडे, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले, निलेश गुहे, रितेश पांडव, संकेत साहू, वैभव देशमुख, सागर कलाने यांच्यासह अमरावती विभागातील अन्य जिल्ह्यांतीलही कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'आयआयएमसी'ची एमए आणि पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू

### ई-समुपदेशनासाठी नोंदणीची आज अंतिम तारीख

**अमरावती/का.प्र.**
देशातील प्रतिष्ठेच्या माध्यम शिक्षण संस्थांपैकी एक असलेल्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन' (आयआयएमसी) मधील एमएच्या सहा आणि पदव्युत्तर पदविकेच्या चार अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशासाठी ई-समुपदेशन प्रक्रिया सुरू झाली आहे. एमए आणि पदव्युत्तर पदविकेच्या सर्व अभ्यासक्रमांमध्ये केवळ ई-समुपदेशन प्रक्रियेद्वारे प्रवेश दिला जाणार आहे. यासाठी https://iimc.admissions.nic.in/ या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. ई-समुपदेशनासाठी नोंदणी करण्याची अंतिम तारीख ७ जून आहे. पहिली प्रवेश यादी ९ जून रोजी जाहीर करण्यात येईल. यंदा आयआयएमसीने ३ नवीन एमए अभ्यासक्रम सुरू केले आहेत. एमए इन हेल्थ कम्युनिकेशन, एमए इन मिडिया ॲण्ड कम्युनिकेशन गव्हर्नन्स आणि एमए इन कॉर्पोरेट कम्युनिकेशन ॲण्ड ब्रॅण्ड मॅनेजमेंट असे तीन अभ्यासक्रम आहेत. आयआयएमसीने आता आपल्या नवी दिल्ली, अमरावती, ढेंकनाल, आइजोल, जम्मू और कोट्टायम अशा सहा शैक्षणिक परिसरांमध्ये नवीन सहा एमए अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले आहेत, असे प्रवेश प्रभारी आणि परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. राकेश कुमार गोस्वामी यांनी सांगितले. आयआयएमसीचे पदव्युत्तर पदविकेचे चार परंपरागत अभ्यासक्रमही यंदा उपलब्ध आहेत. यामध्ये इंग्रजी, हिंदी, रेडिओ व दूरचित्रवाणी पत्रकारिता याबरोबर जाहिरात आणि जनसंपर्क या विषयांतील अभ्यासक्रमांचा समावेश आहे. किमान ५५% गुणांसह पदवीधर झालेले आणि मास कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझ्म (सीओक्यूपी१७) या विषयातील सीयूईटी-पीजीचे वैध गुण असलेले भारतीय नागरिक एमए अभ्यासक्रमांसाठी पात्र आहेत. तसेच, याच विषयात सीयूईटी-पीजीचे वैध गुण असलेले पदवीधर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांसाठी पात्र आहेत. पदव्युत्तर पदविका प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १ ऑगस्ट २०२६ रोजी २५ वर्षे, इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी २८ वर्षे आणि अनुसूचीत जाती/अनुसूचीत जमाती/दिव्यांग उमेदवारांसाठी ३० वर्षे आहे. प्रवेश यादीत नाव आलेल्या उमेदवारांनी त्यांना जागा मिळालेल्या अभ्यासक्रमातील प्रवेश निश्चित करण्यासाठी,जागा स्वीकृती शुल्क म्हणून २०,००० रूपये भरणे गरजेचे आहे. त्यानंतर उर्वरित शिक्षण शुल्क प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी निर्धारित कालावधीत जमा करणे आवश्यक आहे.

### शेतकऱ्यांची उत्पादकता वाढविण्यासाठी

## अत्याधुनिक बियाणे,पीक संरक्षण व पोषण उत्पादने सादर



**अमरावती/का.प्र.**
भारतीय शेतकऱ्यांपर्यंत जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान पोहोचविण्याचे उद्दीष्ट असणाऱ्या डीसीएम श्रीराम लिमिटेडचा एक विभाग असलेल्या श्रीराम फार्म सोल्युशन्सने आपली अत्याधुनिक पीक संरक्षण, विशेष वनस्पती पोषण (स्पेशालिटी प्लांट न्यूट्रिशन) तसेच संशोधनाधारित बियाणे उत्पादने बाजारात सादर केली. या उत्पादनांच्या लोकार्पणाचा कार्यक्रम महाराष्ट्रातील नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी प्रदेशातील प्रमुख चॅनेल भागीदार मोठ्या संख्येने उपस्थित राहून या नाविन्यपूर्ण कृषी उपाययोजनांच्या शुभारंभाचे साक्षीदार झाले.

आपला पीक संरक्षण उत्पादन पोर्टफोलिओ अधिक बळकट करण्यासाठी कंपनीने श्रीराम सेनकुशा, श्रीराम एडेलॉन आणि श्रीराम झारविन ही तीन नवीन उत्पादने सादर केली. ही प्रभावी उत्पादने जागतिक नवोन्मेषकांच्या पेटंटप्राप्त तंत्रज्ञानाच्या आधारे काळजीपूर्वक विकसित करण्यात आली असून, आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या पिकांमध्ये आढळणाऱ्या कीड, किडी व रोगांपासून प्रभावी संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आली आहेत. स्पेशालिटी प्लांट न्यूट्रिशन विभागात, श्रीराम फार्म सोल्युशन्सने श्रीराम फर्मप्लस आणि श्रीराम सिम्बिओ ही दोन नवीन उत्पादने सादर केली आहेत. संशोधनाधारित बियाणे विभागात, कंपनीने तूर पिकाच्या दोन संशोधनाधारित वाणांचे– श्रीराम सुपर २३एसआर३१ आणि श्रीराम सुपर २१एसआर३१–लोकार्पण केले.यावेळी श्रीराम फार्म सोल्युशन्सचे कार्यकारी संचालक व व्यवसाय प्रमुख संजय छाब्रा म्हणाले, 'श्रीराम फार्म सोल्युशन्समध्ये नवोन्मेष आमचे ध्येय नाही, आम्ही सेवा देत असलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला दिलेले आमचे वचन आहे. या नव्या उत्पादनांचे लोकार्पण आधुनिक शेतीच्या क्षमतांना नव्याने परिभाषित करण्याच्या आमच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.'

## वृक्ष लागवडच नाही; संगोपनाचाही संकल्प करा: प्र.कुलगुरू

**अमरावती/का.प्र.**
जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून विद्यापीठ परिसरात परीक्षा विभागाकडे जाणा-या नवीन रस्त्याच्या दुतर्फा प्रतिकात्मक म्हणून तीस निंबाच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्यार्थ्यांना संदेश देतांना केवळ वृक्षलागवडच नाही, तर वृक्ष संगोपनाचा देखील संकल्प करा, असे आवाहन केले.

विद्यापीठ परिसरात आजघडीला जवळपास पाच लक्ष वृक्ष आहेत. तर विद्यापीठाच्या उद्यान विभागाच्यावतीने पावसाळ्यात एक हजार वृक्षांची लागवड करण्यात येणार असून विद्यापीठ परिसरात हजारो सीड्स बॉल विद्यार्थ्यांच्या माध्यमातून टाकण्यात येणार आहे.

### प्र-कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरे यांचे हस्ते वृक्षारोपण



वृक्षारोपण कार्यक्रमाला कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, वित्त व लेखा अधिकारी सीए. पुष्कर देशपांडे, नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, रासेयो संचालक डॉ. निलेश कडू, कार्यकारी अभियंता श्री शशीकांत रोडे, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील, उपकुलसचिव सौ. मोनाली तोटे पाटील,

जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, सहा. कुलसचिव डॉ. विरेंद्र निमजे, श्री अनिल मेश्राम, प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रशांत गावंडे, भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. यादवकुमार मावळे, बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, गाडगे बाबा अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप काळे, डॉ.जी.जी. मुळे, उद्यान अधीक्षक श्री भिमराव वाठोरे तसेच विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## २२.२१ लाखांच्या मालमत्ता कर थकबाकीपोटी मालमत्ता सील

### अमरावती महानगरपालिकेची धडक कारवाई; थकबाकीदारांवर कठोर भूमिका



**अमरावती/का.प्र.**
महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या निर्देशानुसार शहरातील मालमत्ता कर थकबाकीदारांवर सुरू असलेल्या विशेष वसुली मोहिमेला अधिक गती देण्यात आली असून, त्याचाच एक भाग म्हणून आज मध्य झोन क्र. २ अंतर्गत राजापेठ परिसरात मोठी वसुली कारवाई करण्यात आली. मालमत्ता कराची तब्बल २२ लाख २१ हजार १२६ रुपये इतकी थकबाकी असलेल्या मालमत्तेला महानगरपालिकेच्या पथकाने सील केले. महानगरपालिका प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मध्य झोन क्र. २ अंतर्गत वार्ड क्रमांक -५ मधील मालमत्ता क्रमांक १३९०/१३९०/१ या मालमत्तेवर दीर्घकाळापासून मालमत्ता कराची मोठी थकबाकी प्रलंबित होती. संबंधित मालमत्ताधारकांना वेळोवेळी कर भरण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. तसेच थकबाकी भरण्याबाबत वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, अनेक संधी देऊनही कराचा भरणा करण्यात आला नाही. त्यामुळे अखेर महानगरपालिका प्रशासनाने कठोर भूमिका घेत संबंधित मालमत्तेवर सीलची कारवाई केली. कारवाई मध्य झोनचे सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वसुली पथकाने सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून संबंधित मालमत्तेला सील लावले. या कारवाईदरम्यान सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी नर्मदा चव्हाण, निरीक्षक फैयाज खान तसेच वसुली लिपिक सुरज चावरे, स्वप्नील रामसे, धरम बिवाड आणि विशाल ढिक्याव यांनी सक्रिय सहभाग घेतला.

## मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया

**अमरावती/का.प्र.**
क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुलींचे शासकीय वसतिगृह युनिट क्रमांक -४ (जेल रोड, अमरावती) आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले गुणवंत मुलींचे शासकीय वसतिगृह (नवीन) जेल रोड, अमरावती या दोन्ही वसतिगृह योजनांचा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये लाभ घेण्यासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



या वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळण्यासाठी इयत्ता ११ वी, १२ वी तसेच सर्व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पात्र विद्यार्थिनींनी १५ ते ३१ जुलै या कालावधीतhttps://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. संदर्भीय शासन निर्णयानुसार, ही ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविली जात असून, पात्र व इच्छुक विद्यार्थिनींनी दिलेल्या मुदतीत आपले अर्ज सादर करावेत, आवाहन करण्यात आले आहे.

# आठ वर्षांपूर्वीच्या गोंधळ प्रकरणात निर्दोष मुक्तता

## पण,आजही दुय्यम निबंधक कार्यालयात 'गोंधळाचे राज्य'!

**अचलपूर/वार्ताहर**
अचलपूर येथील सह दुय्यम निबंधक कार्यालयात २०१५ साली घडलेल्या कथित गोंधळ प्रकरणाचा तब्बल आठ वर्षांनंतर निकाल लागला असून न्यायालयाने गोविंद चरपटे यांची निर्दोष मुक्तता केली आहे. मात्र विशेष बाब म्हणजे ज्या कार्यालयातील कथित गोंधळाच्या प्रकरणावर न्यायालयीन पडदा पडला, त्याच कार्यालयात आजही हाणामाऱ्या, अरेरावी आणि दलालशाहीचे प्रकार सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

सन २०१५ मध्ये सह दुय्यम निबंधक कार्यालयात सुरू असलेल्या गहाणखत नोंदणी प्रक्रियेदरम्यान शासकीय कामकाजात हस्तक्षेप करून गोंधळ घातल्याचा आरोप गोविंद चरपटे यांच्यावर ठेवण्यात आला होता. या प्रकरणी तक्रार दाखल झाल्यानंतर पोलीस तपास, न्यायालयीन सुनावणी आणि साक्षीपुरावे यांची प्रक्रिया जवळपास आठ वर्षे सुरू राहिली. अखेर उपलब्ध पुरावे शंकातीतपणे आरोप सिद्ध करण्यास अपुरे असल्याचे नमूद करत न्यायालयाने ७ ऑगस्ट २०२३ रोजी चरपटे यांची निर्दोष मुक्तता केली.

सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता बी.आर. चव्हाण यांनी बाजू मांडली, तर आरोपीच्या वतीने ॲड. रविंद्र खोजरे यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचा सखोल विचार करून न्यायालयाने आरोपीला दिलासा दिला. मात्र या निकालानंतर अचलपूर -परतवाडा शहरात एक वेगळीच चर्चा रंगू लागली आहे.




आठ वर्षांपूर्वीच्या कथित गोंधळ प्रकरणाचा शेवट न्यायालयाने केला असला, तरी आजही सह दुय्यम निबंधक कार्यालयातील वातावरण सुधारले आहे का, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कार्यालयात वाद, धक्काबुक्की आणि एकमेकांच्या अंगावर धावून जाणे हा नित्याचाच प्रकार बनला आहे. असे जनतेचे म्हणणे आहे

नागरिकांचा आरोप आहे की, कार्यालयातील काही मोजक्या दस्तलेखक व त्यांच्या हस्तकांची मक्तेदारी निर्माण झाली असून क्रमांक लावणे, कागदपत्रे स्वीकारणे आणि व्यवहारांमध्ये प्राधान्य मिळविणे यावरून वारंवार वाद निर्माण होत आहेत. कार्यालयात दलालशाहीचे जाळे वाढत असून सर्वसामान्य नागरिकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.यापूर्वीही मालमत्ता व्यवहारांतील कथित अनियमितता, भूखंड विभाजन नियमांचे उल्लंघन आणि गैरकारभाराबाबत अनेक तक्रारी झाल्या आहेत. मात्र त्यावर प्रभावी कारवाई झाल्याचे दिसून आले नाही. परिणामी कार्यालयातील शिस्तीचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. आठ वर्षांपूर्वीच्या प्रकरणात न्यायालयाने आरोपीला निर्दोष ठरवले, परंतु आजही कार्यालयातील अराजकतेवर लगाम का लागत नाही? कार्यालयात मोठमोठ्याने बोलणारे अरेरावी करणारे मारामाऱ्या घडविणारे आणि शासकीय कामकाजात अडथळे निर्माण करणाऱ्यांवर कारवाई कधी होणार? असे प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक जिल्हा प्रशासनाला विचारत आहेत.सह दुय्यम निबंधक कार्यालयातील वाढत्या गोंधळाची स्वतंत्र चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा शासकीय कार्यालयाचे रूपांतर काही मोजक्या दलालांच्या अड्ड्यात झाल्याची भावना अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.याबाबत सह दुय्यम निबंधक यांची प्रतिक्रिया घेण्यासाठी यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा दौरा



**अमरावती**-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा रविवार दि. ७ जून रोजी जिल्ह्याच्या दौरा आहे. दौऱ्यानुसार सरनाईक रविवार, दि. ७ जून रोजी सायंकाळी ७ वाजता रूबी हॉल, द ग्रॅण्ड मेहफील हॉटेल, अमरावती येथे आगमन. व सोईनुसार अमरावती येथून अकोलाकडे प्रयाण करतील.


फ्लॅट विकणे आहे
2 BHK Flat
त्वरित विकणे आहे
Contact: 8275420070

# डीएनए अहवालानुसार तो मृतदेह काजलचाच

## -तपोवन हत्याकांडाचा तपास निर्णायक टप्प्यात, -पोलिसांसमोर आरोपी शोधण्याचे मोठे आव्हान

**अमरावती/प्रतिनिधीः-** तपोवन टेकडी परिसरातील जंगलात आढळलेल्या अर्धवट जळालेल्या तरुणीच्या मृतदेहाचे गूढ अखेर डीएनए अहवालामुळे उलगडले आहे. हा मृतदेह चांदूर बाजार तालुक्यातील विश्रोळी येथील काजल जितेंद्र इंगळे (वय २१) हिचाच असल्याचे अधिकृतरीत्या स्पष्ट झाले आहे. मात्र ओळख निश्चित झाल्यानंतरही तिच्या हत्येमागील रहस्य कायम असून, आरोपी अद्याप पोलिसांच्या आवाक्याबाहेर आहेत.





### ■ शहरभर चर्चांना उधाण-

काजल इंगळे हत्याकांडामुळे शहरात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. तरुणीची ओळख निश्चित झाल्यानंतर आता तपासाचा केंद्रबिंदू तिच्या संपर्कातील व्यक्ती, शेवटचे लोकेशन आणि मोबाईल कॉल डिटेल्स यावर असल्याची चर्चा आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी विविध पथके कामाला लागली असून लवकरच महत्त्वाचे धागेदोरे हाती लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### ■ संशयितांची चौकशी, सीसीटीव्ही तपासणी

या प्रकरणात पोलिसांनी अनेक संशयितांची कसून चौकशी केली आहे. शहरातील तसेच तपोवन परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले आहेत. मात्र अद्यापपर्यंत हत्येचा थेट धागा पोलिसांच्या हाती लागलेला नाही. त्यामुळे काजलची हत्या नेमकी कोणी केली, तिचा मृतदेह जंगलात कसा आणला गेला आणि पुरावे नष्ट करण्यासाठी तो जाळण्याचा प्रयत्न कोणी केला, असे अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

२ जून रोजी तपोवन परिसरातील निर्जन जंगलात अर्धवट जळालेल्या अवस्थेत एका तरुणीचा मृतदेह आढळल्याने शहरात एकच खळबळ उडाली होती. मृतदेहाची अवस्था इतकी विद्रूप होती की सुरुवातीला ओळख पटविणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरले. सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या छायाचित्रांनंतर काजलच्या नातेवाईकांनी मृतदेहाची ओळख पटविली होती. मात्र तपासात कोणतीही शंका राहू नये म्हणून पोलिसांनी ☞(पान २ वर)

# स्थानिक प्राधिकारी निवडणूक बिनविरोध..!

## अपेक्षित राजकीय रस्सीखेच अखेर कागदावरच

## -४४६ नगरसेवकांचा हिरमोड



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाची विधान परिषद निवडणूक अखेर बिनविरोध झाल्याने जिल्ह्यातील राजकीय वातावरणाला अचानक पूर्णविराम मिळाला आहे. गेल्या सहा वर्षांपासून या निवडणुकीची प्रतीक्षा करणाऱ्या ४४६ नगरसेवकांसह स्थानिक राजकीय कार्यकर्त्यांचा अपेक्षाभंग झाल्याची भावना व्यक्त होत आहे. चुरशीची लढत, मतांचे अंकगणित, राजकीय रणनीती आणि शेवटच्या क्षणापर्यंत सुरू असलेली मोर्चेबांधणी यावर अचानक पडदा पडल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.

या निवडणुकीसाठी जिल्ह्यात एकूण ४४६ मतदार पात्र होते. त्यामध्ये २२४ पुरुष आणि २२२ महिला लोकप्रतिनिधींचा समावेश होता. सुरुवातीला विविध पक्षांचे उमेदवार रिंगणात उतरल्याने ही निवडणूक अत्यंत रंगतदार आणि प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे चित्र होते. मतदारांच्या भेटीगाठी, राजकीय हालचाली आणि संभाव्य समीकरणांमुळे वातावरण तापले होते. मात्र, अर्ज माघारीच्या टप्प्यावर झालेल्या राजकीय घडामोडींमुळे निवडणूक बिनविरोध झाली आणि सर्वच अंदाज धुळीस मिळाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या केवळ एका जागेपुरत्या मर्यादित नसतात. त्या स्थानिक पातळीवरील राजकीय ताकद, पक्षनिष्ठा आणि नेतृत्वाची स्वीकारार्हता तपासण्याचे व्यासपीठ मानल्या जातात. त्यामुळे अनेक नगरसेवक आणि स्थानिक नेत्यांना या निवडणुकीतून आपली राजकीय भूमिका अधिक ठळकपणे मांडण्याची संधी मिळणार होती. मात्र, बिनविरोध निवडीमुळे ती संधी हुकल्याची भावना अनेक स्तरांतून व्यक्त होत आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, बिनविरोध निवडणूक ही एकीकडे राजकीय स्थैर्याचे आणि पक्षांतील समन्वयाचे प्रतीक मानली जाऊ शकते; परंतु दुसरीकडे लोकशाही प्रक्रियेत अपेक्षित असलेली स्पर्धा आणि मतदारांना भूमिका मांडण्याची संधीही त्यामुळे मर्यादित होते. त्यामुळे या निर्णयाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे.

यवतमाळच्या राजकारणात आता निवडणुकीच्या चुरशीऐवजी विकास, स्थानिक प्रश्न आणि लोकप्रतिनिधींच्या कामगिरीवर चर्चा होईल का, हा खरा प्रश्न आहे. बिनविरोध निवडणुकीमुळे राजकीय संघर्ष टळला असला तरी स्थानिक पातळीवरील अपेक्षा आणि असंतोष ☞(पान २ वर)

# शिवटेकडीवरील म्युरल्सची तोडफोड

## पोलिसांनी तपासले परिसरातील सीसीटीव्ही



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील शिवटेकडी परिसरात शिव सृष्टीवर लावण्यात आलेल्या म्युरल्समध्ये तोडफोड झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. आज शनिवार ६ जून रोजी सकाळी टेकडीवर जॉगिंगसाठी गेलेले खासदार डॉक्टर अनिल बोंडे यांच्या लक्षात हे येताच त्यांनी तात्काळ ☞(पान २ वर)

# एटीएम फोडून लाखोंच्या चोरीचा डाव उधळला..!

## घाटंजी पोलिसांनी आरोपीला रंगेहात पकडले

### -पोलिसांना १५ हजारांचे रोख बक्षीस

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** घाटंजी येथील महाराष्ट्र बँकेचे एटीएम फोडून चोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला घाटंजी पोलिसांनी अवघ्या काही मिनिटांत रंगेहात पकडून मोठा गुन्हा उघडकीस आणला. पोलिसांच्या सतर्कतेमुळे लाखो रुपयांची संभाव्य चोरी टळली असून या धाडसी कारवाईबद्दल जिल्हा पोलीस अधीक्षकांनी संबंधित कर्मचाऱ्यांचा सत्कार करून १५ हजार रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दि. ६ जून २०२६ रोजी घाटंजी पोलीस ठाण्यातील सहाय्यक फौजदार राहुल खंडागळे, पोलीस कर्मचारी दत्ता कुसराम व सचिन नैताम हे अन्य एका गंभीर गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेत असताना CRO यवतमाळ यांच्याकडून महाराष्ट्र बँकेचे ATM फोडले जात असल्याची तातडीची माहिती मिळाली. माहिती मिळताच पथक घटनास्थळी दाखल झाले. तेथे ATM चे नुकसान झाल्याचे दिसून आल्यानंतर पोलिसांनी तात्काळ पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांना माहिती दिली. त्यांच्या सूचनेनुसार परिसरातील इतर ATM ची तपासणी सुरू करण्यात आली. महाराष्ट्र बँकेच्या ATM पासून सुमारे ५० मीटर अंतरावरील ☞(पान २ वर)

# शंभर रुपयांच्या वादातून मामेभावाने केला चाकू हल्ला

## औरंगपुरा परिसरातील घटना, युवक गंभीर



**अमरावती/प्रतिनिधीः-** अवघ्या शंभर रुपयांच्या उधारीच्या वादातून एका युवकावर त्याच्याच मामेभावाने चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना शहरातील औरंगपुरा परिसरात घडली. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर इर्विन रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनू उर्फ शरद राम चव्हाण (वय ३५, रा. जोडमोड, औरंगपुरा) हे मजुरीचे काम करतात. ४ जून रोजी रात्री साडेआठच्या सुमारास ते अंबादेवी परिसरातून साफसफाईचे काम करून घरी परतले. त्यानंतर घराबाहेर मोहल्ल्यात आले असता त्यांचा मामेभाऊ शंकर शरद चांदणे (वय २२, रा. जोडमोड, ☞(पान २ वर)

# तीन कोटींच्या प्लॉटवर डल्ला

## बनावट कागदपत्रांच्या आधारे मालकी हक्काचा दावा




**अमरावती/प्रतिनिधीः-** बोरगाव धर्माळे येथील कोट्यवधी रुपयांच्या प्लॉट व्यवहारात बनावट दस्तऐवज आणि खोट्या स्वाक्षऱ्यांचा वापर करून फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बोरगाव धर्माळे येथील एका ले-आऊटमधील प्लॉट क्रमांक ७ व ८ हे सुमारे तीन कोटी रुपये किमतीचे भूखंड वादाच्या केंद्रस्थानी आहेत. संबंधित शेतजमीन मूळतः डॉ. शंशांक गुर्जर यांच्या मालकीची होती. नंतर ही मालमत्ता त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर करण्यात आली होती. त्यानंतर त्या जमिनीचे भूखंड पाडून विक्रीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. तक्रारीनुसार, राखीव ठेवण्यात आलेल्या दोन प्लॉटसंदर्भात आरोपीने कथितपणे बनावट कागदपत्रे तयार केली. तसेच खोट्या स्वाक्षऱ्यांच्या आधारे मालकी हक्क दर्शविणारे दस्तऐवज तयार करून संबंधितांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी विनोद मोहन गुहे (रा. गोकुळपेठ ☞(पान २ वर)

# गुटका विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई

**शिरजगाव कसबा/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रात गुटखाबंदी लागू असतानाही अवैधपणे सुरू असलेल्या गुटका विक्रीच्या साखळीवर शिरजगाव कसबा पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. करजगाव येथील तेलीपुरा परिसरात टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी प्रतिबंधित गुटका व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त करत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

अमरावती ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्हाभर अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम सुरू केली असून, त्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी करजगावातील तेलीपुरा भागात धाड टाकली असता विनोद ऊर्फ विनायक अशोक काळे (वय ३२) व सुधीर बाजीराव काळे (वय ५५) यांच्या ताब्यात शासनाने प्रतिबंधित केलेल्या विविध कंपन्यांच्या गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांचा साठा आढळून



आला. तपासणीदरम्यान पोलिसांनी प्रतिबंधित मालासह एक अँड्रॉईड ☞(पान २ वर)

# वाढदिवसाच्या नावाखाली शस्त्रांचे प्रदर्शन महागात

## दर्यापूरात १७ जणांवर पोलिसांची कारवाई

**दर्यापूर/प्रतिनिधीः-** दर्यापूर पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत वाढदिवसाच्या मिरवणुकीत तलवारी आणि चाकूंचे प्रदर्शन करणाऱ्या तरुणांसह सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करून गोंधळ घालणाऱ्या १७ जणांवर कारवाई करण्यात आली. या धडक मोहिमेमुळे शहरातील कायदा मोडणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



५ जून रोजी बनोसा टाऊन परिसरातील अवधूत नगर येथून काही तरुण शस्त्रांसह वाढदिवस साजरा करण्यासाठी निघाल्याची माहिती पोलिसांना मिळाली. चारचाकी व दुचाकी वाहनांवरून नारेबाजी करत गजानन महाराज मंदिराच्या दिशेने जात असलेल्या या गटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ कारवाई करून अभय मोहन कैथवास, मोहित नंदकिशोर राऊत, श्रीकांत रविंद्र दाळू, अपूर्व संजयराव लहाने, रितेश संजयराव पखान आणि संचित सतीश मानकर या सहा जणांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून एक तलवार, तीन धारदार चाकू, दोन काठ्या, तीन दुचाकी, दोन चारचाकी वाहने आणि सहा मोबाईल फोन असा सुमारे १३.८१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अवैध शस्त्र बाळगणे, बेकायदेशीर जमाव जमविणे आणि मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. घटनेतील इतर साथीदारांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

दरम्यान, शहरातील विविध भागांमध्ये उघड्यावर मद्यपान करून गोंधळ घालणाऱ्या १७ जणांविरोधातही ☞(पान २ वर)

# गांजासह दोघे ताब्यात, १ लाखांचा माल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थांच्या अवैध व्यापाराविरोधात पुन्हा एकदा धडक कारवाई करत परतवाडा शहरात गांजा घेऊन फिरणाऱ्या दोन युवकांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत सव्वा किलोहून अधिक गांजा, दुचाकी आणि मोबाईल असा एक लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या तस्करीवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार विशेष मोहीम सुरू आहे. त्याच मोहिमेअंतर्गत ५



जून रोजी परतवाडा पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, अचलपूरकडून दोन जण मोटारसायकलवरून गांजा घेऊन परतवाड्याकडे येत आहेत. माहितीची खातरजमा होताच पोलिसांनी कल्याण मंडपम कार्यालयासमोरील शासकीय दूध डेअरी परिसरात नाकाबंदी केली. काही वेळात संशयित मोटारसायकल घटनास्थळी पोहोचताच पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली. चौकशीदरम्यान वाहनावरील दोघांची ओळख केदार घनश्याम चरपटे (वय ३०) व दीपक रामदास आमले ☞(पान २ वर)

# जनगणणेच्या कार्यासाठी निघालेल्या शिक्षकाचा मृत्यू

## संघटनेने केली कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यासाठी कर्तव्यावर निघालेल्या शिक्षक प्रदीप गणोरकर यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाल्याची घटना वरूड तालुक्यातील करजगाव येथे आज घडली. या घटनेमुळे संपूर्ण करजगावात शोककळा पसरली आहे.प्रदीप गणोरकर हे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक होते. ते करजगाव येथील जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेत कार्यरत होते. तेथेच ते जणगणना प्रगणक म्हणून नियुक्त करण्यात आले होते. सद्यस्थितीत वरूड तालुक्यातील तापमान ४५ अंश सेल्सिअस असल्याने या प्रखर तापमानात जनगणना करणे धोकादायक होते. गणोरकर यांनी आदल्या ☞(पान २ वर)

# विवाहितेचा पाठलाग, युवकाविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** सोशल मीडियावरील ओळखीचे रूपांतर छळवणुकीत झाल्याचा धक्कादायक प्रकार राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत समोर आला आहे. फेसबुकवर झालेली ओळख संपविण्याचा निर्णय घेतलेल्या विवाहित महिलेला एका युवकाने वारंवार त्रास देत तिचा पाठलाग केला, धमक्या दिल्या आणि ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील ३५ वर्षीय विवाहित महिलेची २०२५ मध्ये फेसबुकच्या माध्यमातून शुभम नावाच्या युवकाशी ओळख झाली होती. काही काळानंतर ही बाब महिलेच्या पतीच्या निदर्शनास आल्यानंतर संबंधिताशी सर्व संबंध तोडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार महिलेने आरोपीचा मोबाईल क्रमांक ब्लॉक करून संपर्क पूर्णपणे बंद केला. मात्र, हा निर्णय आरोपीला मान्य नसल्याने त्याने महिलेला ☞(पान २ वर)



# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, ७ जुन २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com


**बंडखोरीची सुरुवात प.बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीवरून झाली. याबाबतच्या प्रस्तावावर संदीपन साहा आणि ऋतब्रत बॅनर्जी यांच्या सह्या बनावट आहेत, अशी त्यांनी ममतांकडे तक्रार केल्यानंतर त्या प्रकरणाची चौकशी करण्याऐवजी तक्रार करणाऱ्या दोघांना पक्षातून निलंबित करण्यात आले. या संदर्भात पक्षातल्या आमदारांनी अभिषेक बॅनर्जी यांच्यावर गंभीर आरोप केले असले तरी त्याकडे ममतांनी दुर्लक्ष केले. विरोधी पक्षनेत्याच्या निवडीवरून उठलेले हे वादंग अभिषेक यांच्या विरोधातल्या नाराजीची शेवटची काडी ठरली आणि एकाच वेळी ५८ आमदारांनी बंड केले.**

# पराभवाकडून पडझडीकडे

बंडखोरीची सुरुवात प.बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीवरून झाली. याबाबतच्या प्रस्तावावर संदीपन साहा आणि ऋतब्रत बॅनर्जी यांच्या सह्या बनावट आहेत, अशी त्यांनी ममतांकडे तक्रार केल्यानंतर त्या प्रकरणाची चौकशी करण्याऐवजी तक्रार करणाऱ्या दोघांना पक्षातून निलंबित करण्यात आले. या संदर्भात पक्षातल्या आमदारांनी अभिषेक बॅनर्जी यांच्यावर गंभीर आरोप केले असले तरी त्याकडे ममतांनी दुर्लक्ष केले. विरोधी पक्षनेत्याच्या निवडीवरून उठलेले हे वादंग अभिषेक यांच्या विरोधातल्या नाराजीची शेवटची काडी ठरली आणि एकाच वेळी ५८ आमदारांनी बंड केले.

गेली १५ वर्षे पश्चिम बंगालमध्ये सत्तेची अनिर्बंध ऊब उपभोगणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांना विधानसभा निवडणुकीत झालेल्या तृणमूलच्या भीषण पराभवानंतर लगेचच पक्षाची पडझडही बघावी लागते आहे. फूट पडून वेगळ्या झालेल्या आमदारांच्या गटाने अद्याप ममता यांच्या नेतृत्वाला आव्हान दिले नसले तरी पक्षाला पडलेले हे भगदाड ममतांना मान्य आहे का, हे काही दिवसांतच समोर येईल. ममता यांचे नेतृत्व फुटीरांना मान्य असले तरी पक्षाचे सरचिटणीस असणारे अभिषेक बॅनर्जी यांची कार्यपद्धती आणि नेतृत्व या गटाला मान्य नाही. किंबहुना तेच या फुटीचे, झालेल्या बेबनावाचे मूळ आहे. मात्र त्यामुळे ममता यांच्यासमोर एक पेच निर्माण झाला आहे. २८ वर्षांपूर्वी हिंमतीने उभा केलेला आणि सातत्याने संघर्ष करत वाढवलेला 'तृणमूल पक्ष' जवळचा वाटतो की भाच्यावरचे पुत्रवत



प्रेम...यातून त्यांना निर्णय करायचा आहे.

५८ आमदारांनी केलेल्या बंडखोरीमुळे उभा झालेला पेच फक्त तृणमूल पक्षापुरता मर्यादित नाही तर ममतांच्या राजकीय कारकिर्दीला लागलेली ती अखेरची घरघर ठरेल. या अवस्थेला त्यांच्या पक्षातलेच आमदार, कार्यकर्ते कारणीभूत आहेत. ज्यांच्यावर गेल्या महिन्यापर्यंत ममतांचा विश्वास होता, ज्यांच्या भरवशावर पुन्हा एकदा आपण पश्चिम बंगालची सूत्रे हातात घेऊ याची त्यांना खात्री होती, त्याच आमदारांनी आज बंडखोरी केली आहे.

या बंडखोरीची सुरुवात प.बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपदाच्या निवडीवरून झाली. याबाबतच्या प्रस्तावावर संदीपन साहा आणि ऋतब्रत बॅनर्जी यांच्या सह्या बनावट आहेत, अशी त्यांनी ममतांकडे तक्रार केल्यानंतर त्या प्रकरणाची चौकशी करण्याऐवजी तक्रार करणाऱ्या दोघांना पक्षातून निलंबित करण्यात आले. या संदर्भात पक्षातल्या आमदारांनी अभिषेक बॅनर्जी यांच्यावर गंभीर आरोप केले असले तरी त्याकडे ममतांनी दुर्लक्ष केले. विरोधी पक्षनेत्याच्या निवडीवरून उठलेले हे वादंग अभिषेक यांच्या विरोधातल्या नाराजीची शेवटची काडी ठरली आणि एकाच वेळी ५८ आमदारांनी बंड केले.

बंडखोर गटाने ऋतब्रत बॅनर्जी यांची विधीमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड केली असली तरी या फुटीनंतर तृणमूल काँग्रेसच्या भविष्याविषयी दोन ते तीन शक्यता वर्तवल्या जात आहेत. अनेकांना हे फुटीर आमदार भाजपामध्ये सामील होतील असे वाटत असले तरी, 'तृणमूलच्या आमदारांना, कार्यकर्त्यांना भाजपामध्ये घेणार नाही', हे प. बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांनी विधानसभा निकालादरम्यानच स्पष्ट सांगितले होते. तेव्हा हा पर्याय बाद ठरतो. तृणमूलचे विधानसभेत दोन गट होऊन त्यातला 'अधिकृत' पक्ष कोणाचा याचा निर्णय निवडणूक आयोग घेईल. मात्र त्यासाठी आमदारांबरोबरच लोकसभेतल्या दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा मिळवणे गरजेचे आहे.

आता हा दुसरा पर्याय प्रत्यक्षात येतो की, फुटलेला गट नवीन पक्षाची स्थापना करतो हे लवकरच कळेल. तृणमूलमधून फुटून बाहेर पडलेले आमदार धुतल्या तांदळाचे नाहीत याची जनतेला जाणीव आहे. गेली १५ वर्षे या राज्यात जो भ्रष्टाचार माजला होता, जे हिंसाचाराने थैमान घातले होते त्यात या आमदारांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभाग होताच. म्हणूनच, पक्षासंदर्भात दुसरा पर्याय अस्तित्वात येवो वा तिसरा...नव्या पक्षाला आता हिंदूहिताचा तसेच राष्ट्रहिताचा विचार करूनच काम करावे लागेल. नाहीतर भानावर आलेली जनता त्याला कायमसाठी बाहेरचा रस्ता दाखवेल.

'कम्युनिस्टांचा बालेकिल्ला' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पश्चिम बंगालमध्ये दीर्घकालीन कम्युनिस्ट राजवटीला आव्हान देत एखाद्या महिलेने राजकीय पक्ष स्वत:च्या हिंमतीवर उभा करणे, तो वाढवणे, इतकेच नव्हे तर ऐतिहासिक विजय प्राप्त करत सलग १५ वर्षे राज्याची सूत्रे स्वत:च्या हाती ठेवणे हे ममता यांचे दखलपात्र कर्तृत्व आहे, यात दुमत नाही. पण एकदा सत्तासूत्रे हाती आल्यानंतर जनहिताचे, राज्यहिताचे आणि देशहिताचे निर्णय घेण्याऐवजी केवळ मुस्लिमांचे लांगूलचालन, राजकीय लाभासाठी सुविधांची खैरात आणि घुसखोरांना मुक्तद्वार यातून ममतांची देशहितविरोधी ओळख तयार झाली. १५ वर्षांच्या कार्यकाळात ती अधिकाधिक दृढ होत गेली. 'मां, माटी, मानुष' ही घोषणा तर केवळ वल्गना ठरली. त्यामुळे राजकीय इतिहासात ममता लक्षात राहतील त्या त्यांच्या या काळ्या कालखंडामुळे. ज्या प्रदेशातून भारतीय स्वातंत्र्याचा पहिला हुंकार उमटला त्या प्रदेशाला सर्वार्थाने कंगाल करण्याचे काम ममतांनी केले. एका प्रकारे त्यांनीच आपल्या कार्यकाळात राजकीय कारकिर्दीच्या अखेरीची, पक्षाच्या विनाशाची बीजे रोवली.

ज्यांनी पश्चिम बंगालची पार दुर्दशा केली अशांना भाजपात सामावून घेणार नाही, ही जी भाजपाची भूमिका आहे ती या राज्यातील आजवर पीडित राहिलेल्या जनतेला दिलासा देणारी आहे. राज्यातली अराजकता संपावी म्हणून या जनतेने भाजपाच्या पारड्यात मोठ्या विश्वासाने मते टाकली आहेत. आणि ममतासारख्या हिंदूद्वेष्ट्या, हिंस्त्र नेत्यासमोर भाजपाचे स्थान बळकट करण्यासाठी पश्चिम बंगालमधल्या भाजपा कार्यकर्त्यांनी आपल्या जिवावर उदार होऊन निवडणुकीत काम केले आहे.

या जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या विश्वासाला भाजपा तडा जाऊ देणार नाही.

घुसखोरांची वाढती संख्या ही आज देशासमोरची सर्वात मोठी समस्या आहे. त्यावर लक्ष केंद्रीत करून गृहमंत्र्यांनी राष्ट्रीय स्तरावर मोठी मोहीम हाती घेतली आहे. 'मां, माटी, मानुष' घोषणा देणाऱ्या तृणमूल पक्षाने प्रत्यक्षात मुस्लीम तुष्टीकरण करून देशाच्या एकात्मतेला धोका निर्माण केला. देशासमोरच्या घुसखोरीच्या समस्येला काँग्रेसइतकीच तृणमूलही जबाबदार आहे. घुसखोरांविरूद्ध देशव्यापी मोहीम सुरू होत असतानाच तृणमूलचे पतन सुरू व्हावे ही चांगली घटना आहे. या पडझडीतून हा भ्रष्ट विचारांवर उभारलेला पक्ष पूर्णपणे नेस्तनाबूत व्हायला हवा. त्यातच या राज्याचे आणि देशाचे भले आहे.


## बंगाली खेला

पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षात फूट पडली. विधिमंडळातील संख्याबळाच्या अनुषंगाने विचार करायचा झाला तर ८० टक्के पक्ष ममतांची साथ सोडून गेला.दोनच दिवसांपूर्वी ममतांनी ज्या आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांची पक्षातून हकालपट्टी केली होती त्यांनाच बंडखोर ५८ आमदारांनी आपला नेता निवडले. आता तृणमूलचे लोकसभेतील आणि राज्यसभेतील किती खासदार ऋतब्रत यांच्यासोबत आहेत हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल.

पक्षसंघटनेतील किती पदाधिकारी आणि सगळ्यांत महत्त्वाचे कार्यकर्ते आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे मतदार आणि सर्वोच्च महत्त्वाचे अल्पसंख्याक मतदार कोणासोबत आहेत हेही लवकरच समोर येईल. तूर्त ममतांच्या पायाखालून जमीनच काढून घेतली असून त्यांना तुम्ही मार्गदर्शकाच्या भूमिकेत जा, मुख्य सल्लागार म्हणून काम करा आणि तुमच्या भाच्याला या सगळ्यापासून लांबच ठेवा असा स्पष्ट संदेश ऋतब्रत यांच्या नेतृत्वाखालील आमदारांच्या गटाने दिला आहे. यशाचे बाप अनेक असतात आणि अपयश मात्र पोरके असते असे म्हणतात.

भारताच्या राजकारणात याला छेद दिला गेला आहे. आपल्याकडे राजकीय संस्कृतीच अशी विकसित केली गेली आहे की यशाचा बाप तोच असतो जो पक्षात सर्वशक्तिमान असतो. त्याच्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर त्याच्या कुटुंबातील सदस्य म्हणजे त्याचा राजकीय उत्तराधिकारी हा बाप असतो. प्रमुख नेत्यानंतर पहिल्या दहा नंबरवर त्याच्या कुटंबातले सदस्यच असतात. त्यानंतर त्याचा सगळ्यांत विश्वासू सहकारी, निष्ठावान वगैरे अशी बिरूदे ज्याला किंवा ज्यांना लावली जातात त्यांचा क्रमांक येतो. हे सगळे यश मिळत असेपर्यंतच असते.

अपयश आले आणि बुरूज ढासळत असल्याचे दिसू लागले किंवा आता सत्ता मिळण्याची शक्यता नजीकच्या भविष्यात कमीच दिसते आहे असे दिसू लागले की दहाच्या पुढच्या नंबरवर असलेले निष्ठावान मग एकेक करून मागे सरकू लागतात आणि सर्वोच्च नेत्याच्या कुटुंबातील कोणा एकाला लक्ष्य करत आपले स्वतंत्र दुकान थाटण्याचा प्रयत्न करतात आणि कोणतीतरी 'महाशक्ती' अशाच स्वाभिमानी नेत्याच्या शोधात असल्यामुळे त्याचा वापर करून मूळ पक्ष संघटना पंगू केली जाते. त्या अर्थाने अपयश हे पोरकेच असते किंबहुना अपयश हे तुमचा प्रवास संपवणारेच असते हेच खरे.



# काचेच्या बंद भिंतीआड कुणीच कुणाशी ....

एडवर्ड हॉपर या अमेरिकन चित्रकाराने १९४२ मध्ये रंगवलेले एका महानगरातले डायनर. मध्यरात्र उलटून गेली आहे. बाहेरचा रस्ता निर्मनुष्य. रुंद काचेच्या भिंतीमागे चार लोक, तीन ग्राहक एक वेटर. कुणी कुणाशी बोलत नाहीये. एकमेकांकडे बघतही नाहीयेत. पिवळ्या दिव्याच्या कृत्रिम, ऊब नसलेल्या प्रकाशात प्रत्येकाचे एकाकीपण स्वतंत्र अधोरेखित होत आहे. हे कोणतेही एक विशिष्ट डायनर नाही. ते कोणत्याही मोठ्या शहरातले असू शकते.

डायनरला दार नाही. आपण बाहेरून आत पाहतो आहोत. आतल्या लोकांचा एकाकीपणा आपल्याला दिसत आहे, त्यांना तो कदाचित जाणवतही नाही. आपण आत त्यांच्या जागी असतो तर आपल्यालाही तो जाणवला नसता कदाचित अशी जाणीव आपल्याला अस्वस्थ करते. शहरी निशाचर आपण असतोच कधी ना कधी. काचेच्या कधी अल्याड, कधी पल्याड. महानगरातील एकाकीपण सर्वव्यापी आहे. शहरी समूहातल्या प्रत्येकाच्या आपापल्या एकटेपणाचे हे प्रातिनिधिक चित्रण. हॉपरला हेच दाखवायचे आहे.

काचेची भिंत हे माणसांमधल्या अभेद्य एकटेपणाचे प्रतीक. हॉपरने चित्र रंगवले ते दिवस जागतिक महायुद्धाचे. माणसांच्या मनातली परस्परांबद्दलची असुरक्षितता, भीतीची सावली कदाचित नाइटहॉक वर दबा धरून आहे. काचेच्या आतली शांतता स्फोटानंतरची किंवा आधीची असू शकते. आतल्या कृत्रिम पिवळ्या उजेडाची अनैसर्गिकता अशावेळी जास्त खटकते. बाहेरचा गडद अंधार भकास वाटायला लागतो. हेमिन्वेच्या एका लघुकथेवरून प्रेरणा घेऊन हॉपरने हे चित्र काढले, असेही म्हटले जाते.

एडवर्ड हॉपर हा विसाव्या शतकातला महानगरीय चित्रकार. १८८२-१९६७ या काळात त्याने अशी अनेक शहरे, गर्दीत हरवलेली एकटी माणसे, स्त्रिया रंगवल्या आहेत. हॉटेलच्या रूममधल्या खिडकीतून रहदारीचा रस्ता न्याहाळणाऱ्या, रेस्टॉरंटमध्ये टेबलावर एकटीने कॉफी पिणाऱ्या, ऑफिसात रात्री उशिरा काम करणाऱ्या एकेकट्या स्त्रिया. महानगरीय माणसांच्या समूहातले एकाकीपण चित्रित करणारी हॉपरची वास्तववादी चित्रे अमेरिकन आर्टचा चेहरा मानली जातात.

हॉपरला खरंतर माणसे नाही, माणसांमधले अंतर रंगवायचे आहे. माणसे ज्या जागेत उभी अथवा बसलेली असतात, त्या जागांशी त्यांचे जोडलेले नसणे, कोरड्या अलिप्ततेचे थंड नाते तो रंगवतो. शारीरिक जवळीक असते, पण मानसिक अंतर अमर्याद. त्याची चित्रशैलीही तटस्थ, आशयाशी सुसंगत कट-ऑफ फ्रेम, प्रकाश-छायेमधला कठोर विरोधाभास डोळ्यात भरतो. त्याच्या चित्रात माणूस लहान, सावल्या लांब आणि आजूबाजूचा रिकामा अवकाश प्रचंड मोठा, अंगावर येणारा. खिडक्या, दारे, काचा हे सगळे सीमा अधोरेखित करणारे. रंगछटाही म्यूटेड, चेहरे अस्पष्ट. त्यातून भावनिक अलिप्तता जाणवते.

शिकागो आर्ट इन्स्टिटयूटमध्ये हे चित्र - नाईटहॉक लावलेले आहे. ८३ वर्षं झाली तरी ते अजिबात जुने वाटत नाही. संपूर्ण जग कोलाहलाने गजबजलेले एक मोठे शहर बनलेले असताना माणसांमधले अंतर जास्त ओसाड, एकटेपणा जास्त तीव्र झाला आहे. चित्रातली समकालिनता कालातीत आहे. आजूबाजूचे जग बदलले, डायनर बदलले. पण काचेची भिंत तशीच आहे. आता मोबाईलच्या स्क्रीनच्या काचेने तिची जागा घेतली आहे. एकाकीपणा बाहेरून पाहणाऱ्यालाच अस्वस्थ करतो फक्त, आतल्या माणसांकरिता तो सुखावहही असू शकतो ही जाणीव आता नव्याने अस्वस्थ करते.

# एका दिवसात चांदी १६,५०० रुपयांनी कोसळली

सोन्या-चांदीच्या बाजारात शुक्रवारी मोठी उलथापालथ पाहायला मिळाली. काही तासांतच चांदीच्या किमती तब्बल १६,५०० रुपयांनी घसरल्या, तर सोन्यालाही जवळपास ४ हजार रुपयांचा फटका बसला. गेल्या काही महिन्यांतील ही सर्वात मोठी घसरण मानली जात आहे. या घसरणीमागे भारतातील कोणताही घटक नसून अमेरिकेतून आलेल्या काही महत्त्वाच्या आर्थिक घडामोडी कारणीभूत ठरल्या आहेत.




शुक्रवारी रात्री कमोडिटी बाजार बंद होताना मल्टी कमोडिटी एक्सचेंज (एमसीएक्स) वर सोन्याचा भाव ३,९४७ रुपयांनी घसरून १,५५,६०० रुपये प्रति १० ग्रॅमवर आला. तर चांदीचा दर तब्बल १६,५९५ रुपयांनी कोसळून २,४८,२०१ रुपये प्रति किलोवर बंद झाला. या घसरणीचा परिणाम देशातील सराफा बाजारावरही दिसून आला. दिल्ली, मुंबई, चेन्नईसह अनेक शहरांमध्ये सोन्या-चांदीचे दर कमी झाले.

या मोठ्या घसरणीमागे अमेरिकेतील रोजगारासंबंधीचा ताजा डेटा आहे. अमेरिकेतील रोजगारवाढ अपेक्षेपेक्षा चांगली झाल्याचे आकडे समोर आले. त्यामुळे अमेरिकन अर्थव्यवस्था मजबूत असल्याचा संदेश बाजाराला मिळाला. त्याचा परिणाम अमेरिकन डॉलर आणि सरकारी रोख्यांच्या उत्पन्नावर म्हणजेच बॉण्ड यिल्डवर झाला. दोन्हीमध्ये वाढ झाल्याने गुंतवणूकदारांनी सोन्या-चांदीसारख्या सुरक्षित गुंतवणुकीतून पैसा काढण्यास सुरुवात केली.

आंतरराष्ट्रीय बाजारात सोन्याचा भाव ३.२ टक्क्यांनी घसरून ४,३३० डॉलर प्रति औंसवर आला. तर चांदीमध्ये आणखी मोठी घसरण झाली आणि तिचा भाव ७.१ टक्क्यांनी घसरून ६८.६३ डॉलर प्रति औंसपर्यंत खाली आला. याचाच परिणाम भारतीय बाजारावरही झाला.

याशिवाय अमेरिकेची मध्यवर्ती बँक म्हणजेच फेडरल रिझर्व्ह यंदा पुन्हा व्याजदर वाढवू शकते, अशी शक्यता वाढली आहे. अमेरिका-इराण तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत. तेल महागल्यास महागाई वाढण्याचा धोका निर्माण होतो. महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी फेड व्याजदर वाढवू शकते. व्याजदर वाढल्यास सोन्यासारख्या मालमत्तेवरील आकर्षण कमी होते आणि त्याचे भाव घसरतात.

तज्ज्ञांच्या मते, १६ आणि १७ जून रोजी होणाऱ्या फेडरल रिझर्व्हच्या बैठकीकडे आता संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. या बैठकीत व्याजदरांबाबत काय निर्णय घेतला जातो यावर पुढील काही आठवड्यांतील सोन्या-चांदीच्या किमतींची दिशा ठरणार आहे.

दरम्यान, देशातील प्रमुख शहरांमध्येही सोन्याचे दर कमी झाले आहेत. दिल्लीमध्ये २२ कॅरेट सोन्याचा भाव १,४३,८६० रुपये प्रति १० ग्रॅम आहे. चेन्नईमध्ये तो १,४५,५२५ रुपये असून मुंबईमध्ये १,४२,७५२ रुपये आहे. त्यामुळे सध्या सोने खरेदी करणाऱ्यांसाठी काहीसा दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

# कॉक्रोच छू मंतर...

चालता चालता एक झुरळ पायाशी आले, वाट पण बदलायला तयार नाही. तेही नाही मग मी पण नाही. आंदोलनात सहभागी होणारे झुरळ असणार याची स्पष्ट जाणीव झाली. मी विचारले, ''काय बाबा, कसं काय? जंतर मंतर मैदानावर जाण्याची मॉक तयारी म्हणून माझी विरोधी पार्टी म्हणून निवड केलीस की काय बाबा? पायाखाली येशील, हकनाक जाशील. त्यापेक्षा आपला रस्ता बदल. ते बरे होईल. कसे?''

झुरळ दोन मिशा उडवत बोलला (बहुतेक)! ''डियर, मी इतक्या लांबून आलो. तुझ्या पाया पडण्यासाठी नाही. मंदिरात जाऊन आलो. आमच्या भगिनी परळीच्या मंदिरात खास गोपिका म्हणून पूजनीय आहेत. त्यांच्याशी सल्लामसलत करून थेट इकडे आलो. आपल्या मुदपाकखान्यात देवासाठी मोदक बनवलेत त्याच्या वासावर आलो.''

''वाह! मंदिरात मोदक भेटले असते की. इकडे येण्याचे कष्ट का घ्यावे आपण?''

त्यावर झुरळ निरुत्तर झाला आणि पुढच्या लांबलचक मिशा उडवत परागंदा झाला. त्याला



काही सुचले नसावे. मी चार पावले पुढे चाललो आणि तो पुन्हा दिसला. पण आता सोबत आणखीन चार झुरळं घेऊन आला. याला काय म्हणावे त्यांच्या भाषेत? बहुतेक थांब बघतोच तुला म्हणून गेला आणि येताना सोबती घेऊन आला असावा. सोबतच्या चार झुरळांना पण आत्ता मिसरूड फुटलेली. त्यामुळे तीही मिशा ताठ करून समोर ताठ उभी.

''नका रे बाबा उगा पायाशी येऊ. चुकून पाय पडला तरी तुम्ही आंदोलनं करता. काय म्हणावे तुम्हास?'

एक झुरळ गटातून अलगद बाजूला गेले आणि वर्तमानपत्रांच्या रद्दीत घुसले. मी म्हटले जा बाबा. शिकण्यासाठी, शिक्षणासाठी लढणारा, आंदोलन करणारा तू झुरळांचा कार्यकर्ताच असणार. बघू रद्दीमधे तुला कोणता विषय मिळतो? थोड्या वेळाने ते रद्दीतून बाहेर आले. मी सहज रद्दी चाळून पाहिली तर याचे आणखीन दोन-चार सोबती रद्दीच्या ढिगात सापडले. कागदांचे तुकडे करून अक्षरांचे सांगाडे राहिले. आता मला कळेना, ही सेना शैक्षणिक क्षेत्रात आंदोलनकर्ते म्हणून का उतरले असावेत. जर यांना कागदात, कागदपत्रात, महत्त्वाच्या दस्तऐवजात घुसखोरी करून विल्हेवाट लावायची आहे तर आंदोलन कशाविरुद्ध करणार? मुद्दाच गैर आहे. अक्षरांशी वैर असणारे आंदोलनात उतरून करणार काय आहेत तेच कळेना. असो. हा सामाजिक कीटक धार्मिक क्षेत्रात पण असल्याने यास शिरावर घेणे गरजेचे आहे म्हणून त्याने मला छू...! म्हटले. पण हिंदीमध्ये 'छू' म्हटल्यावर वेगळा अर्थ निघतो. मी त्याच्या साम्राज्याला चिमटीत पकडून रद्दीसकट बाहेर केले...

# वारंवार मेसेज, जवळीक साधण्याचा प्रयत्न



मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री प्रिया बापट सध्या एका मुलाखतीमुळे चर्चेत आली आहे. करिअरच्या सुरुवातीच्या काळात आलेल्या एका अप्रिय अनुभवाबाबत तिने प्रथमच खुलासा केला आहे. एका चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान सहकलाकाराच्या वागण्यामुळे आपण अस्वस्थ झाल्याचे तिने सांगितले.

एका मुलाखतीत बोलताना प्रिया बापट म्हणाली की, तिला चित्रपटातील किसिंग सीनबाबत कधीच आक्षेप नव्हता. तो सीन करायचा नव्हता असा काही भाग नव्हता, तर चित्रपटाच्या कथेत तो कसा योग्य वाटेल, हा माझा प्रश्न होता. कारण तो तिथे फिट बसत नव्हता. संबंधित चित्रपटाच्या स्क्रिप्ट वाचनादरम्यान तिने दिग्दर्शकाला त्या सीनची गरज काय आहे, असा प्रश्नही विचारला होता. अखेरीस दिग्दर्शकाच्या सांगण्यावरून तिने तो सीन करण्यास होकार दिला. मात्र, प्रत्यक्ष शूटिंग दरम्यान परिस्थिती वेगळीच झाली. प्रियाच्या म्हणण्यानुसार, गाण्याच्या चित्रीकरणावेळी संबंधित अभिनेत्याने सीनमध्ये बदल सुचवण्याच्या नावाखाली वारंवार वैयक्तिक मर्यादा ओलांडल्या. त्या काळात आपण इंडस्ट्रीत नवीन असल्यामुळे अशा प्रसंगी नेमकी कशी प्रतिक्रिया द्यावी, हे समजत नव्हते, असेही तिने सांगितले.

शूटिंग संपल्यानंतरही त्या अभिनेत्याकडून सतत मेसेज येत असल्याचा दावा प्रियाने या मुलाखतीत केला. एकत्र वेळ घालवण्याचे आणि भेटण्या साठीचे अनेक मेसेज त्या अभिनेत्याकडून येत होते. मात्र, अनेकदा नकार देऊनही तो काही कारणं काढून बोलण्याचा प्रयत्न करत होता. सततच्या मेसेज मुळे मला काही मनस्ताह सहन करावा लागला. त्यानंतर या संपूर्ण घटनेबाबत त्यांनी उमेशला सांगितले. तेव्हा उमेश तिच्यासोबत हॉटेलमध्ये राहिला, जेणेकरून त्या अभिनेत्याला समजावं की ती एकटी नाही आणि त्याला त्याच्या मर्यादांची जाणीव होईल.प्रिया बापट ही मराठी मनोरंजन विश्वातील एक आघाडीची अभिनेत्री आहे. तिने अनेक गाजलेल्या चित्रपट आणि मालिकांमधून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. 'मुन्नाभाई एमबीबीएस', 'लगे रहो मुन्नाभाई', 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय', 'काकस्पर्श', 'टाइमपास २' आणि 'वजनदार' यांसारख्या चित्रपटांतील तिच्या भूमिका विशेष गाजल्या आहेत. या मुलाखतीनंतर मनोरंजन विश्वात पुन्हा एकदा कामाच्या ठिकाणी व्यावसायिक मर्यादा आणि कलाकारांच्या सुरक्षिततेचा मुद्दा चर्चेत आला आहे.



# 'हसू नकोस हसताना तू चांगली दिसत नाहीस...'

अभिनेत्री नेहा धुपिया आज बॉलिवूडमधील लोकप्रिय चेहऱ्यांपैकी एक मानली जाते. सौंदर्य, अभिनय आणि स्पष्टवक्तेपणामुळे तिने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मात्र, यशाच्या या प्रवासात तिला अनेक कटू अनुभवांचाही सामना करावा लागला. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत नेहाने करिअरच्या सुरुवातीच्या काळातील असा एक प्रसंग सांगितला, ज्याचा तिच्या आत्मविश्वासावर दीर्घकाळ परिणाम झाला होता. २००२ मध्ये मिस इंडिया किताब पटकावल्यानंतर नेहाने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. 'चुप चुप के', 'सिंग इज किंग', 'तुम्हारी सुलू', 'करीब करीब सिंगल' आणि 'अ थर्सडे' यांसारख्या चित्रपटांमधून तिने प्रेक्षकांची मने जिंकली.

पती अंगद बेदीसोबत 'डबल डेट' या चॅट शोमध्ये सहभागी झालेल्या नेहाने एका कास्टिंग डायरेक्टरसोबतचा अनुभव सांगितला. ती म्हणाली, 'मी इंडस्ट्रीत नवीन होते आणि एका टीव्ही शोसाठी ऑडिशन द्यायला गेले होते. त्यावेळी मी एका कास्टिंग डायरेक्टरच्या गाडीत बसले होते. मी सहज त्याच्याकडे पाहून हसले, पण त्याने लगेच मला थांबवत सांगितले, 'हसू नकोस, तू हसताना चांगली दिसत नाहीस. त्यामुळे शक्यतो हसू नकोस.'' नेहाच्या मते, त्या एका वाक्याने तिच्या मनावर खोल जखम केली. ती म्हणाली, 'त्या घटनेनंतर माझा आत्मविश्वास खूपच कमी झाला. मी मिस इंडिया जिंकले होते, तरीही माझ्या त्या काळातील अनेक छायाचित्रांमध्ये मी हसताना दिसत नाही. त्या नकारात्मक विचारातून बाहेर पडण्यासाठी मला तब्बल आठ ते दहा वर्षे लागली.'

नेहाने सांगितले की, करिअरच्या सुरुवातीला मिळालेल्या अशा प्रतिक्रिया अनेकदा कलाकारांच्या मानसिक तेवर परिणाम करतात. मात्र, कालांतराने तिने स्वतःवर विश्वास ठेवायला शिकले.

# न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये मराठीचा जयघोष




न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हलमध्ये मराठीचा आवाज घुमला असून 'तिघी' या चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट पटकथेचा बहुमान निखिल महाजन आणि प्राजक्त देशमुख यांना मिळाला आहे. तर 'बुंग' या मणिपुरी चित्रपटाने तीन पुरस्कारांवर आपले नाव कोरले आहे, ज्यामध्ये या चित्रपटातील मुख्य बालकलाकाराला मिळालेल्या सर्वोत्कृष्ट बालकलाकाराच्या पुरस्काराचाही समावेश आहे.

न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिव्हल २०२६ ची सांगता रविवारी एका शानदार पुरस्कार सोहळ्याने झाली, ज्यामध्ये दहा वेगवेगळ्या विभागांमधील हिंदुस्थानी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कलाकृतींचा गौरव करण्यात आला.

२८ ते ३१ मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या चित्रपट महोत्सवात १५ भाषांमधील वैविध्यपूर्ण चित्रपट दाखवण्यात आले, 'ज्यामुळे समकालीन हिंदुस्थानी चित्रपटसृष्टीतील प्रादेशिक कथांच्या वाढत्या प्रभावावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले'; तसेच इंडिपेंडंट हिंदुस्थानी चित्रपटांना समर्पित असलेल्या उत्तर अमेरिकेतील या सर्वात जुन्या चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने अनेक चित्रपट निर्माते आणि कलाकार एकत्र आले होते. 'इंडो-अमेरिकन आर्ट्स कौन्सिल' द्वारे सादर करण्यात आलेल्या या चित्रपट महोत्सवाच्या यंदाच्या कार्यक्रमात १९ फीचर फिल्म्स, ४ डॉक्युमेंट्री फीचर्स आणि २७ शॉर्ट फिल्म्स यांचा समावेश होता, ज्यामध्ये अनेक चित्रपटांचे वर्ल्ड प्रीमियर आणि एका विशेष एलजीबीटीक्यू शॉर्ट फिल्म्स कार्यक्रमाचाही समावेश होता.

या महोत्सवातील सर्वोच्च बहुमान मानला जाणारा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'बक्शो बंदी' या चित्रपटाला मिळाला, तर 'बुंग' या मणिपुरी चित्रपटाने 'फिल्म क्रिटिक्स सर्कल ऑफ इंडिया'ने निवडलेला बेस्ट डेब्यू फिल्म, लक्ष्मीप्रिया देवी यांच्यासाठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि गुगुन किपगेन याच्यासाठी सर्वोत्कृष्ट बालकलाकार असे तीन पुरस्कार जिंकले.

'विमुक्त' चित्रपटातील उत्कृष्ट अभिनयासाठी निखिल यादव याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला, तर 'व्हिक्टोरिया' चित्रपटासाठी मीनाक्षी जयन हिने सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार पटकावला. सर्वोत्कृष्ट पटकथेचा बहुमान 'तिघी' चित्रपटासाठी निखिल महाजन आणि प्राजक्त देशमुख यांना मिळाला. नॉन-फिक्शन श्रेणीमध्ये, 'डेझा वू'ने सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री फीचर आणि 'वाई'ने सर्वोत्कृष्ट डॉक्युमेंट्री शॉर्टचा पुरस्कार जिंकला, तर 'जोज् टर्न'ने सर्वोत्कृष्ट नॅरेटिव्ह शॉर्टचा पुरस्कार मिळवला.

# 'काळा हिरण' सिनेमावर सलमान खानचा आक्षेप



बॉलिवूड अभिनेता सलमान खान पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. यावेळी त्याच्या आगामी चित्रपटामुळे नव्हे, तर एका नव्या सिनेमाविरोधात घेतलेल्या कायदेशीर भूमिकेमुळे त्याचे नाव चर्चेत आहे. 'काळा हिरण: द बॅटल फॉर लेगेसी' या आगामी चित्रपटाच्या निर्मात्यांना सलमान खानने कायदेशीर नोटीस पाठवल्याची माहिती समोर आली आहे. या चित्रपटाची कथा आणि काही संदर्भ हे सलमान खानशी संबंधित काळवीट शिकार प्रकरणाशी जोडले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे या चित्रपटामुळे त्याच्या प्रतिमेला धक्का पोहोचू शकतो, तसेच सुरू असलेल्या कायदेशीर प्रक्रियेवरही परिणाम होण्याची शक्यता असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

सलमान खानच्या वतीने पाठवण्यात आलेल्या नोटीसमध्ये चित्रपटाचे काम आणि त्याचा प्रचार तातडीने थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच अभिनेता किंवा त्याच्याशी संबंधित कोणत्याही घटना, नाव किंवा प्रतिमेचा वापर करण्यासाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# मुकेश अंबानी यांनाही 'धुरंधर'ची भुरळ



दिग्दर्शक आदित्य धर यांच्या 'धुरंधर' आणि 'धुरंधर: द रिव्हेंज' या दोन चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवत संपूर्ण चित्रपटसृष्टीचे लक्ष वेधून घेतले आहे. अभिनेता रणवीर सिंह मुख्य भूमिकेत असलेल्या या फ्रँचायजीने केवळ भारतातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही प्रेक्षकांचे मोठे आकर्षण मिळवले आहे.

या दोन्ही चित्रपटांना प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, समीक्षकांनीही त्याच्या कथा, दिग्दर्शन, ॲक्शन सीक्वेन्स आणि सादरीकरणाचे कौतुक केले आहे. विशेष म्हणजे, या यशाच्या पार्श्वभूमीवर उद्योगजगत आणि मनोरंजन क्षेत्रातूनही 'धुरंधर' फ्रँचायजी बाबत सकारात्मक प्रतिक्रिया उमटत आहेत.

रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी जिओ स्टुडिओजच्या यशाचा उल्लेख करताना या फ्रँचायजीचे विशेष कौतुक केल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जिओ स्टुडिओजने मागील काही वर्षांत सातत्याने मोठ्या यशस्वी चित्रपटांची निर्मिती केली असून 'धुरंधर' मालिकेने या यशाला नवी दिशा दिली आहे.

ते म्हणाले, जियो स्टुडिओजने सलग तीन वर्षांपर्यंत सर्वाधिक कमाई करणारे चित्रपट देऊन अनोखा विक्रम रचला आहे. २०२४ मध्ये स्त्री २, २०२५ मध्ये धुरंधर आणि २०२६ मध्ये धुरंधर : रिव्हेंज. यावरून आमचं सातत्य आणि नेतृत्त्व सिद्ध होतं. भारतात तर सोडाच पण जगभरात यापूर्वी कधीही धुरंधरसारख्या फ्रँचाइजीची संकल्पना, त्यासाठीचा निधी आणि इतक्या कमी कालावधीत दोन भागांचं शूटिंग केलं गेलं नाही.धुरंधरच्या पहिल्या भागाने आतापर्यंतचा सर्वाधिक कमाई करणारा भारतीय चित्रपट होण्याचा विक्रम प्रस्थापिक केला. या चित्रपटाने थिएटर्समध्ये सलग १५ आठवडे चालून एक अभूतपूर्व विक्रम रचला. त्यानंतर प्रचंड अपेक्षेनं दुसरा भाग दाखल झाला आणि त्याने पहिल्या भागाचेही सर्व विक्रम मोडीत काढले', अशा शब्दांत अंबानी यांनी कौतुक केलं.

पहिल्या भागाने प्रदर्शित झाल्यानंतर दीर्घ काळ थिएटरमध्ये टिकून राहण्याचा विक्रम केला, तर दुसऱ्या भागाने पहिल्या भागाच्या तुलनेत अधिक कमाई करत फ्रँचायजीला पुढील स्तरावर नेले. या यशामुळे निर्मात्यांनी घेतलेला मोठा आर्थिक आणि सर्जनशील धोका यशस्वी ठरल्याचे मानले जात आहे.या चित्रपटांमध्ये रणवीर सिंहने हमजा अली मजारी या गुप्तहेराची भूमिका साकारली असून, ही भूमिका त्याच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाच्या आणि यशस्वी भूमिकांपैकी एक ठरत आहे. त्याच्या अभिनयाला प्रेक्षकांकडून मोठी दाद मिळत असून, त्याची लोकप्रियता आणि ब्रँड व्हॅल्यूमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.रणवीर सिंहसोबत या चित्रपटांमध्ये आर. माधवन, अर्जुन रामपाल, अक्षय खन्ना, संजय दत्त, राकेश बेदी आणि सारा अर्जुन यांसारख्या अनेक दिग्गज कलाकारांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. सर्व कलाकारांच्या अभिनयामुळे चित्रपटाची कथा अधिक प्रभावी झाली आहे.

# 'नाना पाटेकरांनी सीनमध्ये खोटी नव्हे खरी कानशिलात लगावली'

बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांचा इंडस्ट्रीत एक वेगळाच दरारा आहे. अनेक कलाकार त्यांच्यासोबत काम करताना घाबरतात. आता एका त्यांच्या जुन्या सहकलाकार अभिनेत्रीनं शूटिंग दरम्यानचा एक किस्सा सांगितला आहे.



'रोजा' फेम अभिनेत्री मधू शाह हिनं तब्बल २९ वर्षांनंतर एक नाना पाटेकर यांच्याबद्दल खुलासा केला आहे. १९९७ मध्ये आलेल्या 'यशवंत' चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान नाना पाटेकर यांनी तिला खरोखरंच कानशिलात लगावली होती, आणि प्रत्युत्तरात तिनंही त्यांना थप्पड मारली होती, असा दावा मधूनं केला आहे. या घटनेचा खुलासा करताना मधूनं त्यावेळचा संपूर्ण थरार अन् नेमकं काय घडलं होतं, ते सांगितलं आहे.

मधूनं नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत हा किस्सा सांगितला. 'यशवंत' चित्रपटातील एका हाय-व्होल्टेज ड्रामा सीनचं शूटिंग सुरू होतं. सीनमध्ये नाना पाटेकर यांनी मधूच्या पात्राला मारायचं होतं. मात्र, कॅमेरा सुरू असताना नानांनी केवळ अभिनयाचा आव न आणता मधूला खरोखरच आणि प्रचंड जोरात कानशिलात लगावली होती, असं मधू यांनी म्हटलं.

# 'है जवानी तो इश्क होना है' चित्रपट वादाच्या भोवऱ्यात



बॉलिवूड अभिनेता वरुण धवन याचा आगामी चित्रपट 'है जवानी तो इश्क होना है' ५ जून रोजी प्रदर्शित होणार आहे. मात्र चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वीच निर्माते डेव्हिड धवन आणि निर्मिती संस्थेसमोर मोठे कायदेशीर संकट उभे राहिले आहे. निर्माता वाशु भगनानी यांच्या पूजा एंटरटेनमेंट या निर्मिती संस्थेने मुंबई उच्च न्यायालयात तब्बल ४०० कोटी रुपयांचा दावा दाखल केला आहे. या खटल्यात टिप्स इंडस्ट्रीजचे रमेश तौरानी, कुमार तौरानी आणि डेव्हिड धवन यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

दाखल केलेल्या याचिकेत चित्रपटाचे प्रदर्शन, वितरण, स्ट्रीमिंग आणि प्रचारात्मक सामग्रीवर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, चित्रपटाचे नाव 'इश्क सोना है' या गाण्यावरून घेतले असल्याचे म्हटले जात असल्याने, चित्रपटाच्या शीर्षकात बदल करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

पूजा एंटरटेनमेंटचे म्हणणे आहे की, 'बीवी नं. १' मधील गाण्यांचे व्हिडिओ हक्क अजूनही त्यांच्याकडेच आहेत आणि टिप्स इंडस्ट्रीजकडे फक्त ऑडिओ हक्क होते. कंपनीचा आरोप आहे की, वैध परवानगीशिवाय ही गाणी व्यावसायिकरित्या वापरण्यात आली आहेत. पूजा एंटरटेनमेंटचे प्रतिनिधित्व करणारे वकील व्ही. के. दुबे यांनी एएनआयला सांगितले, 'आम्ही टिप्स म्युझिक कंपनीविरोधात ४०० कोटी रुपयांचा दावा दाखल केला आहे. हा कायदेशीर वाद अनेक दिवसांपासून सुरू आहे आणि संगीताच्या हक्कांचा प्रश्न अद्याप सुटलेला नाही.

# 'रीडिंगला बोलावले तेव्हा तिथे कुणीच नव्हते'



मराठी अभिनेत्री मयुरी कापडणेनं आजवर काही मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे. पण, अभिनेत्रीला तिच्या पहिल्याच सिनेमाच्या वेळेस अत्यंत वाईट अनुभव आलेला. मयुरीनं 'डोम' या सिनेमातून अभिनयक्षेत्रात पदार्पण केलं. पण, या सिनेमाच्या दिग्दर्शकाने अभिनेत्रीचा मानसिक छळ केलेला. त्याबद्दल मयुरीनं नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे.

'डोम' या सिनेमाबद्दल बोलताना मयुरी म्हणाली की, 'त्या सिनेमासाठी माझं एकाच दिवसात कास्टिंग झालं आणि माझी निवड केली गेली. त्यावेळी मी नवखी होते, मला अभिनयातलं काही माहित नव्हतं. मी कधीच कोणतं वर्कशॉप केलेलं नव्हतं, एकांकिका केल्या नव्हत्या. युट्युबवर व्हिडिओ बघून स्वतःच शिकत होते. त्यामुळे हे सगळं नवीन होतं. त्या सेटवर आल्यावर दडपण होतं. सिनेमाच्या दिग्दर्शकांना समजलेलं माझा हा पहिलाच सिनेमा आहे आणि त्यांनी मला बराच त्रास दिला. मी घाबरलेही होते.'

दिग्दर्शकाने दिलेल्या त्रासाबद्दल बोलताना मयुरी म्हणाली की, 'पहिले चार-पाच दिवस व्यवस्थित शुटिंग झालं. माझे बाबा असायचे सोबत. मग ते दिग्दर्शक बोलायचे, बाबांना का थांबवलंय सेटवर, त्यांना घरी पाठव. मला काही कळेना. पण, त्या सेटवरच्या कलाकारांना मला सांगितलेलं, असं काही नसतं. त्या कलाकारांना बाबांना सांगितलेलं, मुलीला एकटीला सोडून जायचं नाही, काही गोष्टी आम्ही बोलू शकत नाही. अगदीच मी लहान होते, १८-१९ वर्षांची. पहिलं शेड्युल झालं आणि दुसऱ्या शेड्युलच्या आधी त्या दिग्दर्शकाचा मला फोन आला आणि त्यांनी मला सांगितलं, रीडिंग ठेवलं आहे तर तुला मुंबईला यावं लागेल.'

'मी मुंबईत आले, त्यांनी मला लोकेशन सांगितलं. पुन्हा मला त्यांचा फोन आला, लेडीज डब्यात बस, एकटी असशील ना! मी त्यांना म्हटलं, नाही माझा भाऊ आहे सोबत.

मी बोरीवली पर्यंत पोहोचले होते, मला त्यांचा पुन्हा फोन आला. तेव्हा ते म्हणाले, 'भावाला कशाला आणायचं, एकटीनेच यायचं ना!' मी त्या लोकेशनला पोहोचले, तर तिथे कुणीच नव्हतं. मी खूप घाबरले. तो आला, एक पान वाचून घेतलं आणि म्हणाला, जा आता. मी मुंबईहून पुण्याला आले. मला घरी काय सांगायचं तेच कळत नव्हतं.

# ‘या’ फळाचे नियमित सेवन ठरेल फायदेशीर

आपल्या आरोग्यासाठी फळे ही अंत्यत फायदेशीर असतात. त्यामुळे फळांच सेवन करणं महत्वाचं मानलं जातं. यापैकीच चिकू हे फळ अनेकांना आवडतं. तसेच, चिकू हे फळ चवीलाही स्वादिष्ट असून हे आपल्या शरीरासाठी गुणकारी फळ आहे. चिकू हे फळ हृदय आणि रक्तवाहिन्यांपासून ते किडनीपर्यंतच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाणारे फळ आहे.



चिकू फळाचं सेवन केल्यानं हृदयविकाराचा धोका कमी होण्यास आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत मिळते. या फळामुळे हृदय आणि रक्ताभिसरण प्रक्रिया सुरळीत होण्यास मदत होते. तसेच, चिकू हे फळ दिसायला छोटं असलं तरी यामध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए आणि फायबर हे घटक मोठ्या प्रमाणात असतात. हे सर्व घटक एकत्रितपणे हृदय आणि रक्तवाहिन्यांचे आरोग्य सुधारण्यास फायदेशीर ठरतात. पोटॅशियममुळे रक्तदाब नियंत्रित राहतं.

तसेच, यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका कमी होण्यास मदत होते. मॅग्नेशियम रक्तवाहिन्यांना आराम देतं आणि धमन्यांमध्ये ’प्लाक’ जमा होण्यापासून रोखण्यास मदत करते.

आयुर्वेदेताही चिकूला फार महत्व असून हे फळ आपल्या शरीरातील रक्ताची कमतरता किंवा ॲनिमियाची समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त ठरते. तर, यामध्ये असलेले लोह आणि फॉलिक ॲसिडमुळे लाल रक्तपेशींच्या निर्मिती होण्यास मदत मिळते. चिकू फळाचं सेवन नियमितपणे केल्याने शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढण्यास मदत होते. तसेच, शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठाही सुधारण्यासाठी चिकू फायदेशीर ठरते. चिकू फळात असणारे अँटी-ऑक्सिडंट्स शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास उपयुक्त ठरतात. तसेच, यामुळे किडनीवरील अतिरिक्त ताण कमी होण्यास मदत होते.

चिकू हे फळ एक स्वस्त आणि मस्त असं फळ असून यामुळे आपली पचनसंस्थाही निरोगी राहते.

तसेच, चिकूमुळे पचनासंबधित असलेल्या समस्या कमी होण्यास मदत होते. त्यामुळे, चिकू या फळाचं नियमितपणे सेवन करणं आपल्या शरीरासाठी अंत्यत फायदेशीर ठरते.

# निस्तेज त्वचेला द्या नैसर्गिक उजाळा....

चेहऱ्याची काळजी ही सौंदर्याच्या दृष्टीने फार महत्त्वाची मानली जाते. त्यामुळेच खासकरून उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये आपल्याला चेहरा हा जपावा लागतो. उन्हाळ्यात धूळ, प्रदूषण आणि कडक उन्हाचा सर्वाधिक परिणाम त्वचेवर होतो. त्यामुळे चेहऱ्यावरील नैसर्गिक चमक कमी होऊन त्वचा निस्तेज, कोरडी आणि काळवंडलेली दिसू लागते. अनेकजण यासाठी महागडी सौंदर्यप्रसाधने किंवा विविध स्किन ट्रीटमेंट्सचा आधार घेतात. मात्र, घरच्या घरी उपलब्ध असलेले काही नैसर्गिक उपायही त्वचेला तितकाच फायदा देऊ शकतात.

केळे हे आरोग्यासाठी जितके फायदेशीर आहे, तितकेच ते त्वचेसाठीही उपयुक्त मानले जाते. केळ्यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. हे घटक त्वचेचे पोषण करून तिला मऊ, तजेलदार आणि निरोगी बनवण्यास मदत करतात. केळ्यामध्ये काही साधे घटक मिसळून तयार केलेले फेसपॅक त्वचेसाठी अत्यंत प्रभावी ठरू शकतात.



**केळी आणि मधाचा फेसपॅक**

त्वचेला नैसर्गिक चमक आणि ओलावा मिळवून द्यायचा असेल तर केळी आणि मधाचा फेसपॅक उत्तम पर्याय ठरू शकतो. यासाठी अर्धे पिकलेले केळे कुस्करून त्यात एक चमचा मध मिसळा. हे मिश्रण चेहऱ्यावर लावून सुमारे २० मिनिटे ठेवावे. त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा स्वच्छ धुवावा. केळे त्वचेला पोषण देते, तर मध त्वचेतील ओलावा टिकवून ठेवण्यास मदत करतो.

केळी आणि दह्याचा फेसपॅक

उन्हामुळे त्वचा टॅन झाली असेल किंवा चेहऱ्याचा रंग निस्तेज वाटत असेल, तर केळी आणि दह्याचा फेसपॅक फायदेशीर ठरू शकतो. एक पिकलेले केळे कुस्करून त्यात दही मिसळावे आणि तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. १५ मिनिटांनंतर थंड पाण्याने चेहरा धुवावा. दह्यातील लॅक्टिक ॲसिड मृत त्वचा काढून टाकण्यास मदत करते, त्यामुळे त्वचा अधिक उजळ आणि तजेलदार दिसते.

केळी आणि बेसनचा फेसपॅक

त्वचेवरील काळपटपणा कमी करण्यासाठी केळी आणि बेसन यांचे मिश्रण उपयुक्त ठरू शकते. अर्ध्या कुस्करलेल्या केळ्यात एक चमचा बेसन मिसळून पेस्ट तयार करावी. ही पेस्ट चेहरा, मान तसेच हात-पायांवर लावता येते. पॅक सुकल्यानंतर हलक्या हाताने चोळून काढावा. यामुळे मृत त्वचा दूर होते.

# फ्रिजमधून सतत दुर्गंध येतोय?

उन्हाळ्यात तापमान वाढताच अन्नपदार्थ टिकवून ठेवणे मोठे आव्हान बनते. त्यामुळे अनेक जण फळे, भाज्या, दूध किंवा उरलेले अन्न फ्रिजमध्ये साठवून ठेवतात. मात्र, योग्य काळजी न घेतल्यास फ्रिजमधून येणारी दुर्गंधी संपूर्ण स्वयंपाकघरातील वातावरण खराब करू शकते. अशा वेळी काही साधे घरगुती उपाय ही समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.



कडक उष्णतेमुळे अन्नपदार्थ लवकर खराब होतात. उघडे ठेवलेले पदार्थ, कापलेली फळे-भाज्या किंवा दीर्घकाळ साठवलेले अन्न यांमधून हळूहळू वास निर्माण होतो. हा वास फ्रिजमध्ये बंदिस्त राहिल्यामुळे अधिक तीव्र होतो. याशिवाय, फ्रिजमधील ओलावा आणि जंतूंची वाढही दुर्गंधीला कारणीभूत ठरते. फ्रिजमधील दुर्गंध कमी करण्यासाठी बेकिंग सोडा अत्यंत प्रभावी मानला जातो. एका छोट्या भांड्यात बेकिंग सोडा भरून फ्रिजमध्ये ठेवला तर तो हवेतील दुर्गंधी निर्माण करणारे घटक शोषून घेतो. त्यामुळे काही दिवसांतच फ्रिजमधील वातावरण अधिक स्वच्छ आणि ताजे वाटू लागते.

लिंबामध्ये असलेले नैसर्गिक गुणधर्म दुर्गंध कमी करण्यास मदत करतात. फ्रिजमध्ये लिंबाचे काप किंवा साली ठेवणे हा एक सोपा उपाय आहे. यामुळे केवळ वास कमी होत नाही, तर फ्रिजमध्ये ताजेपणाही टिकून राहतो. कॉफीचा सुगंध अनेकांना आवडतो, पण ती दुर्गंध शोषून घेण्याचेही काम करते. एका वाटीत थोडी कॉफी पावडर ठेवून ती फ्रिजमध्ये ठेवल्यास तीव्र वास कमी होण्यास मदत होते. विशेषतः मासे, मांस किंवा जुने अन्न साठवून ठेवल्याने निर्माण झालेला वास कमी करण्यासाठी हा उपाय उपयुक्त ठरतो.

फक्त घरगुती उपाय करून चालणार नाही, तर फ्रिजची नियमित साफसफाईही तितकीच आवश्यक आहे. शेल्फ, ट्रे आणि रबर गॅस्केट स्वच्छ ठेवले तर जंतूंची वाढ कमी होते. तसेच, खराब झालेल्या वस्तू वेळेवर काढून टाकल्यास दुर्गंधीची समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येते.

# जिऱ्याचे पाणी की तूप?

बद्धकोष्ठता ही आजकाल अनेकांना भेडसावणारी सामान्य समस्या बनली आहे. सकाळी नियमित शौचास न होणे, पोट फुगणे, मळमळ होणे किंवा पोट पूर्णपणे साफ न झाल्याची भावना ही त्याची प्रमुख लक्षणे मानली जातात. अशा वेळी औषधांवर अवलंबून राहण्याऐवजी आहारात योग्य बदल करणे अधिक फायदेशीर ठरू शकते. जिऱ्याचे पाणी पचनक्रिया सुधारण्यासाठी उपयुक्त मानले जाते. मात्र, बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास ते फारसे फायदेशीर ठरत नाही. कोमट पाण्यात देशी तूप मिसळून पिणे अधिक लाभदायक ठरू शकते. तुपामुळे आतड्यांना नैसर्गिक वंगण मिळते, ज्यामुळे मलविसर्जन सुलभ होते आणि पोट व्यवस्थित साफ होण्यास मदत होते.



डाळिंब हे पौष्टिक फळ असले तरी ते मल अधिक घट्ट करण्याचे काम करू शकते. त्यामुळे बद्धकोष्ठतेच्या काळात पपई खाणे अधिक योग्य मानले जाते. पपईमधील एन्झाइम्स आणि फायबर पचन सुधारून आतड्यांची हालचाल सुरळीत ठेवण्यास मदत करतात.

अनेकजण बद्धकोष्ठतेसाठी दूध पिण्याचा सल्ला देतात. मात्र, काही व्यक्तींमध्ये ते उलट त्रास वाढवू शकते. त्याऐवजी झोपण्यापूर्वी कोमट पाण्यासोबत अर्धा चमचा एरंडेल तेल घेतल्यास मोठे आतडे स्वच्छ होण्यास मदत होते आणि सकाळी शौचास जाणे सोपे होते.

# चहा प्यायल्यानंतर ॲसिडीटी होणा-यांसाठी

चहा हे भारतीयांचं अतिशय आवडीचं पेय. काही अपवाद सोडले तर दिवसातून एकदा तरी बहुतांश लोकांना चहा लागतोच.. दिवसाची सुरुवातच मुळी चहाने होत असते. त्यानंतर मग थोडा-थोडा असं करत करत दिवसभरातून कित्येकदा चहा होतोच.. काही जणांची अशीही अडचण असते की चहा पिऊन ?सिडीटी होते पण तरी चहा प्यायल्याशिवाय तरतरी येत नाही, अंगातला आळस जात नाही... अशा लोकांसाठी चहाच्या बाबतीत एक खास गोष्ट... जर तुम्ही पुढील पद्धतीने चहा करून प्यायला तर ॲसिडीटी मुळीच होणार नाही. एकदा ट्राय करून पाहाच...





आपल्याकडे बहुतांश लोक चहा करताना पाण्यामध्ये चहा पावडर घालून ते गॅसवर उकळायला ठेवतात. त्यानंतर त्यामध्ये दूध घालून सगळं एकत्रित उकळलं जातं. ही पद्धत खूप चुकीची असून यामुळेच बर्‍याच जणांना ॲसिडीटीचा त्रास होतो. त्यामुळे तुम्हीही या पद्धतीने चहा करत असाल तर ते टाळायला हवं आणि पुढे दिलेल्या रेसिपीनुसार चहा करून प्यावा.

चहा करण्यासाठी सगळ्यात आधी पाणी गॅसवर गरम करायला ठेवा. त्यामध्ये वेलची पावडर, आलं, दालचिनी असे पदार्थ किंवा चहा मसाला असं तुम्हाला जे हवं ते घालून पाणी उकळावं.

जेव्हा पाण्याला उकळी येईल तेव्हाच त्यामध्ये चहा पावडर घालावी. अगदी सुरुवातीपासून चहा पावडर घालू नये.

यानंतर दुसर्‍या एका पातेल्यामध्ये दूध गरम करायला ठेवावं. त्यानंतर कपामध्ये सुरुवातीला चहा पावडर घातलेलं पाणी गाळून घ्यावं आणि त्यात वरतून दूध घालावं.

# वय वाढले तरी गुडघे मजबूत राहतील

वय वाढलं तरी गुडघे मजबूत राहतील. दुधात मिसळून प्या ‘ही’ गोष्ट; ६० व्या वर्षीही जिने चढा सहज, ‘कट-कट’ आवाज होईल. कमी चालताना किंवा जिने चढताना गुडघ्यांतून ’कट-कट’ आवाज येतोय? वाढत्या वयासोबत हा त्रास सामान्य मानला जात असला, तरी दैनंदिन आहारातील एक साधी गोष्ट सांध्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकते. दुधात मिसळून प्यायची ती गोष्ट नेमकी कोणती? आणि गुडघेदुखी वाढण्यामागची कारणं काय?

अलीकडच्या काळात एक समस्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. पूर्वी वाढत्या वयात जाणवणारा गुडघेदुखीचा त्रास आता कमी वयातील तरुणांनाही सतावू लागला आहे. चालताना, जिने चढताना, खुर्चीवरून उठताना किंवा खाली बसताना गुडघ्यांतून ‘कट-कट’ किंवा ‘टक-टक’ असा आवाज येणे अनेकांसाठी चिंतेचा विषय बनला आहे. सुरुवातीला हा आवाज किरकोळ वाटतो. अनेक जण त्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र, कालांतराने त्यासोबत वेदना, कडकपणा, सूज आणि हालचालींमध्ये अडथळा निर्माण होऊ शकतो; त्यामुळे या समस्येकडे वेळेत लक्ष देणे आवश्यक मानले जाते.

# वाढत्या उष्णतेमुळे मेंदू आणि मूत्रपिंडावर होतो परिणाम

तीव्र उष्णतेमुळे मेंदू, डोळे आणि मूत्रपिंडा संबंधित समस्या उद्भवण्याची शक्यता असतो. देशाच्या अनेक भागांमध्ये वाढणारी उष्णता आणि उष्णतेच्या लाटांचा आता लोकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. तीव्र सूर्यप्रकाश, निर्जलीकरण (डिहायड्रेशन) आणि अति उष्णतेमुळे डोकेदुखी, चक्कर येणे, डोळ्यांची जळजळ आणि मज्जासंस्थेशी संबंधित समस्यांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या रुग्णालयांमध्ये झपाट्याने वाढत आहे. डॉक्टरांच्या मते, उष्णतेच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने शरीराचे संतुलन बिघडू शकते आणि काहीवेळा ते जीवघेणे देखील ठरू शकते.

अति उष्णतेमुळे कोणत्या समस्या उद्भवतात?

लहान मुले, वृद्ध आणि ज्यांना आधीपासूनच वैद्यकीय समस्या आहेत, त्यांना विशेष धोका असतो. उष्णता मर्यादेपलीकडे जाते तेव्हा शरीर पाणी आणि क्षार गमावू लागते. उष्णतेमुळे होणाऱ्या थकव्याच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये डोकेदुखी, स्नायू पेटके, मळमळ आणि अशक्तपणा यांचा समावेश होतो. यावर त्वरित उपचार केले नाहीत, तर त्याचे रूपांतर हीट स्ट्रोकमध्ये होऊ शकते, ज्यामुळे मेंदू आणि मूत्रपिंडांवर परिणाम होऊ शकतो.

**हे टाळण्यासाठी तुम्ही काय करू शकता?**

सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत अत्यावश्यक असल्याशिवाय बाहेर जाणे टाळावे. शरीरातील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यासाठी पाणी, नारळाचे पाणी आणि ओआरएस (ध्ंए) हे सर्वोत्तम पर्याय आहेत. मात्र, चहा आणि कॉफीसारख्या पेयांमुळे डिहायड्रेशनची (शरीरातील पाण्याची कमतरता) समस्या आणखी वाढू शकते. त्यांनी लोकांना सैल, सुती आणि हलक्या रंगाचे कपडे घालण्याचा सल्लाही दिला. तसेच, फुफ्फुस, हृदय आणि मूत्रपिंडाच्या आजारांनी ग्रस्त असलेल्यांनी हवामानातील बदलांदरम्यान नियमितपणे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला.



**या समस्यांकडे कधीही दुर्लक्ष करू नका**

तज्ज्ञांच्या मते, जर एखाद्या व्यक्तीला सतत गोंधळ, बोलण्यात अडचण, तीव्र सुस्ती, बेशुद्ध पडणे किंवा झटके येणे यांसारखी लक्षणे जाणवत असतील, तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. ही एका गंभीर न्यूरोलॉजिकल आपत्कालीन स्थितीची लक्षणे असू शकतात आणि यासाठी त्वरित वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असते. डॉक्टर असेही सांगतात की, उन्हाळ्यात लोक अनेकदा डोळ्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात, तर तीव्र उष्णता आणि सूर्यप्रकाशामुळे डोळ्यांची जळजळ आणि संसर्गाचा धोका वाढू शकतो. याव्यतिरिक्त, चक्कर येणे, तीव्र थकवा, उलट्या होणे, खूप गरम वाटणे, हृदयाचे ठोके वाढणे आणि स्नायू पेटणे यांसारखी लक्षणे देखील उष्माघाताची चिन्हे असू शकतात.

# मुलांना वळण लावण्याची आईबाबांची घाई करतेय मुलांचं ...!

प्रत्येक पालकांची अशी इच्छा असते की त्यांचे मूल आत्मविश्वासू, जबाबदार आणि समजूतदार बनावे. त्यामुळे अनेकदा पालक लहान वयातच मुलांना मोठ्यांसारखे वागण्याची अपेक्षा ठेवतात. स्वतःची कामे स्वतः करणे, प्रत्येक गोष्ट समजून घेणे किंवा नेहमी योग्य निर्णय घेणे अशा अपेक्षा नकळतपणे पालक मुलांकडून करत असतात. परंतु प्रत्येक गोष्ट शिकण्याचे आणि समजून घेण्याचे एक विशिष्ट वय असते, हे अनेकदा दुर्लक्षित केले जाते. यामुळे मुलांवर अनावश्यक मानसिक दबाव निर्माण होऊ शकतो आणि त्यांच्या नैसर्गिक विकासावर परिणाम होऊ शकतो.

बालविकास तज्ज्ञांच्या मते, मुलांचा मेंदू आणि भावनिक क्षमता टप्प्याटप्प्याने विकसित होत असते. त्यामुळे त्यांच्या वयानुसारच जबाबदाऱ्या आणि सवयी शिकवणे अधिक फायदेशीर ठरते. योग्य वेळी योग्य गोष्टी शिकवल्यास मुले त्या सहज आत्मसात करतात आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वासही वाढतो. त्यामुळे पालकांनी मुलांची तुलना इतरांशी न करता त्यांच्या वय, स्वभाव आणि क्षमतेनुसार त्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. मुलांना कोणत्या वयात कोणत्या महत्त्वाच्या सवयी शिकवाव्यात आणि त्यांच्या बालपणावर ताण नआणता त्यांचा सर्वांगीण विकास कसा साधावा ते पाहूयात.

**योग्य वयातच शिकवा ’या’ महत्त्वाच्या गोष्टी...**

पॅरेंटिंग एक्सपर्ट अंबिका अग्रवाल यांच्या मते, पालकांनी हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे की, मुलांची प्रत्येक चांगली सवय आणि जबाबदारी स्वीकारण्याचे एक ’योग्य वय’ असते. मुलांचा मेंदू आणि त्यांचे वर्तन प्रत्येक वयात वेगवेगळ्या टप्प्यांवर विकसित होत असते. जर आपण योग्य वयातच त्यांना योग्य गोष्टी शिकवल्या, तर मुले कोणतीही भीती किंवा तणाव न बाळगता अगदी हसत-खेळत त्या गोष्टी आत्मसात करतात. म्हणूनच, मुलांची नैसर्गिक वाढ समजून घेऊन त्यांच्याकडून वयानुसार अपेक्षा ठेवणे हाच उत्तम संगोपनाचा एक खास नियम आहे.

१. मुलांना पालकांपासून वेगळं झोपवण्याचं योग्य वय कोणतं ?

अनेक पालकांना वाटतं की मुलांना खूप लवकर स्वतंत्र खोलीत झोपवायला हवं. मात्र, पेरेंटिंग कोच अंबिका यांच्या मते, बहुतांश मुले साधारणपणे ७ वर्षांच्या आसपास किंवा त्यानंतर स्वतःच्या स्वतंत्र जागेत झोपण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार होऊ लागतात. या वयापर्यंत त्यांच्यामध्ये भावनिक स्थैर्य विकसित होत असते आणि त्यांना एकटं झोपताना सुरक्षित वाटू लागते. जर मूल अजूनही तुमच्यासोबत झोपण्याचा आग्रह धरत असेल, तर त्याला चुकीची सवय समजून रागावण्याची गरज नाही. त्याऐवजी हळूहळू त्याला स्वतःच्या जागेची सवय लावावी. जेव्हा मूल स्वतःला तयार एकटं झोपण्यासाठी तयार करेल आणि त्याला आरामदायक वाटू लागेल, तेव्हा हा बदल सहजपणे घडून येईल.

आईबाबांचे ५ साधेसे गुण मुलांना वाटतात स्पेशल, जन्मभर नात्यात येत नाही दुरावा-टिकते दोस्ती...

२. एका जागी लक्ष केंद्रित करण्याचं योग्य वय कोणतं ?

पॅरेंटिंग एक्सपर्ट अंबिका अग्रवाल यांच्या मते, ५ ते ६ वर्षांच्या वयापूर्वी मुलांचे लक्ष बराच वेळ एका जागी टिकून राहणे कठीण असते. या वयात मुले खेळताना आणि विविध कृती करताना अधिक चांगल्या प्रकारे शिकतात. त्यांचे शरीर आणि मेंदू सतत ?क्टिव्ह असतो, त्यामुळे वारंवार उठणे, इकडे-तिकडे फिरणे किंवा पटकन कंटाळा येणे ही अगदी सामान्य गोष्ट आहे. त्यामुळे अभ्यास करताना मूल सतत हालचाल करत असेल, तर त्याला हट्टीपणा किंवा गैरवर्तन समजू नका. या वयात हालचाल करणेही त्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेचाच एक महत्त्वाचा भाग असतो. मुलांना कमी वेळासाठी बसवून अभ्यास करायला सांगा आणि मध्ये-मध्ये थोडा ब्रेक द्या.

३. आपले सामान किंवा खेळण्याचा पसारा आवरून ठेवण्याचीसाठी योग्य वय कोणतं ?

साधारण ३ ते ४ वर्षांच्या वयात मुले सोप्या सूचना समजून घेण्यास सुरुवात करतात. हाच तो काळ असतो जेव्हा त्यांना खेळणी खेळून झाल्यावर पुन्हा त्यांच्या जागेवर ठेवायला शिकवले जाऊ शकते. सुरुवातीला मूल स्वतःहून प्रत्येक गोष्ट योग्य पद्धतीने करणार नाही, पण रोज थोडा थोडा सराव करून घेतल्याने ही त्याची सवय बनते. मुलांना रागावण्याऐवजी स्वतः त्याच्यासोबत मिळून खेळणी आवरा.

# प्लॅस्टिक करन्सी




हिंदुस्थानात कागदी नोटांऐवजी प्लॅस्टिक म्हणजेच पॉलिमर नोटा आणण्याची रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची योजना असून त्यावर गेल्या अनेक वर्षांपासून काम सुरू आहे. रिझर्व्ह बँकेने यापूर्वीच देशातील वेगवेगळे हवामान असलेल्या पाच प्रमुख शहरांमध्ये दहा रुपयांच्या प्लॅस्टिक नोटांची फिल्ड ट्रायल घेण्याची तयारी केली होती. सध्या जागतिक पातळीवर ऑस्ट्रेलिया, ब्रिटन आणि कॅनडासारख्या प्रगत देशांमध्ये प्लॅस्टिक चलन अतिशय यशस्वीपणे वापरात आहे आणि त्याच धर्तीवर हिंदुस्थानातही हा प्रयोग राबवण्याचा विचार गांभीर्याने सुरू आहे.

या प्लॅस्टिक किंवा पॉलिमर नोटांचे अनेक मोठे फायदे अर्थव्यवस्थेला मिळू शकतात. मुख्य म्हणजे या नोटा पारंपरिक सुती, कागदाच्या नोटांपेक्षा किमान चार ते पाचपट जास्त काळ टिकतात आणि त्या सहजासहजी फाटत नाहीत. प्लॅस्टिकच्या असल्यामुळे या नोटा पाण्यात भिजून खराब होत नाहीत, चुरगळत नाहीत आणि त्यांच्यावर घाण किंवा जंतू साचत नसल्याने त्या दीर्घकाळ स्वच्छ राहतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या नोटांमध्ये अत्यंत प्रगत सुरक्षा वैशिष्ट्ये आणि पारदर्शक विंडोज समाविष्ट करता येतात, ज्यांची हुबेहूब नक्कल करणे किंवा बनावट नोटा तयार करणे अत्यंत कठीण होऊन बसते. तसेच त्यांचे आयुष्य संपल्यानंतर या जुन्या नोटांचा पुनर्वापर करून इतर वस्तू बनवता येणे शक्य आहे.

अर्थात, हिंदुस्थानसारख्या अथांग लोकसंख्या आणि प्रचंड मोठ्या प्रमाणावर रोख व्यवहार असणा? या देशात हा बदल घडवून आणणे सोपे नाही. पॉलिमर नोटांच्या छपाईचा आणि कच्च्या मालाचा सुरुवातीचा खर्च कागदापेक्षा खूप जास्त असतो. याशिवाय नवीन नोटा चलनात आल्यानंतर देशभरातील लाखो एटीएम मशीनच्या कॅसेट्स आणि त्यांच्या सॉफ्टवेअरमध्ये मोठे तांत्रिक बदल करावे लागतील. तरीही सुरुवातीची आव्हाने पार पाडल्यास दीर्घकालीन आर्थिक सुरक्षितता, स्वच्छता आणि पारदर्शकतेच्या दृष्टीने आरबीआयचे हे पाऊल हिंदुस्थानी चलनासाठी मैलाचा दगड ठरू शकते. हे नवीन तंत्रज्ञान भविष्यात काळाची गरज ठरणार असून सर्वसामान्यांच्या व्यवहारांना अधिक सोपे आणि सुरक्षित बनवेल.

# तरुणांना ‘झुरळ’ बोलणाऱ्या सरन्यायाधीशांच्या कार्यक्रमात गोंधळ



देशाचे सरन्यायाधीश सूर्य कांत युनायटेड किंगडमच्या सहा दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान बर्कबेक, युनिव्हर्सिटी ऑफ लंडन येथे आयोजित व्याख्यानावेळी गोंधळ उडाल्याचे समोर आले आहे. या कार्यक्रमात उपस्थितांनी सरन्यायाधीशांना हिंदुस्थानातील विरोधी मतप्रवाह आणि तरुणांना उद्देशून केलेल्या झुरळ वक्तव्यावरून प्रश्न विचारले. याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून यूकेतील हिंदुस्थानी दूतावासाने या घटनेचा तीव्र शब्दांमध्ये निषेध करत हे वर्तन अशोभनीय असल्याचे म्हटले आहे. ‘इंडिया टूडे’ने याबाबत वृत्त दिले आहे.

**नेमकं काय घडलं?**

४ जून रोजी सरन्यायाधीश सूर्यकांत यांचे कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय कायदा’ या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भाषण संपल्यानंतर जेव्हा प्रश्नोत्तरांचे सत्र सुरू झाले तेव्हा एका श्रोत्याने विषयाला बगल देत हिंदुस्थानातील लोकशाहीच्या सद्यस्थितीवर बोट ठेवले. सध्या हिंदुस्थानात विरोधी विचारांबद्दल आणि मतप्रवाहांबद्दल शत्रुत्वाची भावना वाढीस लागली आहे, अशी चिंता आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यक्त होत आहे. हीच भावना सरन्यायाधीश यांच्या भाषणातूनही प्रतिबिंबित होते, असा थेट आरोप या श्रोत्याने केला. त्याच वेळी, दुसऱ्या एका श्रोत्याने सरन्यायाधीशांनी तरुणांबाबत केलेल्या झुरळ वक्तव्याचा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, वाद वाढताना पाहून आयोजकांनी प्रश्न विचारणाऱ्या रोखले आणि आजच्या कार्यक्रमाचा विषय फक्त कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आंतरराष्ट्रीय कायदा हाच असल्याने मी या राजकीय प्रश्नांना मंजुरी देऊ शकत नाही, अशी भूमिका घेतली. यानंतर काही श्रोत्यांनी तीव्र आक्षेप घेत जागेवर उभे राहून घोषणाबाजी आणि हातवारे करण्यास सुरुवात केली. आयोजकांनी कृपया शांत व्हा आणि हे थांबवा, असे आवाहन केले, परंतु तोपर्यंत सभागृहातील वातावरण कमालीचे तणावपूर्ण झाले होते.

# मीच माझा दोस्त !



वाकडची संध्याकाळ तशी भारीच असते. एका मोठ्या दगडावर बसलेला असायचा रवी.रवी १२-१३ वर्षांचा, अतिशय गोड डोळ्यांचा मुलगा. पण रवी इतरांसारखा नव्हता. जन्मापासूनच त्याचा उजवा पाय थोडा आखूड आणि अशक्त होता. त्यामुळे तो इतरांसारखा सुसाट पळू शकत नव्हता, झाडावर सरसर चढू शकत नव्हता. मुलं जेव्हा खेळात दंग असायची, तेव्हा रवी फक्त त्यांच्याकडे बघून हसायचा.

‘रवी, अरे चल रे, आज आपण लंगडी खेळू!’ त्याचा मित्र बंडू ओरडला.

रवीने आपला पाय थोडा मागे ओढला, कपडे नीट केले आणि हसून म्हणाला, ‘नाही रे बंडू, तुम्ही खेळा. मी इथूनच बघतो. मी आलो की तुमचा खेळ रेंगाळतो रे.’

रवीचं हे बोलणं ऐकून बंडू काही बोलला नाही, पण रवीच्या मनात काहीतरी तुटत होतं. ‘मी का असा वेगळा आहे? देवाने मला सगळ्यांसारखं का नाही बनवलं?’ हा प्रश्न त्याला रोज रात्री छळायचा. तो स्वतःला आरशात बघायचा आणि त्याचे डोळे भरून यायचे. त्याला स्वतःच्याच पायाची लाज वाटायला लागली होती. तो स्वतःलाच गुन्हेगार मानायचा.

एक दिवस गावात नदीच्या जवळपास मोठी जत्रा भरली. जत्रेत मुलांसाठी पळण्याची आणि उंच उडी मारण्याची स्पर्धा होती. रवीची खूप इच्छा होती की त्यानेही काहीतरी करावं, पण स्वतःच्या त्रुटीची जाणीव त्याला मागे खेचत होती. तो जत्रेच्या एका कोपऱ्यात, एका झाडाखाली बसून राहिला. तिन्हीसांजा झाल्या, दिव्यांची रोषणाई झाली. खेळ संपले, बंडूला पळण्याच्या स्पर्धेत पहिलं बक्षीस मिळालं. सगळी मुलं बंडूचं कौतुक करत होती. रवी दूरूनच हे सगळं बघत होता. त्याच्या डोळ्यातून घळघळा पाणी वाहत होतं. तो स्वतःचा पाय हाताने दाबत म्हणाला, ‘हा पाय असा नसता, तर आज मी पण तिथे असतो...’

रवीने आपल्या खिशातून एक छोटी लाकडी बासरी काढली. ही बासरी त्याच्या आजोबांनी त्याला दिली होती. रवी जेव्हा खूप दुःखी असायचा, तेव्हा तो बासरी वाजवायचा.

त्याने बासरी ओठाला लावली आणि एक सूर छेडला. त्या सुरांमधून रवीच्या मनातील सगळं दुःख, त्याचा एकटेपणा आणि ‘मी इतरांसारखा का नाही’ ही त्याची वेदना बाहेर पडत होती. बासरीचा आवाज इतका आर्त आणि सुंदर होता की नदीचं पाणीही शांत झालं. झाडावरची पाखरंही त्यांचा किलबिलाट थांबवून तो सूर ऐकू लागली. रवी डोळे बंद करून पूर्ण मनापासून वाजवत होता. त्याच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते आणि बासरीच्या छिद्रांवर पडत होते.

तेवढ्यात तिथून गावातील विठोबा माऊलींचे एक जुने कीर्तनकार, हरी बाबा चालले होते. विठूची बासरी ऐकून त्यांचे पाऊल थांबले. ते स्तब्ध होऊन रवीच्या पाठीशी उभे राहिले. रवीची बासरी संपली, त्याने डोळे पुसले. हरी बाबांनी रवीच्या खांद्यावर हात ठेवला. रवी दचकला आणि लगबगीने उभा राहण्याचा प्रयत्न करू लागला.

‘बस, बस रवी बाळा, उठू नकोस,’ बाबा मऊ आवाजात म्हणाले. ‘काय वाजवलंस रे! माझं काळीज भरून आलं. इतकी सुंदर बासरी तर तरबेज कलाकारालाच जमते.’

रवीने मान खाली घातली आणि हळूच म्हणाला, ‘काय फायदा बाबा या बासरीचा? मी बंडूसारखा पळू शकत नाही. मी धावण्याच्या स्पर्धेत कधीच जिंकू शकणार नाही. देवाने मला वेगळं आणि अपूर्ण बनवलंय. मला स्वतःचाच राग येतो.’

हरी बाबा हसले. त्यांनी रवीच्या बाजूला बसून त्याचा हात आपल्या हातात घेतला. ते म्हणाले, ‘रवी, एक गोष्ट सांगतो, नीट ऐक. देवाने निसर्गात किती वेगवेगळी झाडं बनवली आहेत रे? आंब्याचं झाड गोड आंबे देतं. पण आंब्याचं झाड कधी बांबूच्या झाडासारखं उंच आणि लवचिक असतं का? बांबूला कधी आंबे येतात का?’ रवीने नकारार्थी मान हलवली.

‘मग बांबूचं झाड रडत बसतं का, की मला आंबे का नाही आले? नाही ना! बांबू स्वतःचा स्वीकार करतो आणि जेव्हा वारा येतो, तेव्हा त्याच बांबूतून देवाची बासरी बनते. रवी, तू इतरांपेक्षा वेगळा आहेस, कारण देवाने तुला पळण्यासाठी नाही, तर लोकांच्या मनाला स्पर्श करण्यासाठी बनवलं आहे. तुझा हा पाय तुझी कमजोरी नाही, तर ती तुझी ओळख आहे. जोपर्यंत तू स्वतःच्या या त्रुटीचा स्वीकार करणार नाहीस, तोपर्यंत तुला तुझ्या आत दडलेला हा सुंदर सूर गवसणार नाही. स्वतःला ओळख, स्वतःवर प्रेम कर.’

बाबांचे शब्द थेट रवीच्या काळजाला भिडले. त्याला जाणवलं की तो आजपर्यंत नसलेल्या गोष्टीसाठी रडत होता, पण जे त्याच्याकडे आहे- ती अद्भुत कला त्याची त्याला किंमतच नव्हती.त्याने मनोमन स्वीकारलं, ‘हो, मी वेगळा आहे, मी पळू शकत नाही, पण मी रवी आहे आणि मी सुंदर बासरी वाजवू शकतो.’

पुढच्याच रविवारी गावात पुन्हा भजन होतं. हरी बाबांनी रवीला बोलावून घेतलं. संपूर्ण गाव गोळा झालं होतं. रवी मध्यभागी बसला. त्याने डोळे मिटले, स्वतःच्या मनातील सगळी भीती आणि न्यूनगंड काढून टाकला. त्याने स्वतःला जसा आहे तसा स्वीकारलं होतं. त्याने बासरी ओठाला लावली आणि वाजवायला सुरुवात केली. यावेळच्या सुरांमध्ये दुःख नव्हतं, तर एक अथांग आनंद आणि शांतता होती. बासरीचा तो गोड आवाज ऐकून जत्रेत पळणारा बंडू, खेळणारी सगळी मुलं आणि गावातील मोठी माणसं स्तब्ध झाली. कित्येकांच्या डोळ्यातून पाणी आलं. रवीची बासरी थेट देवाच्या गाभाऱ्यात पोहोचली होती.

बासरी संपली आणि पूर्ण गावात टाळ्यांचा कडकडाट झाला. बंडू पळत आला आणि त्याने रवीला घट्ट मिठी मारली, ‘रवी, तू तर कमाल आहेस रे! आम्हाला पळता येतं, पण असं वाजवता येत नाही आणि अनेक मनं जिंकताही येत नाही. तू जिंकलंस रे!’

रवीच्या डोळ्यात आनंदाश्रू होते. आज त्याला स्वतःचा खूप अभिमान वाटत होता. त्याने स्वतःच्या त्रुटीचा स्वीकार केला होता आणि त्याच स्वीकारातून त्याला त्याचं वेगळेपण, त्याचं अस्तित्व मिळालं होतं. तो मनातून मुक्त झाला होता.

# माणसांचे पूर्वज कोण ?

एखाद्याने वेडेचाळे केले किंवा वेड्यावाकड्या हालचाली केल्या तर पटकन ‘अगदी आपल्या पूर्वजांसारखा वागतो आहेस!’ म्हणून त्याची चेष्टा केली जाते. इथे माणसाचे पूर्वज म्हणजे ‘माकड’ असं जरी अभिप्रेत असलं तरी प्रत्यक्षात उत्क्रांतीच्या चक्रात माणूस काही माकडांपासून निर्माण झालेला नाही. पण जंगलातल्या वन्यप्राण्यांतील माकडं आणि माणसं यांच्यात काही शारीरिक समानता, काही समान वर्तन पाहायला मिळतं आणि त्यामुळेच माणूस माकडापासून निपजला या चुकीच्या वचनावर पटकन विश्वास बसतो. मात्र उत्क्रांतीचा इतिहास सांगतो की माकड हा काही माणसाचा पूर्वज नाही. साधारण साडेतीन-चार कोटी वर्षांपूर्वी आजच्या माकडांचे पूर्वज पृथ्वीवर अवतरले. पुढच्या आठ-दहा कोटी वर्षांमध्ये माकडांचे वेगवेगळे प्रकार विकसित झाले. त्यातच एप्स म्हणजे कपी या गटातली माकडे निर्माण झाली. या माकडांना इतर माकडांप्रमाणे शेपटी नव्हती, हे एप्स इतर माकडांपेक्षा आकाराने मोठे होते, शिवाय त्यांचे खांदे झाडाच्या फांद्यांवर झोके घ्यायला सोयीचे होते आणि मुख्य म्हणजे एप्सचा मेंदू अधिक विकसित होता. त्यामुळे माकडांपेक्षा ते जास्त बुद्धिमान होते. म्हणूनच एप्स त्यांची भाषा विकसित करू शकले आणि त्यांना इतरांच्या भाषेचं आकलनही होऊ लागलं. मात्र एप्सच्या काही मोजक्याच प्रजाती निर्माण झाल्या आणि टिकल्या, तर माकडांच्या मात्र शेकडो प्रजाती पृथ्वीवर वेगवेगळ्या परिसरात नांदताना दिसतात.मग या एप्समधील इतर सभासदांचं आणि माणसाचं नातं काय आहे? यातल्याच एखाद्या सभासदापासून आजचा माणूस उत्क्रांत झाला आहे का? एप्सच्या गटातले आज दिसणारे सभासद म्हणजे चिपँझी, गोरिला, ओरँग उटान, बोनोबो. या सगळ्यांचे माणसाशी म्हटले तर नाते आहे आणि नाहीही. कारण सुमारे साठ ते ऐंशी लाख वर्षांपूर्वी या एप्समधून एक वेगळा सभासद निर्माण झाला, जो आजच्या माणसाचा पूर्वज मानला जातो.

# अन्न नासाडीपासून अन्न नेतृत्वापर्यंत मोठी संधी

**शेतीपासून कंपन्यांपर्यंत आणि स्थानिक बाजार पेठांपासून जागतिक मूल्य साखळयांपर्यंत, अन्न प्रणालीं मधील परिवर्तन हे या प्रदेशाचे आर्थिक भवितव्य निश्चित करेल. दक्षिण आशिया अन्न नासाडीकडून अन्न नेतृत्वाच्या दिशेने अग्रेसर होऊ शकते.**

चिराग पासवान



दक्षिण आशिया आज आपल्या अन्नव्यवस्थेच्या प्रवासात एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. अत्यंत समृद्ध असा कृषी वारसा आणि वैविध्यामुळे, एक महत्त्वाचा कृषी प्रदेश असे स्थान मिळवूनही, दक्षिण आशियात शेतांतून ग्राहकांपर्यंत अन्नधान्य पोहचेपर्यंत त्यातील मूल्यांचे खूप मोठे नुकसान होते आहे. शेतकरी, रोजगारनिर्मिती आणि पोषणमूल्य अशा सर्वच क्षेत्रात असलेल्या क्षमतांसाठी ही एक हुकलेली संधी आहे. भारतातही याच विरोधाभासाचे प्रतिबिंब आपल्याला दिसते. जागतिक अन्न आणि कृषी संघटनेच्या अहवालानुसार, भारत जगात दूध आणि डाळींचा सर्वात मोठा तर फळे आणि भाजीपाल्याचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा देश आहे. मात्र तरीही, अन्नधान्याचे खूप मोठे नुकसान, पीक कापणी झाल्यानंतरची हाताळणी, साठवणूक, लॉजिस्टिक्स आणि अन्न प्रक्रिया यात असलेल्या त्रुटींमुळे तसेच, शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांसह जागतिक विकासाच्या गरजांच्या प्राधान्यांनुसार प्रगती करण्याला महत्त्व न देणे, यांचाही परिणाम झाला आहे. ही केवळ अकार्यक्षमता नाही तर आपण गमावलेली संधी आहे.

अन्नधान्याचा आपण गमावलेला प्रत्येक टन, म्हणजे शेतकऱ्याचे बुडालेले उत्पन्न, युवकांचा गेलेला रोजगार आणि कुटुंबांना न मिळालेलं पोषण आहे. हे नुकसान, मूल्यात परिवर्तीत करणे, याला आता संपूर्ण प्रदेशाने प्राधान्य देण्याची गरज आहे. अन्नप्रक्रिया ही मूल्यवर्धित कृषीचे मूल्य मिळवणारी गुरुकिल्ली आहे. अन्न प्रक्रिया, शेतकऱ्यांना बाजारपेठेशी जोडते, विविध कंपन्यांशी जोडते, स्थानिक उत्पादनांना प्रादेशिक आणि जागतिक मूल्य साखळीशी जोडते. अन्न प्रक्रिया कृषी आणि व्यापक वित्तीय परिवर्तनातील त्रुटी भरून त्यांना एकत्र जोडणारा पूल आहे. विपुलतेपासून मूल्यापर्यंतचा प्रवास गेल्या कित्येक दशकांपासून आपल्या कृषी धोरणाने, अन्नधान्य उत्पादन वाढवण्यावर आणि अन्नसुरक्षेवर भर दिला, जी त्या काळाची गरजच होती. या अजेंड्यानुसार काम केल्यामुळेच आपल्याला अन्नसुरक्षा साध्य करता आली. मात्र, आता त्याचा पुढचा टप्पा, मूल्य निर्मितीवर भर देणारा असायला हवा. रोजगार निर्मिती, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पोषण मूल्यात सुधारणा करणे हा असायला हवा. भारतात, केवळ १७ टक्के कृषी उत्पादनांवर प्रक्रिया केली जाते. २०३० पर्यंत हे प्रमाण २५ टक्क्यांपर्यंत वाढायला हवे आणि त्यात असलेल्या वित्तीय क्षमतांचा संपूर्ण लाभ त्या क्षेत्राला घेता यायला हवा. त्याचवेळी, कापणी नंतर अन्नधान्याचे नुकसान कमी करणे आणि अन्न प्रक्रिया उद्योगाची साखळी मजबूत करणे हेही अधिकाधिक मूल्य अर्थव्यवस्थेतच राहील, हे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आहे. अन्नप्रक्रियेमुळे, अन्नधान्याच्या टिकावू क्षमतेत वाढ होते, अन्न सुरक्षा सुधारते तसेच नव्या देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठांचे मार्ग खुले होतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ज्या देशात याचे उत्पादन होत आहे, त्याच देशात, त्याचे आर्थिक मूल्य वाढल्याने, त्याचा लाभ शेतकरी, छोटे उद्योग आणि ग्रामीण समुदायाला मिळतो.

बाजारपेठप्रणित मूल्य साखळीला आकार देणे हे परिवर्तन प्रत्यक्षात आणण्यासाठी, संपूर्ण मूल्य साखळीतील प्रत्येक घटकात उत्पादन, संकलन, प्रक्रिया, लॉजिस्टिक्स आणि बाजारपेठेतील प्रवेश- योग्य समन्वय राखून नीट गुंतवणूक करणे आवश्यक असेल. यात, गुणवत्ता, सुरक्षितता, उत्पादनाचा मागोवा घेण्याची क्षमता आणि किफायतशीरपणा याविषयी ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अधिक एकात्मिक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारणे अत्यावश्यक असेल. दक्षिण आशियातील समृद्ध कृषी वैविध्यात, उच्च मूल्यांची उत्पादने निर्मितीची क्षमता आहे, विशेषतः आज जेव्हा जगाच्या मागण्या, अधिक वैविध्यपूर्ण, पोषक मूल्यांच्या आणि विशेष अन्नधान्याच्या असताना, आपण या क्षमतांचा पुरेपूर वापर करायला हवा. त्याचवेळी, एखाद्या उत्पादनाचा मागोवा घेणे, गुणवत्ता मानके सुधारणे आणि अत्यंत गुंतगुंतीच्या जागतिक बाजारपेठांमध्ये आपली स्पर्धात्मकता वाढवणे, यासाठी डिजिटल सुविधा महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात.

सार्वजनिक गुंतवणुकीची भूमिका महत्त्वाची असते, परंतु तिने खासगी क्षेत्राच्या सहभागाला वेग व प्रेरणा देणे अत्यावश्यक असते. आवश्यक तेवढ्या प्रमाणात गुंतवणूक मिळवण्यासाठी, व्यवसायानुकूल वातावरण अधिक बळकट करणे, जोखीम कमी करणे आणि परिणामकारक पद्धतीने सार्वजनिक खासगी सहयोग घडवून आणणे अतिशय आवश्यक होय. भारताने यापूर्वीच सरकारच्या काही महत्त्वपूर्ण आणि सरकारला एक ओळख मिळवून देणाऱ्या कार्यक्रमांमधून महत्त्वाची पावले उचलली आहेत. उदा. प्रधानमंत्री किसान संपदा योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग औपचारिकीकरण योजना आणि अन्नप्रक्रिया उद्योगांसाठीची उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजना इत्यादी. या उपक्रमांमधून पायाभूत सुविधा बळकट होत आहेत, शीतगृह साखळ्यांचा विस्तार होत आहे आणि लघु तथा मध्यम उद्योगांना पाठबळ मिळत आहे.

यामुळे अधिक गतिशील आणि स्पर्धाक्षम अशा क्षेत्राचा पाया घातला जात आहे. अत्यंत आवश्यकता असेल तेथे रोजगारनिर्मिती अन्नप्रक्रियेचा संबंध काही फक्त आर्थिक क्षमतेशी नाही, तर उपजीविकांशीही अन्नप्रक्रिया उद्योग तितकाच संबंधित आहे. पूर्ण दक्षिण आशियाचा विचार करता, दरवर्षी कार्यबलात (वर्कफोर्समध्ये) लक्षावधी युवकांची भर पडत असते. येथून पुढे या सतत वाढत्या श्रमबळाला काम देण्यासाठी अगदी कृषी क्षेत्र झाले तरी, ते पुरेसे नाही. या प्रश्नावर उत्तम तोडगा काढण्याचे सामर्थ्य अन्नप्रक्रिया उद्योगाकडे आहे. अन्नप्रक्रिया उद्योगक्षेत्रामुळे, उत्पादन केंद्रांच्या अधिक जवळ उद्योगांची उभारणी होऊन, वाहतूक, दळणवळण, वेष्टन, अन्न तंत्रज्ञान आणि संबंधित सेवा- अशा विविध क्षेत्रांमध्ये विकेंद्रित रोजगारनिर्मिती होते. लघु तथा मध्यम उद्योगांना वाढीची संधी देत, त्यांना औपचारिक उद्योगांमध्ये रूपांतरित करत, आधुनिक मूल्य-साखळ्यांशी जोडून घेत हे क्षेत्र एक प्रकारे उद्योजकता-विकासाचा मार्गही प्रशस्त करते.या क्षेत्राकडून मिळणारे खरे आश्वासन येथेच दडलेले आहे. केवळ अन्नाचे मूल्यवर्धन करून थांबणे हे या क्षेत्राचे कामच नव्हे, तर विशेषतः ग्रामीण भागात आणि त्यातही स्त्रिया व तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर अर्थपूर्ण रोजगारनिर्मिती करण्याची ग्वाही हे क्षेत्र देते, ही खरी मेख आहे. परिवर्तनशील अशा जागतिक बाजारपेठेतील स्पर्धेत टिकाव धरून राहणारी भारताची प्रक्रियाकृत अन्नाची निर्यात स्थिरपणे वाढत आली आहे. जागतिक बाजारपेठेत तिच्या भूमिकेचे वाढते महत्त्वच यातून प्रतिबिंबित होते. नव्या व्यापार करारांमुळे जसजशा बाजारातील संधी निर्माण होतील, तसतसा कच्चा माल निर्यात करण्याकडून अधिक मूल्याच्या प्रक्रियाकृत उत्पादनांची निर्यात करण्याकडे कल वाढत गेला पाहिजे आणि त्यास अधिकाधिक प्राधान्य दिले गेले पाहिजे.

दिवसेंदिवस जागतिक ग्राहकांना सुरक्षित, पोषक, सहज शोधून काढता येईल असे आणि शाश्वत/संतुलित पद्धतीने तयार केलेले अन्न हवे आहे. यामुळे तर, गुणवत्ता, मापदंड आणि नवोन्मेष यांवरील जबाबदारी अधिक वाढते आणि भारत आता या बाबतींतील क्षमतांमध्ये हळूहळू वाढ करत चालला आहे. या संधींचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी, तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण पायाभूत सुविधा, अन्नाचा मागोवा घेणाऱ्या प्रणाली आणि ब्रॅण्डिंग (नावाने प्रसिद्ध होणे) यांमध्ये गुंतवणूक होणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. जागतिकदृष्ट्या स्पर्शक्षम अशा मूल्यसाखळ्या निर्माण केल्यास, उत्पादकांना आणि उद्योजकांना मूल्यसाखळीच्या वरच्या टप्प्यावर चढता येईल आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये त्यांचा ठसा उमटवता येईल. संतुलिततेचा/ शाश्वततेचा गाभा अन्नव्यवस्थांमध्ये परिवर्तन घडवून आणायचे तर ते, शाश्वतही असले पाहिजे आणि त्यास मोठ्या आव्हानांसमोर तगही धरून राहता आले पाहिजे.